म. ग्रं. सं. ठाणें
विषय भू-प्र
सं. क्र. १५९

REFBK-0005022

# भारतीय

# बांधवांचे भूप्रदेश

( प्रथम खण्ड )

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ५०२२
ठाणे

REFBK-0005022

(मु कुल, हिंगणें)

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. भू.प. नं. ९३८
ता. २३/५/३४
ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. ५०२२

थमावृत्ति ] किंमत १ रुपया [ सन १९३३

— प्रकाशक —
वि. आ. मोडक, बी.ए., बी.टी.
अनाथबालिकाश्रम, हिंगणें,
पुणें ४

[ सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन ]

— मुद्रक —
स. रा. सरदेसाई, बी.ए., एल
नवीन समर्थ विद्यालयाचा 'समर्थ
छापखाना, ९४७ सदाशिव, पुणें

भारतीय महिला-विद्यापीठाचे कुलगुरु

## कर्मवीर अण्णा कर्वे

यांच्या चरणीं

सादर व सविनय अर्पिलें असे.

# आशीर्वादपर चार शब्द:—

[illegible]िंगणें येथील अनाथबालिकाश्रममंडळाचे एक आजन्मसेवक व ‘ महिला-[illegible]ूलचे सुपरिंटेंडेंट रा. विश्वनाथ आबाजी मोडक, बी.ए., बी.टी., [illegible]डे “भूगोलावरील कांहीं विचित्र प्राणी,” “भूगोलावरील साहसी [illegible] “भूगोलावरील वनस्पतींचे प्रदेश” आणि प्रस्तुत “भारतीय बांधवांचे [illegible], या नांवांचीं जीं पुस्तकें लिहिलीं आहेत तीं मीं चाळून पाहिलीं व मनाला आनंद झाला. आम्ही ज्या वेळेस भूगोल शिकलों, त्या वेळीं हा विषय आम्हांला अतिशय रूक्ष वाटावयाचा, इतका कीं, कशासाठीं तो शिकविण्यांत येतो याबद्दल आम्हांला प्रश्नच पडत असे. पण कशीतरी घोकंपट्टी करून आम्ही त्या विषयांत पास होत होतों, आणि पास झालों म्हणजे त्याची कायमची रजा घेत होतों. अलीकडे या विषयासंबंधीं कल्पना बदलल्या असून तो मनोरंजक व जीवितोपयोगी करण्याकडे कल झालेला दिसतो. पूर्वींच्या त्या नद्या, पर्वतांच्या पाठ करावयाच्या याद्या, तसेंच ‘काय, कोठें व कशासाठीं प्रसिद्ध’ वगैरेसारखे प्रश्न जाऊन त्यांचेऐवजीं हरतऱ्हांची संसारोपयोगी, व्यापारोपयोगी वगैरे माहिती पुस्तकांतून दिलेली आढळते आणि ‘ भूगोला ’चा मानवी जीविताशीं कसा निकट संबंध आहे हें दाखविण्याचा प्रयत्न करण्यांत येत आहे. विद्यार्थ्यांच्याकरितां लिहिलेल्या पुस्तकांत आणखी एक विशेष असतो तो हा कीं, ही माहिती मनोरंजक रीतीनें आणि त्यांच्या विचारशक्तीला चालना मिळेल आणि ते सभोंवतालच्या परिस्थितीकडे उघड्या डोळयांनीं आणि कुतूहलपूर्ण दृष्टीनें पाहूं लागतील अशा पद्धतीनें दिलेली असते. माझे तरुण व्यवसायबंधु रा. मोडक यांनीं अशाच पद्धतीनें आपलीं पुस्तकें लिहिलीं आहेत. त्यांतील भाषा सोपी व विषयाला साजेल अशी आहे. नवीन माहितीचा संबंध जुन्या पौराणिक व ऐतिहासिक

गोष्टींशीं लावून देऊन या गोष्टींकडे एका नवीन दृष्टीनें पाहाण्यास त्यांनीं विद्यार्थ्यांना शिकविलें आहे, हा एक त्यांच्या पुस्तकांचा अभिनंदनीय विशेष दिसतो. सध्यां लिहून झालेल्या व पुढें योजिलेल्या पुस्तकांना मीं शुभचिंतनपर आशीर्वाद द्यावा अशी त्यांनीं मला विनंति केली. पण 'आशीर्वाद' द्यावा इतकी माझी आध्यात्मिक किंवा वाङ्मयीनहि तपश्चर्या नाहीं. म्हणून एवढेंच म्हणतों कीं, त्यांनीं हीं विद्यार्थ्यांना (व सामान्य लोकांनाहि) अत्यंत उपयुक्त अशीं पुस्तकें ज्या हेतूनें लिहिलीं आहेत तो सफळ झाला तर त्यांना जसा आनंद होईल तसा मलाहि होईल.

हिंगणें
४-१२-३३

धोंडो केशव कर्वे

# माझे विचार आणि आभार

क्रमिक पुस्तकांच्या नियमांच्या चौकटींत बसूनहि, सामान्य वाचकांस हें पुस्तक उपयोगी पडण्यासारखें आहे. प्रत्येक सुशिक्षित व्यक्तीस, मग ती स्त्री अगर पुरुष असो, आपल्या मातृभूविषयीं निदान या पुस्तकांत जेवढी माहिती दिली आहे तेवढी ठाऊक असणें अवश्य आहे. इतर राष्ट्रांतील सर्वसामान्य लोकांना आपापल्या राष्ट्राची जितकी सविस्तर माहिती असते, तितकी सविस्तर माहिती आपल्याकडील सुशिक्षित लोकांनासुद्धां आपल्या देशाबद्दल नसते. केवळ भौगोलिक माहिती दिली असतां तिचा एकच एक साचा ठरलेला असतो. सीमा, क्षेत्रफळ, नद्या-नाले, हवा, पाऊस, पीक-पाणी, उत्पन्न, व्यापार, कारखाने, प्रसिद्ध ठिकाणें इत्यादि गोष्टी ठराविक पद्धतीनें सांच्यांत घातल्याप्रमाणेंच देण्यानें त्या गोष्टी नीरस व कंटाळवाण्या होतात. या पुस्तकांत या सर्व गोष्टी आल्या आहेतच. पण त्या सर्व ओघांत आणण्याचा प्रयत्न केला आहे. याशिवाय प्रत्येक प्रदेशाबद्दल प्रादेशिक माहितीबरोबरच ऐतिहासिक, पौराणिक आणि शास्त्रीय माहिती देण्यांत आली आहे; आणि या सर्व गोष्टी शक्य तितक्या मनोरंजक होतील, अशा तऱ्हेनें सांगण्याची काळजी घेतली आहे. आतां हें कितपत साधलें आहे हें वाचकच ठरवतील.

वाचकवर्गांत तीन प्रकारचे लोक असणार. **पहिला वर्ग विद्यार्थ्यांचा.** यांनीं हें पुस्तक अवश्य वाचावें. कारण भौगोलिक गोष्टींबरोबरच इतरहि बऱ्याच गोष्टी या पुस्तकांत त्यांना वाचावयास मिळून त्यांच्या ज्ञानांत भरच पडेल. **खरोखर हें भौगोलिक वाङ्मयाचें पुस्तक आहे.** कारण यांत भौगोलिकच पण रम्य कथा आणि वर्णनें त्यांना वाचावयास मिळून बऱ्याच गोष्टींचें ज्ञानहि सहजासहजीं होईल. **दुसरा वर्ग शिक्षकांचा.** शहरांतील शिक्षकांपेक्षां खेड्यापाड्यांतील शिक्षकांना या पुस्तकाचा पुष्कळ उपयोग होईल. कारण खेड्यापाड्यांतून माहिती पुरविणारीं पुस्तकें नसतातच. माहितीच्या अभावीं शिक्षकांना आपला विषय नीट सजवून सांगणें कठीण जातें. या पुस्तकांत अनेक पुस्तकांतून पांगलेली माहिती एकत्र आणिली आहे. तसेंच भूगोल व इतिहास

यांची सांगड कशी घालावयाची ही गोष्ट या पुस्तकांत त्यांना अनेक ठिकाणीं आढळून येईल. **तिसरा वर्ग सुशिक्षित स्त्रीपुरुषांचा**. यांना भूगोल विषयाचा कंटाळा असतो; पण तो मूलतः त्यांच्यांत नसतो, तर तो विद्यार्थीदशेंत नीरस क्रमिक पुस्तकें वाचून उत्पन्न झालेला असतो. या पुस्तकानें त्यांची करमणूक होऊन स्वदेशाबद्दलचें भौगोलिक ज्ञानहि मिळेल.

गेल्या दोन वर्षांत मीं भूगोलविषयावर तीन पुस्तकें लिहिलीं. पण तिन्ही पुस्तकें अखिल जगासंबंधीं असल्यामुळें भरतखंडाविषयींच मी कांहीं पुस्तकें आधीं लिहावीत म्हणजे भौगोलिक वाङ्मयाची वाढ जगापासून न करितां मायभूमीपासूनच करावी अशी सूचना कांहीं हितचिंतकांनीं केल्यावरून मी हें पुस्तक प्रसिद्ध करीत आहें. या प्रथम खंडांत उत्तर हिंदुस्थानासंबंधींच वर्णन दिलें आहे. द्वितीय खंडांत दक्षिण हिंदुस्थानाविषयीं माहिती येईल. तेंहि काम शक्य तितकें लवकर करण्याचा विचार आहे. पण हें सर्व वाचक लोक किती सहानुभूति दाखवितील त्यावर अवलंबून राहील.

कोणतेंहि पुस्तक लिहावयाचें झाल्यास अनेक पुस्तकांचा आधार घ्यावा लागतोच. याहि पुस्तकाला अनेक वृत्तांतांचा, अनेक भाषांतील ज्ञानकोशांचा, प्रवासवर्णनांचा, सांवत्सरिकांचा, भूगोलविषयक क्रमिक आणि शास्त्रीय पुस्तकांचा आधार घ्यावा लागला आहे. अनेक पुस्तकांतून साहित्य जमवूनच हें माझें पुस्तक मीं तयार केलें आहे. म्हणून ज्या ज्या पुस्तकांतून मी हें साहित्य मिळविलें त्या सर्व पुस्तककर्त्यांचा मी अत्यंत ऋणी आहें.

ज्या संस्थेचा मी आजन्मसेवक आहें, त्याच संस्थेचे आद्य संस्थापक कुलगुरु **प्रो. आण्णा कर्वे** यांनीं या पुस्तकास आशीर्वाद देऊन मला उपकृत करून ठेविलें आहे. त्यांच्या ऋणांतून अंतशः तरी मुक्त व्हावें म्हणून मीं हें पुस्तक त्यांनाच अर्पण करीत आहें; आणि त्याचा त्यांनीं मोठ्या आनंदानें आणि अंतःकरणपूर्वक स्वीकार केला आहे यांतच मी स्वतःला धन्य समजतों.

माझ्या अनेक व्यवसायबंधूंनींहि मला योग्य शब्द सुचवून किंवा कांहीं माहिती पुरवून किंवा उपयुक्त सूचना करून अडलेल्या वेळीं मदत केली याहि गोष्टींचें महत्त्व कमी नाहीं. माझे सन्माननीय व्यवसायबंधु **प्रो. वा. म. जोशी** यांनीं तर कांहीं बहुमोल सूचना अगदीं योग्य वेळीं केल्या.

अनेक प्रकारांची माहिती, निरनिराळ्या प्रकारच्या सूचना यांचा जसा लेखकाला पुस्तक लिहिण्याच्या कामीं उपयोग होतो, त्याप्रमाणेंच योग्य प्रकारच्या नकाशांचा व चित्रांचा पुस्तक सजविण्याच्या कामीं उपयोग होतो. पुण्याचे सुप्रसिद्ध चित्रकार प्रो. स. कृ. पिंपळखरे यांनीं आपल्या अनेक व्यवसायांतून वेळ काढून या पुस्तकाच्या मुखपृष्ठावरील चित्र काढून दिलें आहे. पुस्तकांतील इतर चित्रांच्या पुनर्मुद्रणाबद्दलची अनुमति 'दि सेंट्रल् पब्लिसिटी ऑफिसर, इंडियन् स्टेट् रेल्वेज्' आणि 'बी. बी. सी. आय्. रेल्वेचे पब्लिसिटी ऑफिसर,' यांनीं दिल्यामुळें मला पुस्तकांत इतकीं सुबक चित्रें घालतां आलीं, नाहींतर चित्राविना पुस्तक ओकें ओकें दिसलें असतें. तसेंच कांहीं कांहीं चित्रें कंपन्यांच्या जाहिरातींवरून मीं घेतलीं आहेत, त्यांचाहि मी ऋणी आहें.

माझे फारां दिवसांचे स्नेही श्रीयुत दत्तोपंत ऊर्फ सदाशिव रामचंद्र सरदेसाई, समर्थ भारत छापखान्याचे व्यवस्थापक व चालक, हे प्रथमपासून अखेरपर्यंत लक्ष पुरवीत; व छपाईचें सर्व काम जणुं स्वतःचेंच असावें अशा आत्मीय भावनेनें अनेक वेळां प्रत्येक विभाग तपासून मगच तो छापण्यास परवानगी देत. यामुळें मला या बाबतींत कोणताच त्रास पडला नाहीं.

थोडेंबहुत तरी या सर्वांच्या ऋणांतून मुक्त व्हावें म्हणून या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानीत आहें.

महिलाश्रम, हिंगणें बु॥
उत्तरायणारंभः शके १८५७

वि. आ. मोडक

# अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठ |
| --- | --- |
| अर्पणपत्रिका ... ... ... ... | (३) |
| कुलगुरु अण्णा कर्वे यांचे आशीर्वादपर चार शब्द ... | (५) |
| माझे विचार आणि आभार ... ... ... | (७) |
| १ भूगोलावरील नंदनवन म्हणजेच काश्मीर ... ... | १ |
| २ नेपाळ–भूगोलावरील एकच स्वतंत्र हिंदु-राज्य ... | १५ |
| ३ सिक्कीम–भूगोलावरील एक वनस्पति-संग्रहालयच ... | २६ |
| ४ भूतान–भव्य, भयानक पण चित्ताकर्षक प्रदेश ... | ३० |
| ५ जंगलमय आसाम आणि तेथील चहाचे मळे ... | ३८ |
| ६ उत्तरेकडील पर्वतमय प्रदेशांची पाहाणी ... ... | ४९ |
| ७ पंजाब–धर्मवीर आणि कर्मवीर शीखांचा प्रदेश ... | ५७ |
| ८ सिंधुनदानें पोसलेला अर्थात् सिंध-प्रांत ... ... | ७४ |
| ९ रणशूर रजपुतांचें रणमय व राकट राजस्थान ... ... | ८१ |
| १० गंगेचें सुपीक खोरें हीच भारतीय सुवर्ण-भूमि ... | ९३ |
| ११ विंध्योत्तर पठारें अथवा मध्य हिंदुस्थान ... ... | ११८ |

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ७०२९
ठाणे

# भारतीय बांधवांचे भूप्रदेश

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. भू. नं. १३८
ता. २३/५/५३
ठाणे

# चित्रांची यादी व आभार

१. The Central Publicity Officer, The Indian State Railway's Magazine. यांच्या पूर्ण संमतीनें पुढील चित्रांचें पुनर्मुद्रण केलें आहे:—

( १ ) दिलवाडा-अबू ( २ ) यमुनेच्या तीरावरील एक रम्य स्थान ( ३ ) आकाशांतून दिसणारें अमृतसर ( ४ ) अमृतसर येथील सुरम्य सुवर्णमंदिर ( ५ ) सुरम्य सरोवराकाठीं वसलेलें उदेपूर ( ६ ) अबूच्या पहाडावरील सुंदर सरोवर ( ७ ) गुलमर्ग-काश्मीर ( ८ ) पूर्वपंजाबांतील एक खेडें ( ९ ) ने. ना. गव्हर्नर जनरलाचें निवासस्थान-सिमला ( १० ) सिमल्याची वसाहत ( ११ ) आणि कुतुब्मिनार-दिल्ली

२. याच मासिकांतून ' हिमाचलावरून वेगानें उतरणारी गंगा ' या चित्राचें मी पुनर्मुद्रण केलें आहे. ( मूळचित्रकाराचा मी अत्यंत आभारी आहें )

३. Bombay Baroda & Central India Ry. Co. Publicity & Advtsg Supdt. यांच्या पूर्ण संमतीनें पुढील चित्रांचें पुनर्मुद्रण केलें आहे:—

( १ ) मथुरेचा पवित्र घाट ( २ ) काश्मिरांतील झेलमनदीवरील नितान्त-रम्य श्रीनगर ( ३ ) खैबरखिंड आणि ( ४ ) सिंधूवरील पूल-अटक

४. पुणें येथील चित्रशाळेचे चालक रा. रा. शं. न. जोशी. यांच्या संमतीनें पुढील चित्रें पुनर्मुद्रित केलीं आहेत:—


( १ ) टाटानगर येथलि पोलादी कारखाना देखावा नं. १ व २ ( २ ) सिंध मधील घरें व उंटाची गाडी ( ३ ) यॉक आणि ( ४ ) कस्तूरीमृग


५. पुणें येथील चित्रशाळेचे चित्रकार श्रीयुत नाडगौडा व त्यांचे सहकारी यांनीं बाकीचीं सर्व चित्रें व नकाशे हीं काढून दिलीं आहेत


६. बुंदी येथील B. B. B. या छापाच्या सिमेंटकंपनीच्या कारखान्याचें चित्र जाहिरातीवरून मी पुनर्मुद्रित केलें आहें. कारखान्याच्या चालकांचा मी फार आभारी आहें.

ज्यांनीं ज्यांनीं मला परवानगी दिली व ज्यांची परवानगी घेतां आली नाहीं त्या सर्वांचाच मी अंतःकरणापासून आभारी आहें.


**वि० आ० मोडक**


उत्तर हिंदुस्थान
स्केल
मैल
मैल
फूट
फूट
तिबेट
दिल्ली
आग्रा
कानपूर
अलाहाबाद
बनारस
पाटणा
लखनौ
राजमहाल
कलकत्ता
सुंदरबन
डाका
हैदराबाद
कच्छ
सिंधु नदी
सतलज न.
राबी न.
विनाष न.
झेलम न.
यमुना न.
गंगा न.
रामगंगा न.
गोमती न.
गोग्रा न.
गंडकी न.
सोन न.
गंगा नदी
बनास न.
बेटवा न.
महानदी
गंगेचे मुख
किलात



उत्तर हिंदुस्थान
२० इंचापेक्षां कमी
२० ते ४० इंच
४० ते ८० इंच
८० इंचापेक्षां ज्यास्त
पर्जन्यमान
स्केल
मैल ० १०० २०० ३०० मैल



उत्तर हिंदुस्थान
कापूस
ज्वारी, बाजरी
गहूं
पिकें
स्केल
मैल
० १०० २०० ३००
मैल
केशर
उंच बर्फाळ डोंगराळ प्रदेश
फळे, भाजीपाला
सर्व प्रकारच्या वनस्पती
कर्क



उत्तर हिंदुस्थान
पिकें
तांदूळ
ज्यूट
चहा
स्केल
मैल ० १०० २०० ३०० मैल
सूचिपर्णी वृक्षांचा प्रदेश
यांक व कस्तूरी मृग यांचा प्रदेश
कर्क


उत्तर हिंदुस्थान
आगगाडीचे रस्ते.
मुख्यमुख्य शहरें.
● अशा खुणेपर्यंत सिंधू व ब्रम्हपुत्रा या नद्यांतून नावा जाऊं शकतात.
अ फ गा णि स्था न
ने पा ळ
ब्रम्हपुत्रा नदी
रा ज पु ता ना
आ सा म
ओ रि सा
का ठे वा ड

७०२९
१३९
भ.ग्र.नं. १३/५३९
५०२२

# १

## भूगोलावरील नंदनवन म्हणजेच काश्मीर

" उंची सुवासिक केशर म्हणजे काश्मिरांतील, भारी भरजरी शाल म्हणजे काश्मिरांतील आणि नितान्त रमणीय सृष्टिशोभा म्हणजेंहि काश्मिरांतील." अशी काश्मिराची जगभर ख्याति आहे. काश्मिराची कीर्ति काश्मिरी केशराप्रमाणेंच दिगंत पसरलेली आहे; आणि समोंवार पसरलेल्या निसर्गांतील सौंदर्याचा परिणाम तेथील नागरिकांवर झाल्यामुळेंच काश्मिरी स्त्री-पुरुषहि सुंदर व देखणे दिसतात.

असा हा नितान्त सुरम्य प्रदेश भरतखंडाच्या उत्तरेस हिमालय, काराकोरम व हिंदुकुश या उत्तुंग पर्वतांच्या रांगा जेथें एकत्र येतात त्या ठिकाणीं निर्माण झालेला आहे. एखादा चतुर कारागीर ज्याप्रमाणें एखादें सोन्याचांदीचें अगर काच-मातीचें पुष्पपात्र घडवून त्यावर सुरेख नक्षीकाम कोरतो, त्याप्रमाणें विश्वकर्म्यानें हें एक निसर्गातच सुरम्य पुष्पपात्र निर्माण करून ठेविलें आहे. पुष्पपात्रांतील पाणी रोजच्या रोज बदलून त्यांत रोजच्या रोज ताजीं फुलें पानें ठेवावीं लागतात; पण या पुष्पपात्रांतून नदीचा प्रवाह अखंड चालू असल्यामुळें जसें यांतील पाणी बदलण्याची जरूरी नाहीं, तसेंच यांतून वाहणाऱ्या प्रशान्त प्रवाहाच्या कांठावर उगवलेल्या सुंदर वेली व मनोहर वृक्ष हीं नेहमींच डुलत, पालवत व फुलत असतात, त्यामुळें फुलांचा सुगंध मंदमंद वाहणाऱ्या वाऱ्याबरोबर सगळीकडे सारखा दरवळत असतो. कोणत्याहि ऋतूंत—मग सकाळीं, दुपारीं,

संध्याकाळीं अगर रात्रीं—केव्हांहि तुम्ही जा, या ठिकाणीं तुम्हांस त्या त्या वेळेची विशिष्ट प्रकारची शोभा दृष्टीस पडेल व तें सर्व सौंदर्य जेव्हां झेलमच्या नितान्त शांत पात्रांत प्रतिबिंबित होतें तेव्हांचें दृश्य तर अवर्णनीयच वाटतें आणि म्हणूनच या प्रदेशास नितान्त रम्य असें म्हणतात.

हिंदुकुश, काराकोरम व हिमालय या तीन पर्वतश्रेण्यांच्या आंतील रांगांच्या मध्यभागीं काश्मीरचें खोरें असल्यामुळें या खोऱ्याच्या भोंवतीं उंच उंच कड्यांचे तट पसरले आहेत. खोऱ्याची उंची ५२३५ फूट असून भोंवतालच्या रांगा मेघमंडळास जाऊन थडकतात. उत्तरेकडील व पूर्वेकडील रांगा इतक्या गगनभेदी आहेत कीं, त्या नेहमींच हिमानें मढलेल्या असतात. उत्तरेकडील रांगेंतील नंगापर्वताची उंची २६,६२९ फूट आहे; आणि त्यामुळें कांहीं उतरत्या भागांतून हिमनद्याहि मुंगीच्या पायानें सरकत असतात. "हल्लीं जेथें काश्मीरचें खोरें आहे, तेथें पूर्वीं एक प्रचंड सरोवर होतें. पण मरीचिपुत्र कश्यपमुनि यांनीं या सरोवराच्या पश्चिमभागीं एक प्रचंड खिंड पाडलें. त्या खिंडींतून पाणी वाहून गेल्यामुळें हें सुंदर खोरें निर्माण झालें; आणि या खोऱ्यांतून (वितस्ता) झेलम नदी वाहूं लागली. या स्वर्गतुल्य प्रदेशांत मग कश्यपमुनींनीं ब्राह्मणांची वसाहत स्थापन केली." अशी या खोऱ्याबद्दल आख्यायिका आहे. या आख्यायिकेंत भूगोलावरील घडामोडच सांगितली आहे. या भागांत भूकंपाचे धक्के मधून मधून बसतात, आणि त्यामुळेंच हें विवर निर्माण होऊन व कांहीं भूभाग वर येऊन त्यावरून झेलम नदी वाहूं लागली असावी. त्यानंतर ही कृति एका मुनींनीं आपल्या तपोबलानें सिद्ध केली अशी कथा निर्माण झाली. कदाचित् या मुनींनीं या रमणीय प्रदेशाचा शोध लावून तेथें त्यांनीं वसाहत स्थापन केली असावी व हेंच त्यांतील सत्य असावें. परशुरामानें आपल्या बाणानें समुद्र हटवून (शूर्पारक) कोकणप्रांत निर्माण केला ही जशी आख्यायिका आहे,

तशीच ही आख्यायिका. कोकणप्रांतहि भूकंपामुळेंच समुद्रांतून वर आला असावा असें शास्त्रज्ञ मानतात. तथापि कोकणप्रांतांत जसें परशुराम क्षेत्र असल्यामुळें त्या प्रान्ताशीं या मुनिवर्याचा मूळ संबंध कांहींतरी असावा हें मान्य करावें लागतें, तसेंच कश्मीरच्या खोऱ्यांत कश्यपपुर नांवाचें गांव पूर्वी प्रख्यात होतें, आणि कश्यपपुर प्रांत असें नांव काश्मीर, गांधार ( अफगाणिस्तान ) व पंजाब या तिहींना मिळून एके काळीं देण्यांत आलें होतें. यावरून कश्यपमुनींचा संबंध येथेंहि मान्य करणें अवश्य आहे.

ज्या ठिकाणीं झेलम नदी खोऱ्यांतून खिंडींत उतरते त्या ठिकाणास बारामूळ ( वराहमूळ ) म्हणतात. काश्मीर खोऱ्याची मांडणी वायव्य ते आग्नेय अशी असून लांबी १२० मैल आहे. व जास्तींत जास्त रुंदी ७५ मैल आहे. यापैकीं ८४ मैल लांबीचा व २० मैल रुंदीचा भाग जवळजवळ सपाट आहे. दक्षिणेस पीरपंजाल पहाडाची रांग आग्नेय ते वायव्य अशी पसरली असून पूर्वेस व उत्तरेस झांस्कर पहाडाची रांग गेली आहे. या रांगेंतच वीरनाग शिखराजवळ झेलम नदी उगम पावते. तेथून ( अनंतनाग ) इस्लामाबाद या ठिकाणीं येईतों तिचा वेग बराच असतो. पण इस्लामाबाद ते श्रीनगरपर्यंत चाळीस मैलांच्या टापूंत ही सारी १७५ फूटच खालीं उतरते. श्रीनगरापासून वुलर सरोवर ओलांडून बारामुळापर्यंत जाईतों तर तिचा उतार व वेग पुष्कळच कमी होतात. म्हणजे जवळ जवळ ८० मैल ही अगदीं संथ वाहते. या ठिकाणीं हिची खोलीहि भरपूर आहे. त्यामुळें एवढ्या टापूंत या नदीवरून नौका, होड्या, पडाव यांतून पुष्कळच व्यवहार चालतो. वुलर सरोवर गोड्या पाण्याचें असून सर्व हिंदुस्थानांत तें मोठें आहे. खिंडींत झेलमचा प्रवेश झाल्यानंतर मात्र तिचा वेग जो पुन्हा वाढतो तो पंजाब प्रान्तांत सखल भागीं जाईपर्यंत संथ होत नाहीं.

पीरपंजाल रांग आड आल्यामुळें काश्मिराच्या खोऱ्यांत मोसमी वाऱ्यांचा पाऊस नियमित पडत नाहीं. मात्र पीर पंजालच्या माथ्यावर जेव्हां जोरांत वृष्टि होते, तेव्हां मधून मधून काश्मिराच्या खोऱ्यांतहि कांहीं जोराच्या सरी पडतात. पुष्कळ वेळां काश्मिराचें खोरें कोरडें असतें; पण दक्षिणेकडील पीरपंजाल पहाडावर व उत्तरेकडील झांस्कर रांगांवर प्रचंड मेघराशी गरजत असतात. विजा चमकतात आणि एकसारखा वर्षाव होत असतो. मात्र त्यामुळें काश्मिराच्या खोऱ्यांत पाणीच पाणी होतें. त्याचप्रमाणें ऑक्टोबर ते मार्चपर्यंत या दोन्ही पहाडांवर हिम पडत असतें. पण काश्मिराच्या खोऱ्यांत डिसेंबर महिन्यांतच काय तें हिम पडतें. उन्हाळ्यांत ( जुलै, ऑगस्ट आणि सप्टेंबर या महिन्यांत ) सावलींत ८९ अंशांपलीकडे उष्णतामान क्वचितच वाढतें. काश्मिराच्या खोऱ्यांत झेलमनदीचे कालवेहि बरेच काढले आहेत. कालव्यांचा उपयोग शेतीला, फळबागांना, उपवनांना व दळणवळणांना पुष्कळच होतो. या खोऱ्यांत भात, मका, गहूं, बार्ली, वरी, नाचणी हीं एकदल धान्यें व दुसरीं बरींच द्विदल धान्यें, गळिताचीं धान्यें, कापूस, तंबाखू, या सर्वांचें पीक चांगलें येतें. त्याचप्रमाणें येथील बदाम, सफरचंद, पीच, प्लम, ॲप्रिकॉट, पेअर, द्राक्षें, स्ट्रॉबेरी इत्यादि फळें नामांकित आहेत.

येथील थंड हवेमुळें ॲसपॅरेगस, आर्टिचोक, सॅलेल, चपटे घेवडे, बीटरूट, कॉलीफ्लॉवर, कोबी इत्यादि युरोपमध्यें होणारा सर्व भाजीपाला मुबलक होतो. येथें तुतीचीं झाडेंहि पुष्कळ वाढत असल्यामुळें रेशमी किड्यांची जोपासना चांगली होते. येथील डौलदार चिनार वृक्षांच्या रांगा तर प्रदेशाला अप्रतिम शोभा देतात.

यांशिवाय पॉपलर, विलो, देवदार, फर, सुरु, अक्रोड, सफेदा, चेरी व बदाम इत्यादि झाडें पर्वतांच्या उतारावर, माथ्यावर व सखल प्रदेशांत जिकडे तिकडे वाढलेलीं आहेत. पण येथील जगविख्यात व नामांकित

५५४ ता. ३।५।३

पीक म्हणजे केशराचें. या पिकाचा भर वर्षर्तु व शरदृतु यांच्या दरम्यान असतो. हजारों एकर जमिनींत याची लागवड केलेली असते. असंख्य चौकोनी वाफ्यांतून ओळीनें लावलेल्या झुडुपांना जेव्हां एक-जात शेंदरी फुलें येतात, तेव्हां जो या अफाट शेतांचा वैभवसंपन्न देखावा दिसतो तो प्रत्यक्षच पाहावा. आपल्याकडे कुसुंब्याच्या झुडुपांना अशीं फुलें येतात खरीं; पण केशर तें केशर! आणि कुसुंबा तो कुसुंबा!! काळ्या मातीला कोणी शहाणा मनुष्य कस्तुरी म्हणेल का?

काश्मीरच्या खोऱ्यांतील दुसरें सौंदर्य म्हणजे झेलम नदीच्या संथ पात्रावरील आणि दाल सरोवराच्या शांत पृष्ठभागावरील तरत्या फुलबागा व फळबागा होत. पाण्यांत जिकडे तिकडे कमलतांचें जाळेंच पसरलेलें असतें आणि या कमललतांच्या तरंगणाऱ्या विशाल गोल पानांवर मातीचे थर पसरून त्यांवर नाना प्रकारांचीं फुलझाडें व फळझाडें लावलेलीं असतात. कित्येक वेळीं हरतऱ्हेचा भाजीपाला यावर पिकवितात. कमलांच्या वेलींप्रमाणेंच शिंगाड्यांच्या वेलीहि सगळीकडे वाढलेल्या असतात. शिंगाड्यांचा उपयोग आपण उपवासाच्या दिवशीं रताळींप्रमाणें करतो. पण इकडे शिंगडा नेहमींच खातात. या तरत्या बागांमुळें झेलम नदीचा व दाल सरोवराचा देखावा अतिशय रंगीबेरंगी दिसतो. जणूं कांहीं या जोडीनें एकमतानें वेलबुट्यांचे चित्रविचित्र रंगांचे शालूच परिधान केले आहेत. असंख्य फुलांचा एकवटलेला सुगंध जेव्हां दरवळतो तेव्हां त्यानें सर्व खोरेंच भरून जातें, इतकें कीं, मोगल बादशहाचे दिवाणखानेसुद्धां अशा प्रकारच्या सुगंधांनीं कधींहि भरून गेले नसतील. येथील निषादबाग व शालीमारबाग म्हणजे स्वर्गांतील देवेंद्राचींच उद्यानें होत.

या खोऱ्यांतील मुख्य नगर म्हणजे श्रीनगर. आणि खरोखर एके काळीं नांवाप्रमाणें हें श्रीचें म्हणजे वैभव व सौंदर्यसंपन्न लक्ष्मीचें नगर होते, तरी आरोग्यदृष्ट्या हल्लीं हें फार गलिच्छ आहे. हें नगर

झेलम नदीच्या दोन्ही तीरांवर प्रवरसेन राजानें सहाव्या शतकाच्या आरंभीं वसविलें. या नगराच्या पुष्कळ भागांतून रस्त्यांऐवजीं कालवेच नेले आहेत. नदीकांठीं व कालव्याकांठीं घरांच्या रांगा अगदीं भिडून बांधलेल्या आहेत. हीं घरें बांधण्याच्या कामीं लांकडांचा अतिशय उपयोग केलेला असतो. दारें, खिडक्या, खांब, तक्तपोशी, छप्पर, भिंती सर्वच कांहीं लांकडाचें केलेलें असतें. घरें बहुतेक तिमजली बांधावीं लागतात. पहिला मजला निजण्याबसण्यास निरुपयोगीच असतो. कारण कोणत्याहि दिवसांत त्यांत ओल असते. पावसांत पाऊस म्हणून, उन्हाळ्यांत नद्यांना पूर येतो म्हणून, थंडीच्या दिवसांत बर्फ पडतें म्हणून; बरेच लोक नौकांतूनच घराप्रमाणें राहातात; यांचा त्यांना दोनतीन तऱ्हांनीं उपयोग होतो: एक असा कीं, या नौका कोठेंहि नेतां येतात. एके ठिकाणीं राहून कंटाळा आला, कीं चला दुसरीकडे. दुसरा उपयोग म्हणजे पोट भरण्याचें यांचें हें साधन असतें. कारण या नौकांतून पैल-तीराकडे जाणाऱ्या लोकांना नेणें हा या नावाड्यांचा मुख्य धंदा असतो. याकरितां नावेचा एक भाग मऊ गाद्यागिरद्यांनीं मढविलेला असून तो फुलापानांनीं सुशोभित केलेला असतो. या लोकांना शहरांत राहणाऱ्या लोकांपेक्षां शुद्ध हवा मिळते हाहि कमी फायदा नाहीं. या नावांना किस्ती किंवा शिकारी म्हणतात. नदीच्या एका तीरावरून दुसऱ्यावर जाण्याकरितां सहा सात ठिकाणीं पूल बांधण्यांत आले आहेत. शहरांतील रस्ते अतिशय अरुंद आहेत. नदीच्या दक्षिण तीरावर एक किल्ला असून त्यांत जुना राजवाडा आहे. शहरांत देवळेंहि बरींच आहेत; पण जामी मशीद आणि शहाहमदान मशीद या मशीदी फारच मोठ्या आहेत. त्यांतल्या त्यांत शहाहमदान मशीद फारच भव्य व सुंदर आहे. मात्र या शहराला सौंदर्य असून आरोग्य नाहीं, हें या शहराला मुळींच

शोभत नाहीं. उन्हाळ्यांत श्रीनगरचें उष्णतामान ९५° हून जास्त वाढतें. याचाहि येथील लोकांना त्रासच होतो.

काश्मीरच्या खोऱ्यांत पुष्कळच पुरातन व प्रसिद्ध देवालयें आहेत. श्रीशंकराचार्यांचें देवालय तर श्रीनगरच्या जवळ असलेल्या एका टेकडीवर इ. स. पूर्वी २२० या वर्षी बांधलें. या टेकडीचें पूर्वींचें नांव राजा-संधमन असें होतें. पण हल्लीं या टेकडीला तख्त-इ-सुलेमान किंवा सॉलोमन राजाचें सिंहासन असें नांव अनुक्रमें मुसलमान व ख्रिस्ती लोकांकडून देण्यांत आलें आहे. ( अनंतनाग ) इस्लामाबाद शहरा-जवळील एका करेवावरील ( म्हणजे पठारावरील ) श्रीमार्तंडाचें म्हणजे श्रीसूर्यनारायणाचें देवालय फारच सुरेख आहे. या देवळावरून दिसणारा झेलम नदीच्या खोऱ्याचा देखावा अप्रतीम वाटतो. जवळच एका गुहेंत भूमझो नांवाची गुहा आहे. तीहि प्रेक्षणीय आहे. श्रीनगरच्या दक्षिणेस १५ मैलांवर असलेल्या अवंतिपूर गांवीं कांहीं देवळांचे अवशेष पहाण्या-सारखे आहेत. इतरहि अनेक देवळें किंवा त्यांचे अवशेष अद्याप चांगल्या स्थितींत आहेत. काश्मीरच्या खोऱ्यांत ज्याप्रमाणें अनेक देवळें सर्वत्र पसरलीं आहेत त्याचप्रमाणें याच खोऱ्यांतून असंख्य चिमुकलीं चिमुकलीं पठारें ( यांना तेथील लोक करेवा म्हणतात ) दोहों बाजूंच्या उंच पाहाडांच्या रांगांपासून थेट नदीच्या पात्रापर्यंत जणूं कांहीं चपट्या सोंगट्यांप्रमाणें निसर्गानें मांडून ठेवलीं आहेत. यांची उंची शंभर फुटां-पासून तीनशें फुटापर्यंत असते. झेलमचें खोरें व या सपाट टेकड्या हीं चिकण माती, वाळू व गोटे यांचीं बनलेलीं असल्यामुळें खोरें व टेकड्या हीं सुपीक झालीं आहेत.

अशा या निसर्गरमणीय प्रदेशांत, नव्हे या भूगोलावरील नंदनवनांत राहात असूनहि येथील लोक मोठे सुखी आहेत असें मात्र नाहीं. याला अनेक कारणें आहेत. ज्या निसर्गांतील प्रभावी शक्तीमुळें हा सुंदर

प्रदेश निर्माण झाला, त्याच शक्तीच्या लहरी स्वभावामुळें येथील लोकांवर अनेक वेळां आपत्ति कोसळल्या आहेत. खरोखरच अशा वेळीं या लोकांवर आकाशांतील कुऱ्हाड कोसळते. विद्युत्पात, भूकंप, पूर, दुष्काळ, रोगांच्या सांथी आणि शहरांना लागणाऱ्या आगी यांमुळें लोकांचा संहार, शेतांची नासाडी आणि घरादारांची राखरांगोळी इत्यादि गोष्टींमुळें अनेक वेळां येथील प्रदेशाचा प्रदेश उध्वस्त झालेला आहे. हा झाला पंचमहाभूतांनीं केलेला छळ. पण इतर देशांतील लोकांनीं मुद्दां यांना कमी छळलें नाहीं.

श्रीमंतांना ज्याप्रमाणें चोरदरोडेखोर यांपासून नेहमींच त्रास होत असतो, किंवा जवळच्या श्रीमंतीमुळेंच वेळीं त्यांना जीवासहि मुकावें लागतें, त्याचप्रमाणें संपन्न राष्ट्रांना आजूबाजूंच्या कंगाल मुलुखांतील लुटारू लोकांपासून फार त्रास सोसावा लागतो, नव्हे हे लोक संपन्न देश लुटून तो उध्वस्त करतात. काश्मीरच्या खोऱ्यावरहि हें संकट अनेक वेळां कोसळलें आहे. तसेंच सौंदर्यसंपन्न स्त्रीवर ज्याप्रमाणें अनेक दुष्ट दुर्योधनांनीं अगर नीच कीचकांनीं बलात्कार करून तिला आपली दासी करण्याचा जबरदस्त प्रयत्न केला, त्याचप्रमाणें हें नंदनवन आपलें आरामस्थान करण्याच्या हेतूनेंहि या नितान्त रमणीय प्रदेशावर अनेक राजे लोकांनीं व बादशहांनीं चाल करून तो पादाक्रांत केला आहे. पण या सगळ्यांचा परिणाम तेथील लोकांना इतका व इतक्या वेळां भोगावा लागला आहे कीं, ते लोक स्वाभिमानशून्य, उदास, आपमतलबी व संशयग्रस्त असे झाले आहेत. अंधश्रद्धेमुळें व वेडगळ चालीरीतींमुळेंहि त्यांच्या या हीन स्थितींत भरच पडली आहे.

येथील मूळचे लोक हिंदु. काश्मिरी पंडित एके काळीं दक्षिणोत्तर काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत व पूर्वपश्चिम सिंध ते बंगाल्यापर्यंत प्रख्यात होते. खुद्द काशींतहि त्यांचें मोठें वजन असे. काश्मिरी पंडितानें



गुलमर्ग ( काश्मीर )



काश्मिरांतील झेलम नदीवरील नितान्तरम्य श्रीनगर

अंगावर परिधान केलेल्या भरजरी शालीची किंमत १०००|१२०० रुपयांपर्यंत सहज भरत असे. अशी त्यांची श्रीमंती आणि अशी त्यांची विद्वत्ता होती ! पण आज त्याच काश्मिरांत पांच जणांत एक हिंदु आहे; आणि हे सर्व दुबळे झाले आहेत ! ! आणि या पंडितांचा संस्कृत भाषेचा अभ्यासहि फारसा नसतो. यांची मूळ भाषा पैशाची. ही संस्कृत भाषेची बहीणच होय. काश्मिरांत एके काळीं संस्कृत भाषेचेंच जास्त वर्चस्व होतें. पण हल्लीं मुसलमान लोकांचा विशेष भरणा असल्यामुळें मूळ पैशाची भाषेंत परशीयन व उर्दू शब्द येऊन काश्मिरी भाषा बनली आहे. पंडितांच्या म्हणजे हिंदु लोकांच्या भाषेंत मात्र बरेच संस्कृत शब्द येतात.

काश्मिरांत अगदीं पूर्वीं नागाला भजणारे लोक रहात होते. अनंत-नाग, विचार-नाग, वीर-नाग, नार-नाग अशीं त्या लोकांनींच दिलेलीं नांवें होत. महाभारतकालीं मात्र येथें हिंदु ( ब्राह्मण व क्षत्रिय ) लोक रहात होते. त्यानंतर अशोक सम्राटानें इ. स. पूर्वीं २४५व्या वर्षी बुद्ध धर्माचा प्रचार करण्याकरितां कांहीं बुद्ध भिक्षूंना पाठविलें. सुमारें १५०० वर्षें काश्मिरांत हे दोन्ही धर्म सुखानें नांदत होते. पण इ. स. १२९४ सालीं शमसुद्दीन नांवाच्या मुसलमानी वजिरानें उद्यानदेव या हिंदुराजाचा खून करून काश्मीरची गादी बळकाविली. पुढें मग मुसल-मानांपैकीं कधीं मोंगलांनीं तर कधीं इराणी किंवा दुराणी लोकांनीं या प्रांतावर राज्य केलें. परत १८१९ सालीं पंजाबच्या रणजितसिंह या शीख राजानें हा प्रांत जिंकून घेतला व तेथें पुन्हा हिंदु राज्याची स्थापना केली. या प्रांताचा कारभार पाहण्याकरितां तो कधीं हिंदु तर कधीं मुसलमान अधिपतींना पाठवीत असे. काश्मीरप्रमाणेंच काश्मीरच्या दक्षिणेस जम्मू नांवाचा प्रांत आहे. त्या प्रांताचें राज्य रणजितसिंहानें आपला सरदार गुलाबसिंह यास बहाल केलें होतें. १८४६ सालीं

ब्रिटिश सरकारशीं शीख लोकांचें भांडण उत्पन्न होऊन युद्ध झालें. त्यांत शिखांचा पराजय झाल्यामुळें शिखांना ब्रिटिश सरकारास दीड कोटि रुपये व कांहीं मुलूख द्यावा लागला. दीड कोटि रुपये देतां येईनात म्हणून त्या ऐवजीं काश्मीर व हजारा हे दोन प्रांत ब्रिटिशांना शिखांनीं देऊं केले. पण ब्रिटिशांनीं काश्मीर प्रांत गुलाबसिंहास तितक्या किमतीस दिला. कारण गुलाबसिंहानें तह घडवून आणण्यांत मदत केली होती. गुलाबसिंहानें आसपासचा मुलूखहि ताब्यांत घेतला होता. याप्रमाणें हल्लीं काश्मीर व जम्मू मिळून एक संस्थान आहे व तें गुलाब-सिंहाच्या वंशजांकडेच चालू आहे. हें घराणें डोग्रा जातीच्या रजपुतांचें होय. डोग्रा जातीचे रजपूत चांगले लढवय्ये आहेत. हल्लींच्या राजाच्या पदरीं सुमारें ७८०० सैन्य याच रजपूत लोकांचें आहे. हल्लीं श्रीहरि-सिंगजी बहादूर हे या संस्थानावर राज्य करितात. संस्थानचें एकंदर वार्षिक उत्पन्न २ कोटि ७० लक्ष रुपये असून संस्थानास कर्ज मुळींच नाहीं. उलट तिजोरींत खूप शिल्लक आहे. हल्लींचे राजे १९२५ सालीं ज्या वेळीं राज्यारूढ झाले, त्या वेळीं त्यांनीं जवळ जवळ १००० पाहु-ण्यांना सोन्याच्या ताटांत मेजवानी दिली होती. यावरून त्यांच्या तिजो-रींची शिल्लक किती अपरंपार असावी याचा अंदाज करतां आल्यास करावा. काश्मीरच्या खोऱ्यांतील श्रीनगर ही या संस्थानची उन्हाळ्यांतील राजधानी व जम्मू ही हिंवाळ्यांतील राजधानी. जम्मू हें शहर तावी नदीच्या उजव्या तीरावर हिमालयाच्या पायथ्याशीं वसलेलें आहे. भोंव-तालचा प्रदेश सखल व सपाट असल्यामुळें नदीवरील टोलेजंग राजवाडा उठून दिसतो. जम्मू शहरापर्यंत पंजाबमधील सिआलकोट स्टेशनाहून एक लोहमार्ग नेला आहे. पुढील प्रान्तांत पर्वतांच्या अनेक रांगा एकीपुढें एक उंचच उंच पसरत गेल्या असल्यामुळें लोहमार्ग नेणें परवडत नाहीं

जम्मू व काश्मीर मिळून एकंदर क्षेत्रफळ ८४,२६० चौरस मैल आहे. एवढ्या प्रदेशाचा विस्तार उत्तर अक्षांश ३२° ते ३७° व रेखांश ७३° ते ८०° इतक्या भागांत पसरलेला आहे. हा प्रांत कवोष्ण कटिबंधांत येत असल्यामुळें येथील उष्णता हिंदुस्थानांतील इतर भागांपेक्षां कमी असणारच. त्यांत बहुतेक सर्व प्रदेश पर्वतमय आणि जों जों उत्तरेकडे जावें तों तों जास्त जास्त उंच होत गेला असल्यामुळें तो क्रमाक्रमानें जास्त जास्त थंड झाला आहे. मात्र खोऱ्यांतील हवा त्या मानानें पुष्कळच उष्ण असते. या संस्थानांतील प्रदेशांत एकंदर तीन मुख्य खोरीं आहेत. ( बारीक सारीक पुष्कळच आहेत. ) पहिलें खोरें सिंधु नदीचें. ही नदी तिबेटांतील मानस सरोवराच्या पश्चिमेस असलेल्या कैलास पर्वताच्या पश्चिम उतारावर उगम पावते. कैलास पर्वताचा उतार उतरल्यावर आग्नेय ते वायव्य दिशेनें काराकोरम व झांस्कर या दोन पर्वतश्रेणींच्या मधून काश्मीरच्या वायव्य भागीं येऊन नंगापर्वतास वळसा घालून सरहद्दीवरील कोहिस्तान प्रान्तांत उतरते. सिंधु नदीमुळें काश्मीर संस्थानचे सारखे दोन भाग होतात. दुसरें खोरें झेलम नदीचें. यासच काश्मीरचें खोरें म्हणतात. आणि या खोऱ्याबद्दल आपण पुष्कळच माहिती मिळविली आहे. तिसरें खोरें चिनाब नदीचें. हिलाच चंद्रभागा असेंहि म्हणतात.

काराकोरम पर्वत नेहमीं बर्फाच्छादित असून त्याचा उत्तरेकडील भाग भयाण, वैराण व निर्जन असाच आहे. या पर्वताचें मुख्य शिखर गॉडविन ऑस्टेन. याची उंची २८,२५० फूट आहे व जगांत गौरीशंकरानंतर याचाच अनुक्रम लागतो. यालाच $K_2$ असेंहि म्हणतात. या पर्वताच्या माथ्यावर पुष्कळ हिमनद्या आहत. शायॉक नदी या पर्वताच्या पूर्व टोकाला वळसा घालून नंतर जवळ जवळ २५० मैल वायव्य दिशेनें खोल दरींतून वाहात जाते व मग सिंधु नदीला मिळते. या नदीमध्यें पुष्कळ वेळां बर्फाचे डोंगर दोहों बाजूंच्या पर्वतांतून कोसळतात. हे जर लवकर

वितळून प्रवाहांत मिसळले नाहींत, तर यांचा बांध बसतो व नदीचें पाणी अडविलें जातें आणि मग यदाकदाचित् एकाएकीं बांध फुटला तर सिंधु नदीला एकदम पूर येतो व तिच्या कांठीं वसलेल्या शहरांचें अपरमित नुकसान होतें. १९२९ सालीं असा कांहींसा प्रकार घडला होता. झेलम नदीच्या बाबतींतहि बारामुळा ठिकाणीं व आसपास असे बांध मधून मधून बसतात. म्हणूनच अशा वेळीं काश्मीरच्या खोऱ्यांत पूर येऊन चोहोंकडे पाणीच पाणी होतें.

जम्मू व काश्मीर या संस्थानांचे जम्मू, काश्मीर, लडक, बाल्तिस्तान व गिलगिट असे मुख्य प्रांत आहेत व यागिस्तानचे संस्थानिक कांहीं अंशीं मांडलिक आहेत. पैकीं जम्मूंत चिनाब नदीच्या खोऱ्याचा समावेश होतो. काश्मिरांत झेलम व किशनगंगा या नद्यांच्या खोऱ्यांचा. गिलगिट हा गिलगिट नदीच्या कांठीं पसरलेला प्रांत होय. बाल्तिस्तानांत सिंधूच्या कांठीं असलेला प्रदेश आहे. आणि लडकमध्यें ईशान्येकडील काराकोरम व पूर्वेकडील झांस्कर पर्वतांचा भाग येतो.

या संस्थानांत खनिज संपत्ति अशी फारशी नाहींच. कारण आजपर्यंत या दृष्टीनें या प्रदेशाची पाहणी करण्यांत आली नव्हती. अलीकडे तशी पाहणी करण्यांत आली असून सोनें, इंद्रनील, दगडी कोळसा, चिनी माती, पाटीचे दगड, शिसें, जस्त, तांबें इत्यादि खनिज पदार्थ सांपडतात असें आढळून आलें आहे. उद्भिज संपत्तीमध्यें देवदार, फर इत्यादि लांकूड, बऱ्याच प्रकाराची फळफळावळ, केशर, बदाम, वगैरे जिन्नस मुख्य होत. काश्मिरांत उंची शाली, सुंदर गालीचे व रंगीत रेशमी कापड यांची निपज पुष्कळच होते. त्यांतल्या त्यांत रेशमी तंतु तयार करण्याचा एवढा प्रचंड कारखाना जगांत कोठेंहि नाहीं असें म्हणतात. तसेंच लांकडाचें कोरीव व कांतीव काम, सोन्याचांदीवरील नक्षीकाम आणि कागदाच्या लगद्याच्या पदार्थांवरील वेलबुट्टीचें काम इत्यादि

कलाकुसरीच्या कामाबद्दल या संस्थानचा चांगलाच नांवलौकिक आहे. तथापि लोकांचा मुख्य धंदा म्हणजे शेती करणें व मेंढ्या पाळणें हा होय. लाकडें कापण्याचा धंदा बऱ्याच ठिकाणीं चालतो. रामबन येथें एक मोठा कारखाना आहे. या ठिकाणीं पर्वतावरील लांकूड चिनाब नदीच्या प्रवाहाबरोबर वाहून नेतां येतें.

काश्मिरी लोकांचें मुख्य अन्न म्हणजे भात व भाजी. बहुतेक लोक मांसाहारीच आहेत. ब्राह्मण सुद्धां मांस खातात. त्यांचा पोशाख तेथील हवेला योग्य असाच आहे. बायका विजारी घालतात व तीवर एक कफनी-वजा लोकरी आंगरखा असतो आणि डोक्यावरून ओढणी असते. गळ्यांत, कानांत, कपाळावर आणि हातांत मोठमोठाले दागिने असतात. डोक्यावर रेशमी किंवा जरीची टोपी असते. पुरुष विजारीवरून कफनी घालतात. कफनीच्या आंत थंडीच्या दिवसांत एक कांगरी म्हणजे गळ्यांत अडकव-लेली शेगडी असते, यामुळें बरीच ऊब मिळते. पण केव्हां केव्हां या-मुळेंच आगी लागतात. डोक्याला कानावरून शाली गुंडाळलेल्या असतात. मुसलमान लोक डोक्याला चिकटून बसणारी टोपी घालतात.

काश्मीर देशाचें सौंदर्य पाहण्यास व तेथें कांहीं दिवस चैनींत व आरामांत घालविण्यास प्रतिवर्षी पुष्कळ दूरदूरचे लोक येतात. यूरोपिअन लोकांना तर हा देश फारच प्रिय झालेला आहे. कारण येथील थंड हवा, रसभरित फळफळावळ, निसर्गाची रम्य शोभा या गोष्टी यूरोपांतील आल्प्स् पर्वतांतील स्वित्सरलंड देशाहूनहि सरस आहेत असें पुष्कळांचें मत आहे. गुलमर्ग (उंची ७५०० फूट), पेहेलगांव (७२००), किलनमर्ग, टंगमर्ग हीं स्थळें या लोकांचीं हवा खाण्याचीं ठिकाणें म्हणून प्रख्यात आहेत. गुलमर्ग म्हणजे फुलांनीं नटलेलें मैदान असा त्याचा अर्थ आहे; आणि येथील मैदान खरोखरच अनंत सुंदर सुंदर रंगीबेरंगी फुलांनीं गजबजलेलें असतें. (गुल= फूल; मर्ग=मैदान.) येथील पर्वतांच्या रांगा व हिमाच्छादित शिखरें

यांच्या मानानें आपूल्स् पर्वत बुटका वाटतो. एम्. एस्. एम. रेल्वेची आगगाडी जी. आय्. पी. रेल्वेच्या आगगाडीपुढें जशी छोटी व बुटकी वाटते तसाच हा प्रकार होय. कारण येथील पर्वतांची सरासरी उंचीहि १५००० फूट आहे.

काश्मीर संस्थानांत जाण्यास नॉर्थ वेस्ट फ्रॉंटिअर लोहमार्गावरील पथनकोट, सिआलकोट, जम्मू व रावळपिंडी हीं मुख्य स्टेशनें होत. रावळपिंडीहून व जम्मूहून श्रीनगरकडे जाण्यास मोटारीस जाण्यायेण्या-सारख्या चांगल्या सडका आहेत. सर्व जगांत इतक्या सुंदर सडका नाहींत. रावळपिंडीहून २०० मैल आणि जम्मूहून १६४ मैल अंतर आहे. इतर मार्ग बिकट असून त्या मार्गांनीं जावयाचें झाल्यास पायींच प्रवास करणें बरें. उंटाचा, खेचरांचा, गाढवांघोड्यांचा उपयोग होतो, नाहीं असें नाहीं. यॉकचा तर फारच उपयोग होतो. काश्मिराच्या उत्तर भागांत प्रवास करावयाचा झाल्यास तो तेथील लोकच करूं जाणे. इतके घाट, इतक्या खिंडी, इतके उतार व इतके चढ लागतात कीं नको तें जाणें असेंच कोणासही वाटेल. पण तेथें असे कांहीं व्यापारी आहेत कीं त्यांचा जन्म या वैराण प्रदेशांतून प्रवास करण्यांतच जातो. काश्मिराच्या उत्तरेस असलेल्या मध्य आशियाशीं यांचा व्यापार चालतो. लेह ( उंची ११,५०० फूट ) या ठिकाणीं या व्यापारी लोकांचा जेव्हां तळ पडतो, तेव्हां नेहमीं निर्जन वाटणाऱ्या प्रदेशांत जिकडे तिकडे तंबू, राहुट्या यांची खेंचाखेच होते. गाढवें, उंट, खेचरें व यॉक हीं सर्वत्र चरत असतात. व निरनिराळ्या धर्मांचे लोक एकत्र येऊन निरनिराळ्या भाषांतून परस्परांशीं समजेल अशा तऱ्हेनें सौदा ठरवीत असतात. येथून चिनी तुर्कस्तानाशीं व्यापार चालतो. येथें पिशूना लोंकर, शुभ्र घावळ्या, जाड कांबळीं व रंगीत गालिचे यांचाच मुख्य व्यापार होतो. हिमालय पर्वता-वर याशिवाय दुसरा कोणता व्यापार होणार !

# २

# नेपाळ—भूगोलावरील एकच स्वतंत्र हिंदु-राज्य

## ‘ नेपाळेश्वरभाललग्न चिखला कस्तूरिका मानिती ’

वरील चरणाचा अर्थ असा आहे कीं, नेपाळ देशाच्या महाराजाधिराजानें आपल्या भालप्रदेशावर म्हणजे कपाळावर ( काळी माती ) चिखल लिंपला तरी तो चिखल नसून कस्तूरी आहे, असेंच लोक समजतात. यांत नेपाळेश्वराचें जसें ऐश्वर्य वर्णिलें आंहे, तसेंच नेपाळांतील पर्वतप्रदेशावरील हिरवळीवर उपजीविका करून स्वैरपणें इतस्तत: भटकणाऱ्या असंख्य मृगांच्या नाभींतून सांठविलेल्या कस्तुरीचें वैपुल्यहि दाखविलें आहे. कस्तुरीची किंमत सगळ्या जगाला पटलेली आहे. कारण कस्तुरीचा सुवास कधीं लपणेंच शक्य नाहीं.


नेपाळ देश म्हणजे काश्मिरापासून आसामापर्यंत जी हिमालय पर्वताची कमान पसरलेली आहे, तिच्या मध्यभागाच्या दक्षिण उतारावर पसरलेला देश होय. या प्रदेशाची जास्तींत जास्त लांबी ५२५ मैल असून रुंदी कमींत कमी ९० व जास्तींत जास्त १४० आहे व एकंदर क्षेत्रफळ सुमारें ५६,००० चौरस मैल आहे. या प्रदेशाची भूरचना चढत्या जिन्यासारखी आहे. म्हणजे अगदीं दक्षिणेकडे पायथ्याशीं तराई नांवाचा सखल दलदलीचा प्रदेश असून तेथून उत्तरेकडे जों जों जावें तों तों जिन्याच्या पायऱ्यांप्रमाणें एकीहून एक उंच अशा पूर्वपश्चिम पसरलेल्या पर्वतांच्या रांगा एकीपुढें एक लागतात. मात्र दोन रांगांमध्यें थोडासा

सखल भाग असतो. शेवटच्या शेवटच्या रांगा तर इतक्या उंच आहेत कीं, यांचीं बरींच शिखरें २०,००० फुटांहून उंच असल्यामुळें तीं नेहमीं हिमाच्छादित असतात. या शिखरांपैकीं धवलगिरी (२६,७९५), गौरीशंकर (२९,००२), कांचनगंगा (२८,४६०) हीं शिखरें तर अखिल जगांत प्रख्यात आहेत. गौरीशंकर म्हणजे माउंट एव्हरेस्ट. हें या भूगोलावरील अत्युच्च शिखर होय; आणि याच शिखरावर जाण्याची आज दहापंधरा वर्षें मनुष्याची सारखी धडपड चालली आहे. पण या शिखरावर आपलें पाऊल रोंवून आपल्या राष्ट्राचें निशाण फडफडविण्याची महत्त्वाकांक्षा अद्याप कोणत्याही राष्टांतील मनुष्यास सिद्धीस नेतां आलेली नाहीं. मात्र या वर्षीं पाश्चात्य राष्ट्रांतील साहसी पुरुषांनीं या शिखरावरून विमानोड्डाण केलें आहे, आणि हें त्यांचें विमानोड्डाण म्हणजे पुढील यशाचेंच पूर्वचिन्ह होय.


या देशाच्या उत्तरेस ब्रह्मपुत्रा नदीचें खोरें असून त्याच्या पलीकडे तिबेटचें पठार आहे. पूर्वेस सिकीमचें संस्थान व बंगालचा दार्जिलिंग जिल्हा, दक्षिणेस बिहार व संयुक्त प्रांत आणि पश्चिमेस संयुक्त प्रांताचा पहाडी कुमान परगणा अशा याच्या सीमा आहेत.

नेपाळांतून अनेक लहानमोठ्या नद्या दक्षिणेकडे उतरतात. पण या नद्यांपैकीं चार नद्यांचीं खोरीं मुख्य समजतात. पहिलें खोरें घोग्रा नदीचें. हिला काली, शरयू, शारदा, भेरी, रॉप्ती इत्यादि आसमन्तां-तील नद्या येऊन मिळतात. अपिशिखर ते धवलगिरी एवढ्या टापूंतील या नद्या होत.

दुसरें खोरें गंडकी नदीचें. हिला धवलगिरी ते गोसावीठाण या दोन शिखरांमधील प्रदेशांतील नद्या येऊन मिळतात. तिसरें खोरें बागमती व कुमला या नद्यांचें झालें आहे. चवथें खोरें गौरीशंकर व




नेपाळ




नेपाळ



कस्तूरी–मृग

ता. १३/५/३७

कांचनगंगा या शिखरांच्या मध्यभागीं असलेल्या प्रदेशांतून वाहणाऱ्या सप्तकुशी व सानकुशी या नद्यांचें झालें आहे.

पर्वतांच्या उतारांवरून वेगानें उतरत असतांना या नद्यांचा शेतीकडे जवळ जवळ कांहींच उपयोग होत नाहीं. पण पर्वतांच्या पायथ्याशीं असलेल्या तराईच्या सखल भागांत या नद्यांच्या ओघांबरोबर धुपून येणाऱ्या मातीचे थर सांचले आहेत; त्यांमुळें तेथील जमीन पुष्कळ सुपीक झाली आहे आणि नेपाळ देशाचें हेंच खरें कोठार होय. पण याहि भागांत पुष्कळ ठिकाणीं दलदल, जंगल आणि अरण्यें हीं माजलीं आहेत· त्यामुळें हवा उष्ण, दमट व रोगट अशी असते. म्हणूनच येथें राहावयास लोक नाखूप असतात व जे राहतात ते सदानकदा आजारी किंवा आळसलेले असतात. तथापि या भागांत पाण्याच्या कमी जास्त पुरवठ्याप्रमाणें तांदूळ, ऊंस, कापूस, तंबाखू, तूर, हरभरा, गहू, नीळ, खसखस हीं पिकें उत्तम होऊं शकतात.

नेपाळांत जून ते सप्टेंबर-ऑक्टोबरपर्यंत पावसाळा असतो. दिसेंबर-मध्यें बहुतेक सर्व पर्वतांच्या रांगा बर्फानें आच्छादलेल्या असतात व दऱ्याखोऱ्यांतून धुकें पसरलेलें असतें. जान्युआरी व फेब्रुआरी या दोन महिन्यांतहि मधून मधून पाऊस पडतो. एप्रिल व मे महिन्यांत वळवाचा पाऊस पडतो. वार्षिक पर्जन्यमान सुमारें ६० ते ८० इंच आहे.

ऑक्टोबर ते मेअखेर नेपाळांतील हवा आल्हादकारक असते. विशेषत: दुपारीं उन्हाचा त्रास मुळींच होत नाहीं. रात्रीं मात्र थंडी बरीच असते. हिंवाळ्यांत ती अत्यंत कडक असते हें सांगणें नकोच. तथापि हवेंत त्रासदायकपणा कमी असतो. उलट थंडीमुळें काम करण्यास उत्साह वाटतो, नव्हे, काम करणेंच श्रेयस्कर असतें.

एप्रिल व मे महिन्यांत हिमालयावरील बर्फ वितळत असल्यामुळें बहुतेक सर्व नद्यांना पूर येतो. पावसाळ्यांत पाऊस, हिंवाळ्यांत दंव आणि

धुकें व उन्हाळ्यांत बर्फ वितळून नद्यांना येणारा पूर या सर्व गोष्टींमुळें या प्रदेशांत पाण्याची कधींच कमतरता नसते. मात्र येथें एक गोष्ट लक्षांत ठेवावयास पाहिजे ती ही कीं, पर्वतांच्या दक्षिण उतारावर भरपूर पाऊस असतो तर उत्तरेकडील उतारावर तो केव्हां केव्हां मुळींच पडत नाहीं. यामुळें दक्षिण उतारांवर किंवा माथ्यावर घनदाट झाडी असते तर उत्तर उतार पुष्कळ वेळां ओसाड व वैराण असतात. याचें कारण पावसाळी वारे दक्षिणेकडून उत्तरेकडे जात असतात हें होय.

दक्षिणेकडून उत्तरेकडे जों जों जावें म्हणजे सखल प्रदेशाकडून उंच प्रदेशाकडे जों जों जावें तों तों वनस्पतींमध्यें व पिकांमध्यें फरक पडत जातो. तराई भागांत काय काय पिकतें हें आपण पाहिलेंच आहे. साधारणपणें २००० फूट उंचीच्या प्रदेशांतील अरण्यांत साग, शिसव, जंगलांत बाभूळ, खैर, सायरी आणि पाणथळीच्या जागीं बांबू, वेत, ताड, माड, नेचे व आर्किड या झाडाझुडुपांची वाढ होते; २००० ते ४००० फूट उंचीच्या प्रदेशांत उतारावर चहाचे मळे आहेत; आणि सपाट जागीं तांदूळ, गहूं, मका, ओट, बार्ली, मिरच्या, सुंठ, बटाटे, अननस आणि यूरोपखंडांत होणारी बहुतेक सर्व फळफळावळ म्हणजे सफरचंद, पेअर, प्लम, पीच, ॲप्रिकॉट, चेरी, द्राक्षें, संत्रीं, मोसंबीं, ईडलिंबु, अननसें इत्यादि फळें वाटेल तेवढीं आणि रसाळ व मोठ्या आकाराचीं होतात. याहून उंच भागावर ओक, चेस्टनट, वाल-नट, चेरी, मॅपल, एल्म, बीच, बर्च, यू, ॲश इत्यादि मोठमोठाले वृक्ष वाढतात; आणि ६००० ते ८००० फुटांहून उंच भागीं देवदार, सुरू, स्प्रूस, चिनार, फर इत्यादि सूचिपर्णी झाडांची वाढ होते. तसेंच अनेक प्रकारचे नेचे, ऑर्किड, गुलाब, र्‍होडेडेन्ड्रॉन् व इतर रानावनांतून आपोआप वाढणाऱ्या फुलझाडांची रेलचेल असते.

प्रदेशाच्या उंचीप्रमाणें जशी वनस्पति बदलत जाते तसेच प्राणीहि बदलत जातात. २००० फूट उंचीपर्यंत वाघ, चित्ते, काळीं अस्वलें, कोल्हे, लांडगे, तरस इत्यादि हिंस्र पशु व हत्ति, गेंडे, वनगाय, गायल, वनरेडे, हरिण इत्यादि वनपशु आढळतात. पक्ष्यांमध्यें पाणकोंबडे, बदकें व गिधाडें हीं विशेष होत. यापुढील प्रदेशांत चित्ते, अस्वल, रानकुत्रीं, रानमांजरें, ससे, खारी, सालु आणि हरिण हे पशु व तित्तिर, चकोर, पाणकोंबडे, गरुड, गिधाड वगैरे पक्षी आढळतात. आणि ६००० ते ८०००च्या पुढें, पिंगट अस्वल, यॅक, पांढरे चित्ते, कस्तूरी-मृग, वनशेळ्या, वनमेंढ्या, शुभ्र गरुड, शुभ्र तित्तिर, शुभ्र पाणकोंबड्या वगैरे पक्षी आढळतात. बर्फाच्छादित प्रदेशांतील पशुपक्षांचा रंग शुभ्र किंवा भुरकट शुभ्र असा असतो. कस्तूरी-मृगांचा प्रदेश हाच होय. पण त्यांची शिकार करून कस्तूरी मिळविणें सोपें नाहीं. हा प्राणी अतिशय चपळ तर असतोच; शिवाय तो कड्याकोपऱ्यांवरून बिनदिक्कत जातो, म्हणून त्याचा पाठलाग करणें अति कठीण जातें. तरी पण नेपाळेश्वरास ती हवी तितकी मिळते यांत शंका नाहीं.

नेपाळच्या निरनिराळ्या भागांत निरनिराळ्या जातींचे लोक राहतात. अगदीं उत्तरेकडे तिबेटी लोक राहतात. पश्चिमभागीं गुरुंग व मगार जातींचे लोक राहतात. पूर्वभाग किराती, लिंबू आणि लेपचा या जातींनीं व्यापलेला आहे. दक्षिणभागीं म्हणजे तराई मुलुखांत दारी, भ्रक्षू, कुश, मन्जी इत्यादि जातींच्या लोकांनीं वसाहत केली आहे. हे लोक म्हणजे बहिष्कृत हिंदु लोक होत. दक्षिणभाग म्हणजे रोगराईचें माहेरघरच आहे. कारण हा सगळा मुलुख दलदलीचा निबिड जंगलाचा आहे हें आपण पाहिलें आहेच. नेपाळच्या मध्यभागीं गुरखे लोक आहेत. १८व्या शतकाच्या उत्तरार्धांत राजपुतान्यांतील कांहीं रजपूत लोकांना देशत्याग करावा लागला. यांचा पृथ्वीनारायण शहा

नांवाचा नेता होता. त्याच्या नेतृत्वाखालीं या रजपूत लोकांनीं नेपाळ प्रांतीं येऊन तेथील राज्य जिंकून घेतलें. याच रजपूत लोकांना गुरखे म्हणतात. ते येण्यापूर्वीं नेवार लोकांचें येथें वर्चस्व होतें. गुरखे लोक अतिशय लढवय्ये आहेत. त्यांच्या शरिराचा बांधा मजबूत असून ते कांहींसे ठेंगू असतात व शूर, काटक, विश्वासु व मोकळ्या स्वभावाचे असे हे लोक स्वातंत्र्य राखण्याकरितां जिवावर नेहमींच उदार असतात. **याच गुणांमुळें अखिल भरतखंडांत हा एकच देश खरें स्वातंत्र्य उपभोगीत आहे.** त्यांचें आवडतें हत्यार कुक्री हें नेहमीं त्यांच्या कमर-पट्ट्यांत खोंचलेलें असतें. नेपाळांतील खरे हिंदु म्हणजे मध्यभागीं राहणारे गुरखे व तराई भागांत राहणारे निकृष्ट जातीचे शेतकरी एवढेच होत. बाकीचे लोक मंगोलिअन जातीचे असून ते बौद्धधर्माचे आहेत. तथापि नेवार व गुरखे यांच्या मिश्र विवाहांमुळें सध्यां इतकें मिश्रण झालें आहे कीं, हे दोन्ही समाज शुद्ध स्वरूपांत आतां राहिलेले नाहींत. इतर जातीजातींतहि मिश्र विवाह झाले आहेत. त्यामुळें हिंदुधर्म आणि बौद्धधर्म यांचेंहि स्वरूप शुद्ध राहिलें नाहीं. मात्र गुरखे लोक संस्कृतजन्य पर्बतिआ नांवाची भाषा बोलतात. नेवारी लोकांची मूळची भाषा तिबेटी. पण त्यांच्या भाषेंत संस्कृत शब्दांचा भरणा अलीकडे बराच झालेला आहे.

वर सांगितल्याप्रमाणें नेपाळांत मुख्य दोन जातींचे लोक आहेत. एक गुरखे व दुसरे नेवारी. पैकीं गुरखे लोकांचेंच राज्य असल्यामुळें त्यांचा भरणा सैन्यांत आणि मोठमोठ्या सरकारी हुद्यांच्या जागांवर होतो. नेवारी लोक शेती करितात. या लोकांनीं नेपाळचें सर्व खोरें लागवडी-खालीं आणिलें आहे. पर्वतांच्या उतारांना मोठमोठाले बांध घालून त्यांनीं सपाट अर्थात् जिन्याच्या पायऱ्यांप्रमाणें एकीवर एक अशा जमिनी तयार केल्या आहेत. त्याचप्रमाणें ठिकठिकाणीं वाहणाऱ्या अनेक झऱ्यांना,

ओहोळांना व नद्यांना अडवून त्यांचें पाणी या जमिनींतून खेळविलें आहे. तथापि या जमिनींतून अन्न या सदराखालीं येणारीं पिकें तेवढींच उत्पन्न करावींत असा येथील सरकारचा कटाक्ष आहे. म्हणून नेपाळच्या खोऱ्यांत चहा, कापूस, तंबाखू, ज्यूट, मंजिष्ट, चिराइत अशा प्रकारचीं इतर झाडें लावावयाचीं नाहींत असा निर्बंध आहे. मात्र नेपाळ संस्थानच्या इतर भागांत इतर पीक पुष्कळच काढतात. कांहीं भागांत वेलदोडेसुद्धां पिकतात. नेवारी लोकांना फळाफुलांच्या बागा करण्याची फार आवड आहे. देवळांमुळें फुलांना फारच मागणी असते. शिवाय बायकांनाहि फुलांची फार आवड व हौस असते. नेवार लोक कुशल कारागीर म्हणूनहि प्रसिद्ध आहेत. विटा पाडण्यांत, मातीचीं भांडीं घडविण्यांत आणि लांकडावरील कांतीव आणि कोरीव काम करण्यांत ते वाकबगार आहेत. कागद करणें, कापड विणणें, भांडीं, हत्यारें घडविणें आणि सोन्याचांदींचे दागिने तयार करणें हींहि कामें नेवारी लोकच करतात.

त्याचप्रमाणें व्यापारहि याच लोकांच्या हातीं आहे. कांहीं काश्मिरी आणि हिंदी लोकहि येथें व्यापारी म्हणून स्थायिक झाले आहेत. तिबेट देशाशीं जो व्यापार चालतो तो नेवारी व्यापाऱ्यांच्या मार्फत. तिबेटांतील ल्हासा या राजधानीच्या शहराशीं हा व्यापार चालतो. तिबेटहून कस्तूरी, गंगावनें, चहा, टाकणखार, सोरा, मीठ, मध, मेण, शेळ्या, मेंढ्या, यॅक, लोंकर, कांबळीं, सोनें, चांदी इत्यादि पदार्थ येतात. उलट तिबेटास रंगीबेरंगी कापसाचें कापड, तंबाखू, अफू, साखर, सुपारी, मसाल्याचे पदार्थ, सर्व तऱ्हांचीं भांडीं, लोखंडी सामान आणि पोवळीं, मोत्यें व इतर रत्नें हे पदार्थ पाठवितात. तिबेटास जावयाचें म्हणजे हिमालय पर्वत ओलांडून. याला दोन मार्ग आहेत. एक ईशान्य दिशेनें व दुसरा वायव्य दिशेनें. पहिल्या मार्गानें जातांना १४,००० फूट उंचीचा नील घाट चढावा लागतो. दुसऱ्या मार्गानें गेलें असतां ९००० फूट

उंचीचा केरुंग घाट लागतो. शेळ्या, मेंढ्या, खेचरें आणि यॅक यांच्या पाठींवरूनच हें सामान आणावें व न्यावें लागतें.

हिंदुस्थानांतील इतर प्रांतांना नेपाळाहून कस्तूरी, वेलदोडे, गंगावनें, पतंगाचें लांकूड, मंजिष्ठ, बटाटे, संत्रीं, मोसंबीं, औषधी जिनसा, हत्ती, गवे, खेंचरें, कातडीं, शिंगें, टाकणखार, मोरचूद इत्यादि पदार्थ रवाना होतात. आणि गुरेंढोरें, शेळ्यामेंढ्या, सुपारी, मसाल्याचें सामान, चहा, नीळ, लाख, साखर, तंबाखू, बंदुका, दारू, जोडे, बूट, जीन-खोगिरें, मखमल, रेशमी, लोंकरी व कापसाचें कापड, लोखंडी व पोलादी सामान, इत्यादि वस्तु नेपाळमार्गें तिबेटांत पाठविण्यांत येतात.

येथें एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. कांहीं सामान नेपाळ-मार्फत तिबेटांतून हिंदुस्थानांतील इतर प्रांतांकडे येतें, तसेंच इतर प्रांतांकडून नेपाळमार्गें तिबेटाकडे कांहीं सामान पाठविलें जातें. म्हणजे नेपाळ ही उतारपेठ होय. पण नेपाळ सरकारचें यामुळें जकातीचें उत्पन्न बरेंच वाढलें आहे.

हिंदुस्थानांतून नेपाळांत जाण्यास रक्सल या बंगाल नॉर्थवेस्ट लोह-मार्गावरील शेवटच्या स्टेशनपासून भीमजेडीपर्यंत पक्की सडक आहे. मात्र पुढें काटमांडूपर्यंत यॅकच्या पाठीवर किंवा हमालाच्या पाठीवर सामान लादून जावें लागतें. हा चढाव जवळ जवळ चवदा मैलांचा आहे. या एकाच रस्त्यानें यूरोपिअन लोकांना जाण्यायेण्याची परवानगी आहे. नेपाळांत दळणवळणाकरितां लोहमार्ग अथवा सडका मुद्दामच करण्यांत आलेल्या नाहींत. कारण त्या योगानें इतर लोकांना आपला पहाडी मुलुख जिंकण्यास सोपें जाईल अशी त्यांची समजूत आहे; आणि ती कांहीं अंशीं खरीहि आहे. टणकपूर, नेपाळगंज, बीरगंज, जयनगर, प्रताप-गंज, सिमरून, जानकपूर, हीं सरहद्दीवरील कांहीं ठिकाणें होत. येथूनहि थोडाबहुत व्यापार चालतो.

नेपाळच्या सम्राटास महाराजाधिराज म्हणतात. हल्लीं महाराजाधिराज त्रिभुवन वीरविक्रमजंग बहाद्दूरशाहा बहाद्दूर समशेरजंग देव हे सम्राट असून ते १९११ सालीं राज्यारूढ झाले. तथापि नेपाळचा सम्राट हा नामधारीच असतो. त्याचा जो कोणी मंत्री असेल तोच खरा सत्ताधारी. त्याच्या तंत्रानेंच सर्व कांहीं चालतें म्हणूनच मुख्य मंत्र्याला महाराज ही पदवी असते. हल्लीं या पदावर महाराज भीम समशेरजंग बहाद्दूर राणा, G. C. S. I., K. C. V. O., Honorary Major-General, British Army, and Hon. Colonel, 4th Gurkhas, हे आहेत.

एकंदर राज्याचा वसूल दोन कोटि रुपये येतो. खडें सैन्य ४५००० आहे. लोकसंख्या ५५,८०,००० आहे. महायुद्धामध्यें नेपाळी सैन्यानें ब्रिटिश सरकारला पुष्कळच मदत केली. या कामगिरीमुळें ब्रिटिश सरकारकडून नेपाळच्या सम्राटास वार्षिक १०,००,००० रुपये देणगी-दाखल दिले जातात; आणि ही देणगी अखंड मिळत राहावयाची असें सध्यां तरी ठरलें आहे. नेपाळ सरकारच्या अनुमतीनें हिंदुस्थान सरकारनें आपल्या पदरीं २०,००० गुरख्यांचें एक पायदळहि बाळगिलें आहे.

नेपाळेश्वर नेपाळच्या रम्य खोऱ्यांत वसलेल्या आपल्या शोभिवंत काटमांडू नगरीं राहात असतो. नेपाळचें खोरें वीस मैल लांब व पंधरा मैल रुंद असून याच खोऱ्याच्या सभोंवतीं लहान लहान खोरीं आहेत. नेपाळचें खोरेंच समुद्रसपाटीपासून ४५०० फूट उंच आहे आणि सभों-वतालची पर्वतश्रेणी ६००० ते १०,००० फूट उंच आहे. “ हल्लींचें नेपाळचें खोरें हें एके काळीं सरोवर होतें; पण श्रीविष्णूंनीं आपल्या सुदर्शन चक्रानें चौबहाल ठिकाणीं विवर करून दिल्यामुळें तेथील पाण्याचा निचरा झाला व लोकांना राहावयास सुंदर खोरें निर्माण झालें, ” अशी काश्मीरच्या खोऱ्याप्रमाणें येथील खोऱ्याबद्दलहि एक


दंतकथा आहे. हल्लीं या विवरांतून बागमति, विष्णुमति आणि मनोहरा या नांवांच्या तीन नद्या ( किंवा यांना निर्झर म्हणणेंच रास्त होईल ) वाहतात. यांना दुसरेहि अनेक निर्झर येऊन मिळतात. या सर्वांचा एकवटलेला हा त्रिवेणी स्रोत कोतवालदार या ठिकाणीं नेपाळच्या खोऱ्यांतून बाहेर पडतो. दुसरें एक विवर बोधिसत्व मंगुश्री यांनीं पाडलें अशी बुद्धधर्मीय लोकांची श्रद्धा आहे.

नेपाळच्या खोऱ्यांतच काटमांडूशिवाय आणखी दोन नगरें आहेत. एक पाटण व दुसरें भाटगांव. हीं तीन नगरें म्हणजे गुरखे लोक येथें येण्यापूर्वींचीं नेवारी लोकांचीं तीन स्वतंत्र राज्येंच होतीं. २०×१५= ३०० चौरस मैलांच्या क्षेत्रफळांत तीन स्वतंत्र राज्यें! नेपाळांत गुरखे येण्यापूर्वीं सगळीकडे अशी स्थिति होती. काटमांडूची लोकसंख्या ६०,००० वर असून पाटण व भाटगांव यांची प्रत्येकीं ४०,००० वर आहे. खरोखर तीन्ही शहरें मिळून एक दीड लाखाचें गांव होईल इतकीं तीं जवळ जवळ आहेत. येथील प्रत्येक घर दुमजली असून कांहीं तिमजली किंवा चौमजलीहि आहेत. घरें विटांचीं बांधलीं असतात व वर कौलें असतात. सज्जे, दारें व खिडक्या लांकडी असून त्यांवर सुबक कोरीव काम असतें. शहरांतील रस्ते अरुंदच पण ते सर्व फरशा अगर विटा यांनीं बांधलेले आहेत.

नेपाळांत सर्वत्र देवळेंच देवळें आहेत. प्रत्येक शहरांत, प्रत्येक खेड्यांत रस्तोरस्तीं देवळें असून प्रत्येक टेकडीवर देऊळ बांधलेलें असतें. ३०० चौरस मैलांत जवळजवळ ३००० देवळें आहेत. यांची बांधणी सुबक असते. यांचे घुमट ब्रह्मी लोकांच्या देवळावरील घुमटांप्रमाणें निमुळते गोलाकार असून ते तांब्याच्या पत्र्यांनीं मढविलेले आहेत. यांवर सोन्याचा मुलामाहि दिलेला असतो. काटमांडू येथील श्रीपशुपतीचें देवालय अखिल भरतखंडांत प्रसिद्ध आहे. माघ महिन्यांत शिवरात्रीच्या



हिमालयांतील घरें



गुरखा



गुरखी



भूतिआ–मोलकरीण

दिवशीं येथें प्रचंड यात्रा जमते व ही यात्रा साधण्याकरितां भरत-खंडाच्या दाही दिशांकडून हजारों यात्रेकरू प्रतिवर्षी येत असतात. त्यांत पायीं यात्रा करणारेहि पुष्कळ असतात; नव्हे नेपाळांतील कांहीं भागांत वाहनांच्या अभावीं पायींच यात्रा करावी लागते. श्रीपशुपतीच्या देवालयाप्रमाणेंच श्रीबोधनाथ आणि श्रीशंभुनाथ हीं दोन देवस्थानें प्रसिद्ध आहेत. श्रीबोधनाथ हें बौद्धधर्मीयांचें होय. काठमांडू येथें प्राचीन संस्कृत ग्रंथांचा व हस्तलिखितांचा मोठा संग्रह जपून ठेवलेला आहे.

राज्यव्यवस्थेसाठीं व न्यायदानासाठीं संस्थानचे प्रांत पाडण्यांत आले आहेत. त्यांपैकीं इलम, धनाकूट, गुरखा, पल्यादोती, नकमुलुख, बत्वाल, चितवण, मुरुंग हे प्रांत मुख्य आहेत. नेपाळी लोक अत्यंत प्रामाणिक आणि कायदे पाळणारे अशी त्यांची ख्याति आहे. त्यामुळें खटले फारसे होत नाहींत. येथें गुलामांचा व्यापार चालत होता तोहि आतां बंद करण्यांत येऊन हळूहळू पूर्वीच्या गुलामांना स्वातंत्र्य देण्यांत येत आहे.

---

ग्रंथ संग्रह
स्थळ प्रत
सं. नं.
ता.

# ३

# सिकीम—भूगोलावरील एक वनस्पति-संग्रहालयच

नेपाळ देशाच्या पूर्वेस हें एक चिमुकलेंच संस्थान आहे. याचें क्षेत्रफळ सारें १८२० चौरस मैल असून लोकसंख्या सुमारें २ लाख आहे. हे लोक हिंदु तरी आहेत किंवा बौद्धधर्मीय तरी आहेत. मात्र यांत नेपाळी लोकांचाच पुष्कळ भरणा आहे. लोकांचा मुख्य धंदा शेती. प्राचीन काळीं येथें लेपचा जातीचे डोंगरी लोक राहत असत; पण १६४१ सालीं पेनची नामिजी नांवाच्या तिबेटी राजपुत्रानें हा भाग जिंकून घेतला. पण या कामीं या राजपुत्रास तिबेटांतील बौद्धधर्माचें मुख्य पीठ ल्हासा येथील धर्मगुरूंनीं बरीच मदत केली होती, म्हणून या राजपुत्रानें येथें बौद्धधर्माचा बराच प्रसार केला. पुढें १७७६ त नेपाळच्या गुरख्यांनीं हा देश जिंकून तो आपल्या राज्यास जोडला. यामुळें सिकीम लोकांचें जवळ जवळ सोळा वर्षें गुरखे लोकांशीं भांडण व युद्ध चाललें होतें. अखेर १७९२ सालीं चिनी लोकांच्या मदतीनें गुरख्यांना कांहीं भागांतून हांकलून देण्यांत आलें आणि १८१६ सालीं इंग्रजांच्या मदतीनें त्यांना पुरतेपणींच घालवून देण्यांत आलें. या कामगिरीमुळें इंग्रजांना दार्जिलिंगचा कांहीं भाग मिळाला. पुढें इंग्रजांचें आणि त्यांचें वांकडें आलें; कारण सिकीम लोकांचा ओढा तिबेटी लोकांकडे होता, आणि इंग्रजांचें वर्चस्वहि त्यांना नको होतें म्हणून तिबेटी सैन्याच्या जोरावर दार्जिलिंगच्या समोर एक नवा किल्लाहि बांधण्यांत आला. १८८८ सालीं इंग्रजांनीं तिबेटी सैन्याचा पराभव करून त्यांना

सिक्कीमच्या राज्यांतून हांकून दिलें व १८९० सालीं सिक्कीम संस्थानास सर्वस्वीं आपल्या संरक्षणाखालीं घेतलें. आज सिक्कीम संस्थानचे अधिपति ब्रिटिश सरकारचे मांडलिक आहेत. हल्लीं सिक्कीमच्या गादीवर सर ताशी नामग्याल, K. C. I. E., हे आहेत. संस्थानचें उत्पन्न ५,२०,५०० रु. येतें. गांगतक ही हल्लींची राजधानी आहे.

सिक्कीम प्रांतास तिबेटी लोक डीजाँग ( म्हणजे तांदळाचा प्रदेश ) म्हणत. नेपाळ देशाप्रमाणेंच हाहि प्रदेश हिमालयाच्या उतारावर असल्यामुळें हिमालयांत उगम पावणाऱ्या बऱ्याच नद्या व निर्झर याहि प्रदेशांतून वाहात जातात. नद्यांपैकीं तिस्ता व रंगित या मुख्य होत. सिक्कीमच्या पश्चिमभागीं सिंगलीला पर्वताच्या रांगेंत २८,१४६ फूट उंचीचें कांचनगंगा शिखर आहे. पूर्वभागीं चोला पर्वताची रांग आहे. ती सिंगलीला रांगेहून उंच आहे. मात्र एकहि शिखर कांचनगंगापेक्षां उंच नाहीं. हिमालयाच्या बऱ्याच रांगा या प्रदेशांतून पूर्वपश्चिम पसरलेल्या आहेत. आणि या प्रदेशाची उंची १००० फुटांपासून १८,००० फुटांपर्यंत वेगवेगळ्या ठिकाणीं वेगवेगळी अशी चढत्या क्रमानें आहे. अर्थात् समुद्रसपाटीपासून हिमाच्छादित प्रदेशापर्यंतचे बहुतेक सर्व प्रकारचे प्रदेश येवढ्या टापूंत आले आहेत. दोन पर्वतांच्या रांगांमधील खोल दऱ्या व सखल प्रदेश अर्थात् जंगलांनीं भरलेले किंवा ओसाड असे आहेत. तिबेटांत जे घाट आहेत त्यांची उंचीसुद्धां १४,०००च्या पुढें आहे. जेलप ( उंची १४,५०० फूट ), चोला ( उंची १४५५० फूट ), कांग्रालामा ( उंची १६,००० फूट ) हे तीन मुख्य घाट होत. हे घाट ओलांडून तिबेटांत जातां येतें.

नेपाळ, तिबेट आणि भूतान यांच्या कैचींत सांपडलेला हा एक चिमुकला प्रदेश आहे खरा. पण विषुववृत्तावरील अति उष्ण हवेपासून तों ध्रुवप्रदेशांतील अति थंड हवेपर्यंत निरनिराळ्या हवेचे सर्व

प्रकार या एवढ्याशा प्रदेशांत आढळून येत असल्यामुळें येथें सर्व प्रकारची वनस्पति वाढते. १००० फूट उंचीच्या प्रदेशापासून ५००० फूट उंचीच्या प्रदेशापर्यंत उष्ण कटिबंधांतील वनस्पति वाढतात. ५००० फूट उंचीच्या प्रदेशापासून १३,००० फूट उंचीच्या प्रदेशापर्यंत कवोष्ण कटिबंधांतील वनस्पति वाढतात. त्यापुढें शीतकटिबंधांतील आणि पुढें पुढें तर केवळ सतत बर्फाच्छादित असा प्रदेश लागतो म्हणून कसलीच वनस्पति वाढत नाहीं. नद्यांना पाणी नेहमींच असतें; पावसाळ्यांत पावसाचें आणि उन्हाळ्यांत वितळलेल्या बर्फाचें. हिंवाळ्यांत हिम अगर धुकें अगर दंव पडतें. यामुळें वनस्पतींना नेहमींच भरपूर पाणी मिळतें.

इ. स. १८८० सालापर्यंत सिकीमच्या पर्वतावर घनदाट जंगल पसरलेलें होतें. पण जों जों लोकसंख्या वाढूं लागली तों तों जंगल तोडून ती जमीन लोकांनीं लागवडीखालीं आणण्यास सुरुवात केल्यामुळें जवळजवळ ६००० फूट उंचीच्या प्रदेशापर्यंतचें बरेंच जंगल तोडण्यांत आलें आहे. तथापि या जंगलांत वाढणाऱ्या झाडाझुडुपांचे व वेलींचे प्रकार इतके आहेत कीं, केवळ प्रदर्शनाकरितां निसर्गानें असतील नसतील ते सर्व प्रकार येथें जमा केले आहेत कीं काय असें वाटतें. एवढ्या टापूंत ४००० जातींचीं फुलझाडें व वेली आढळून येतात. नेच्यांच्या २०० जाती, बांबूच्या २० जाती, ऑर्किडच्या ४०० जाती, ऱ्होडोडेन्ड्रॉनच्या ३० जाती, याप्रमाणें प्रत्येक प्रकारामध्यें जाति व उपजाति आहेत. केवळ समुद्रकांठीं वाढणाऱ्या झाडाझुडुपांशिवाय येथें सर्व झाडेंझुडुपें वाढतात. वनस्पतींच्या बाबतींत जी गोष्ट तीच प्राण्यांच्या बाबतींतहि खरी आहे. पतंगांच्या २००० जाती, आणि फुलपांखरांच्या ६००. पांखरांच्या बाबतींतहि तीच तऱ्हा. पशु आणि साप मात्र त्या मानानें कमी.

आरंभीं सांगितल्याप्रमाणें बहुतेक लोक शेतकरीच आहेत. ही शेती कोंकणांतल्या शेतीप्रमाणें चालते. तांदूळ व मका हीं तेवढीं पिकें हे लोक काढतात. प्रत्येक शेतकऱ्याची स्वतःची जमीन असते आणि शेतांतच त्याचें घरदार. त्यामुळें खेडींपाडीं किंवा गांवें हा प्रकार नाहीं. शहरांचें तर नांवच काढावयास नको. मेंढ्या पाळणाऱ्या भूतानी लोकांनीं मात्र कांहीं कांहीं पहाडांवर कांहीं कांहीं गांवें वसविलीं आहेत, व तेथें त्यांनीं कायमचीं घरें बांधलीं आहेत. मात्र त्यांत ते आळीपाळीनें राहतात. एक मेंढपाळ आपल्या कुटुंबांतील मुलामाणसांसह एखादा कळप कांहीं दिवस दऱ्याखोऱ्यांतून चरावयास घेऊन गेला म्हणजे त्याच्या घरांत दुसरा मेंढपाळ आपलें कुटुंब घेऊन तो परत येईपर्यंत राहतो. पहिला मेंढपाळ परत आला म्हणजे हा दुसरा मेंढपाळ तोच कळप चारण्याकरितां कांहीं दिवस आपल्या कुटुंबांतील लोकांसह जातो. असा त्यांचा क्रम चालतो.

सिकीममार्गें तिबेटाशीं हिंदुस्थानचा बराच व्यापार चालतो. उत्तरेकडील तिबेटची राजधानी ल्हासा या शहरीं जाण्यास बरेच जवळचे व सोईस्कर मार्ग सिकीम संस्थानांतून आहेत. सरहद्दीवरील दार्जिलिंगपर्यंत स्वतंत्र रेल्वेचा फांटा ईस्टर्न बेंगॉल रेल्वेनें दिनाजपूर जंक्शनपासून नेला आहे. तेथून मात्र पुढें खेंचरें, यॉक, मेंढ्या, शेळ्या यांच्या साहाय्यानें पुढें माल न्यावा लागतो. सिकीममध्यें ऱ्हेनॉक, डिक्केलिंग, गांगतक, तुमलुंग, रबडेन्झे, चोंबी इत्यादि लहान मोठ्या व्यापारी पेठा आहेत. पण या उतारपेठा होत. तेथें कायमची वस्ती फारच थोडी असते. दरवर्षी ब्रिटिश व्यापारी लोकांची या देशामार्फत जवळ जवळ पन्नास लाखांची घडामोड होते. व्यापाराकरितां वाहतुकीसाठीं रस्ते नीट ठेवण्यांत येऊं लागले आहेत. संस्थानास हाच काय तो मोठा खर्च.

# ४

# भूतान–भव्य, भयानक पण चित्ताकर्षक प्रदेश

" भूतानांतील भूप्रदेश भव्य, भयानक पण चित्ताकर्षक देखाव्यांनीं जिकडेतिकडे भरून गेला आहे, " असे अनेक प्रवाशांनीं या भूप्रदेशासंबंधीं उद्गार काढले आहेत. एकापेक्षां एक उंच असे असंख्य तुटलेले कडे, त्यांमधील खोल खोल दर्‍या, उभ्या कड्यांवरून या दर्‍यांच्या तळाशीं कोसळणारे अगणित जलप्रपात, आणि तळांतून पुन्हा वर येणारे बाष्पमय फवार्‍यांचे लोट हा एक देखावा; दुसरीकडे पायथ्यापासून १०,००० फूट उंचीपर्यंत झाडें, झुडपें व वेली यांनीं भरून गेलेल्या आणि प्राण्यांनीं गजबजलेल्या पर्वतांच्या एकीपुढें एक अशा पसरलेल्या अनेक रांगा हा दुसरा देखावा; आणि मेघमंडळाला छेदून रवि, शशि व नक्षत्रें यांना जणूं आधीं भेटण्याकरितां गगनमंडळांत शिरणारीं एकाहून एक उंच अशीं अखंडहिमाच्छादित गिरिशिखरें हा तिसरा देखावा. यांपैकीं प्रत्येक देखावा पाहून मन थक्क होतें व आश्चर्य आणि भीति या दोन्ही विकारांनीं तें भरून जातें. पण याच डोंगराळ भागांतून एखाद्या टेंकडीच्या माथ्यावर अगर नदीच्या कांठावर बांधलेल्या झोंपड्यांतून वावरणार्‍या मनुष्य प्राण्यांना पाहून 'याहि ठिकाणीं मनुष्य वस्ती आहे ना?' असे उद्गार नकळत तोंडावाटे बाहेर पडतात. झोंपड्यांच्या भोंवतालची मूळची झाडी तोडून लागवडीखालीं आणलेल्या जमिनींत आणि पायर्‍यांप्रमाणें एकावर एक रचलेल्या शेतांत गहूं, बाजरी, मका, वरी, नाचणी यांचीं उभीं पिकें; किंवा बटाटे, मुळे, हळद, मिरच्या यांचे वाफे पाहून अशाहि

जंगलमय प्रदेशांत हे लोक सुखानें राहात आहेत हें पाहून तितकेंच बरें वाटतें.

सिकीम संस्थानच्या पूर्वेला पूर्व रेखांश ८९° ते ९३° आणि उत्तर अक्षांश २६° ते २८° एवढ्या भागांत भूतान या स्वतंत्र संस्थानचा विस्तार आहे. हिमालय पर्वताच्या अगदीं पूर्वभागांतील हा प्रदेश होय. उत्तरेस तिबेटचें पठार आणि पूर्वेस ब्रह्मपुत्रा नदीनें जेथें हिमालयास वळसा घेतला आहे तो भाग असून, दक्षिणेस आसाम प्रांताचा सखल प्रदेश आहे. एका अर्थी भूतानास ब्रह्मपुत्रा नदीचा वेढाच आहे. भूतानचा अर्थ तिबेटाचा शेवट असा आहे आणि तिबेट जेथें संपतो तेथूनच हा प्रदेश लागतो. याची लांबी १९० मैल असून एकंदर क्षेत्रफळ १८,००० चौरस मैल आहे. रुंदी सुमारें ७५ ते १०० मैलांच्या आंत बाहेर आहे. प्रदेशाच्या एवढ्या लांबीमुळें आणि उत्तरेस पर्वतांच्या रांगांमागून रांगा हिमाच्छादित असल्यानें, तसेंच दक्षिण उतारावर मोसमी पाऊस भरपूर पडत असल्यामुळें या प्रदेशांतून उत्तरेकडून दक्षिणेकडे अनेक नद्या वेगानें वाहात येतात. पुष्कळ ठिकाणीं या नद्यांना कड्यावरून उड्या घ्याव्या लागतात. या नद्यांमध्यें डिचू, माचू, छिंचू, तोर्शी, मांची, माटिचू, धार्ली आणि मानस या नद्या मुख्य होत. सर्वांमध्यें मानस नदी मोठी आहे. अगदीं पूर्वेकडील कांहीं भागांतून ब्रह्मपुत्रा नदीसुद्धां वहात जाते; आणि बाकीच्या सर्व नद्या आसामच्या सखल प्रदेशांत जाऊन ब्रह्मपुत्रा नदीसच आपला प्रवाह अर्पण करितात. हिमालयाचा पायथा व ब्रह्मपुत्रा यांमधील टेकड्या टेकड्या असलेल्या प्रदेशाचा एके काळीं भूतानांतच समावेश होत असे. या टेकडाळ प्रदेशास दुआर किंवा द्वार म्हणतात. हीं द्वारें अथवा घाट अठरा आहेत. हल्लीं या प्रदेशाचा समावेश बंगाल व आसाम या प्रांतांत करण्यांत आला असून

त्याबद्दल प्रतिवर्षी ब्रिटिश सरकारकडून भूतानच्या संस्थानाधिपतींना एक लाख रुपये नगदी मिळतात.

भूतानांत पूर्वी तेफ़ू जातीच्या लोकांचें राज्य होतें. हे कुचबिहार संस्थानांतून या प्रांतांत आले असें इतिहासकारांचें मत आहे. पुढें १६७० सालीं तिबेटी लोकांनीं हा देश जिंकून घेतला, पण तेफ़ू लोकांत ते मिळून मिसळूनच राहूं लागले. तिबेटी लोकांनीं आपल्या बरोबर बौद्ध धर्म आणिला असला तरी भूत-पिशाच्च, दगड-धोंडे आणि झाडें-झुडपें यांना भजणारे लोकहि भूतानांत अद्याप पुष्कळ आहेत.

भूतानमधील राज्यपद्धति मात्र विलक्षण आहे. येथें एका वेळीं दोन राजे एकत्र राज्य करीत असतात. एकाला धर्मराज म्हणतात व दुसऱ्याला देवराज म्हणतात. धर्मराज हा बुद्धाचा अवतार असतो, असें येथील लोक मानतात. एक धर्मराज मेला तर लगेच त्या वर्षी त्याच्या गादीवर दुसरा धर्मराज येत नाहीं, तर मध्यंतरीं एक दोन वर्षें ती गादी तशीच रिकामी ठेवण्यांत येते. कारण मुख्य राजघराण्यांत तेवढ्या अवधींत जो कोणी राजपुत्र जन्मास येतो, त्या राजपुत्राच्या रूपानें तो धर्मराज पुन्हा अवतार घेतो, अशी या लोकांची समजूत असते. असा राजपुत्र जन्मास आला म्हणजे त्यास मग तें धर्मराजपद प्राप्त होतें. या राजपुत्राचें मग मुख्य धर्ममठांत लालन, पालन व शिक्षण होतें. पण वयांत आल्यावरहि या धर्मराजाच्या हातीं तशी खरी सत्ता नसते. खरी राज्यसत्ता देवराजाच्याहि हातीं नसते. कारण त्यालाहि भूतानच्या पूर्व विभागाच्या किंवा पश्चिम विभागाच्या ( यांपैकीं जो जास्त बलवान असेल त्याच्या ) अधिपतीच्या तंत्रानेंच वागावें लागतें. देवराजाची निवड होते खरी. पण ही निवड अखेर जो अधिपति बलवान असेल त्याच्या अनुमतीनेंच होत असते. भूतानचे पूर्व विभाग व पश्चिम विभाग असे दोन मोठे प्रांत



यॅक् ( तिबेटी बैल )

पाडण्यांत आले आहेत. प्रत्येक प्रान्तावर एक अधिपति असतो आणि त्याच्या हाताखालीं दुसरे सरदार असतात.

हल्लीं देवराजाच्या पदावर युगेन वंग चुक यांची निवड १९०७ सालीं झाली आहे. भूतान सरकारचा आणि ब्रिटिश सरकारचा चांगला स्नेह-संबंध जडला असल्यामुळें आणि तिबेटच्या राजकारणांत भूतान सरकारनें ब्रिटिश सरकारास मदत केली असल्यामुळें ब्रिटिश सरकारकडून या देवराजास, K. C. S. I. व K. C. I. E. या बहुमानाच्या पदव्या अर्पण करण्यांत आल्या आहेत. म्हणून हल्लीं भूतानच्या देवराजास '**हिज् हायनेस्** दि **महाराजा** ऑफ **भूतान सर युगेन वंग चुक, के. सी. एस्. आय्., के. सी. आय्. ई.**,' असें ब्रिटिश सरकाराकडून संबोधिलें जातें.

भूतानी लोक तसे खाऊन पिऊन सुखी आहेत खरे. त्यांची शेतीहि चांगली चालते व चालण्यासारखी आहे. ते कष्टाळूहि आहेत. पण आपली शेती वाढवून उत्पन्न वाढविण्यास ते नाखुष असतात. कारण उत्पन्नांत वाढ झाली तरी ती त्यांच्या पदरीं पडत नाहीं. तिचा बराच मोठा हिस्सा प्रांताधिपति लुबाडतात. प्रांताधिपतींना एक ठराविक रक्कमच देवराजाच्या दरबारीं पाठवावयाची असते. त्या रकमेपेक्षां जी कांहीं रकम जास्त मिळेल ती सर्व प्रांताधिपति स्वतः घेतो. पुष्कळ वेळां यामुळें शेतकरी लोकांवर बराच जुलूम होतो. या जाचामुळें शेतकरी व इतर धंदेवाईकसुद्धां जेमतेम आपलें पोट भरूं शकतात. त्यांची स्थिति जवळ जवळ गुलामांप्रमाणेंच आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

भूतानी लोकांना आपल्या निसर्गरमणीय प्रदेशामुळें मात्र खरें सुख लाभतें. या प्रदेशामुळें त्यांच्या घरांना, झोंपड्यांना किंवा गांवांना जसें दुर्मिळ ऐश्वर्य प्राप्त होतें, तसेंच त्यांच्या झोंपड्या, घरेंदारें व खेडींपाडीं यांमुळें निसर्गरमणीय प्रदेशाच्या मूळ सौंदर्यांतहि भरच पडते. प्रदेश

जरी कितीहि रम्य असला तरी त्याचें ऐश्वर्य व सौंदर्य भोगण्यास तेथें मनुष्य प्राणी नसेल ( म्हणजे तो प्रदेश निर्जन असेल ) तर त्या ऐश्वर्याची किंवा सौंदर्याची काय किंमत ?

शहरांत राहणाऱ्या भूतिआंचीं घरें तीन चार मजली असतात. भूतिआ लोकांना सुतारकाम चांगलें येत असल्यामुळें सगळ्या तक्तपोशी देवदारी फळ्यांच्या केलेल्या असून घरांचीं दारें, खिडक्या, खांब, तुळ्या, छपरें, पाणपट्या इत्यादि सर्व गोष्टी कांतीव, कोरीव व नक्षीदार असतात. घरें बांधण्यांत लांकूडकामच पुष्कळ. लोखंडाचा उपयोग ते फारसा करीत नाहींतच. घराच्या दोन्ही अंगांना पडव्या असतात. घरांची रचना सुंदर आणि मांडणी टुमदार असते. खेड्यापाड्यांतील घरेंसुद्धां सुंदर बांधलेलीं असतात. प्रत्येक घराभोंवतीं शेतवाडी असते. असा प्रकार आपल्याकडे कांहींसा कोंकणांत आढळतो. टेंकड्यांच्या उतारांवर शेतें असल्यामुळें त्यांना उंच-उंच बांध घालून आपल्याकडील घरांवरील गच्च्यांप्रमाणें त्यांची रचना करावी लागते. शेतांतील बहुतेक भागांतून कालवे व पाट यांच्या वाटें पाणी खेळविलें असतें. शेताला देवदाराच्या सोटांचें किंवा दगडांचें कुंपण घालावें लागतें. नाहींतर जनावरांपासून फार उपद्रव होतो. बार्ली ( यव ), गहूं, बुटका गहूं, मका, वरी, नाचणी, मोहरी इत्यादि धान्यें हें येथील मुख्य पीक होय. मिरच्या, सर्व प्रकारचीं कंदमुळें, बटाटे, त्याचप्रमाणें सर्व प्रकारचा विलायती भाजीपाला व फळफळावळें यांचीं झाडें येथें चांगलीं पोसलीं जातात. त्यामुळें प्रत्येक कांदा, प्रत्येक फळ, प्रत्येक पान हीं मगज, गर व रस यांनीं भरलेलीं असतात. भूतिआ लोक आपल्या शेतीची इतकी काळजी घेतात कीं, आपल्याकडील एक एकर क्षेत्रफळाच्या शेतांत जितकें उत्पन्न होतें त्याच्या दुप्पट उत्पन्न त्यांच्याकडील तितक्याच क्षेत्रफळाच्या शेतांत होतें.

भूतानमध्यें पर्वतांच्या पायथ्यापासून दहा हजार फूट उंचीपर्यंत सर्वत्र जंगल वाढलेलें असतें आणि या जंगलांत सर्वत्रच, उंच, भव्य, विस्तीर्ण व डौलदार वृक्ष वाढलेले असतात. बीच, भूर्ज, सुरु, देवदार, फर, मॅपल, ॲश, यू हीं झाडें आपआपल्या वाढीला लागणाऱ्या योग्य अशा उंच स्थलीं उगवतात व वाढतात. पण हीं झाडें दहा बारा हजार फूट उंच अशा पर्वतांच्या माथ्यावरील होत. याहून ज्या रांगा कमी उंच आहेत त्यांच्या उतारावर आक्रोड, चेस्टनट, ओक, ऱ्होडोडेन्ड्रॉन, दालचिनी इत्यादि झाडें वाढतात. त्यांच्याहि खालच्या म्हणजे सखल प्रदेशांत साग, शिसव, खैर, वेत, बांबू यांची गर्द झाडी असते. या भागांत प्राणीहि पुष्कळ. गेंड्यांचे व हत्तींचे मोठमोठाले कळप सर्वत्र वावरत असतात. येथील गवत इतकें उंच वाढतें कीं, त्यांत हत्तींचे कळपसुद्धां गडप होतात. हरिणांच्या अनेक जाती पायथ्यापासून माथ्यापर्यंत भटकत असतात. वाघ, चित्ते त्या मानानें कमी. पण बोरूच्या बनांत ते मधून मधून आढळतात. कस्तूरीमृग हिमप्रदेशांत संचार करितात.

भूतानी म्हणजेच भूतिआ लोक शिकारी नसल्यामुळें या वन्य प्राण्यांना येथें निर्भयपणें राहावयास सांपडतें. भूतानांतील तंगन नांवाचा उमदा घोडा भूतानी लोकांना फारच प्रिय असतो. हा देखणा तर आहेच, शिवाय शक्तिवान् व भरपूर उंच असल्यामुळें त्यांना तो फार उपयोगीं पडतो. हा घोडा भूतान प्रदेशांतच आढळतो. तो बांधेसूद आणि अति चपळ असतो. केस लकलकीत असून त्याच्या अंगावर पांढरे तांबडे मोठाले ठिपके असतात. यालाच अबलख वर्णाचा घोडा म्हणतात.

भूतानी लोकांची राहणी कांहींशी घाणेरडीच असते. इतकें विपुल पाणी असूनहि त्यांचे कपडे घाणेरडे, आंग घाणेरडें. कदाचित् बौद्धधर्मामुळें हा घाणेरडेपणा त्यांच्यांत आला असावा. ते बौद्धधर्मी असले तरी मांस खातातच. त्यांचें इतर खाणें म्हणजे भात, कांजी, कंदमुळें

यांची भाजी आणि चहा. चहा त्यांना चीनपासून मिळतो आणि त्याच जातीचा चहा त्यांना मनापासून आवडतो. चीनमध्यें चहाचीं पानें, देंठ व मुळ्या शिजवून विटांप्रमाणें त्यांच्या ढेपा करून त्या वाळवितात आणि मग त्या विकण्यास पाठवितात. हे लोक दारूहि पितात. चॅंग व मर्वा या दोन प्रकारची दारू ते तांदूळ, बार्ली, वरी, नाचणी या धान्यांपासून करतात. पैकीं मर्वा जास्त मादक असते.

भूतिआ लोक अंगापिंडानें व दिसावयासहि बरे असतात. मात्र त्यांच्या चेहऱ्यांवर मंगोलिअन लोकांची बरीच छटा असते. अंगावर ते एक सैलसर लोकरी अंगरखा घालतात. तो चांगला गुडघ्यापर्यंत येतो. अंगरख्यावरून कमरेभोंवतीं ते एक जाड उपरणें गुंडाळतात. कांहीं लोक यावरून एक जाकीट घालतात. बायका लोकरीचाच पण कफनीप्रमाणें पायघोळ अंगरखा घालतात. त्याचे हातोपे मोकळे व सैल असतात. यांच्याहि कमरेभोंवतीं कापड गुंडाळलेलें असतें. कडक थंडीच्या दिवसांत पावलापासून गुडघ्यापर्यंत पुरुष, स्त्रिया व मुलें सर्वच आपले पाय मोजा-सारख्या कपड्यांनीं आच्छादून घेतात. पुरुष डोक्यावर आंखूड केस राखतात आणि त्यांवरून ते लोकरीची तंग टोपी घालतात. कुमारिका आपल्या वेण्या पाठीवर लोंबत्या सोडतात, तर प्रौढ स्त्रिया वेण्यांचें मोठें वेटोळें करून डोक्यावर उंच गुंडाळून ठेवतात; आणि त्यांवरून पाठीवर एक पांचसहा हाती कपडा त्या लोंबकळत टाकतात. भूतानी स्त्रियांच्या अंगाखांद्यांवर दागिने फारसे नसतातच. हातांत एकेकच वळें असतें.

शेतीप्रमाणें यांचे इतर उद्योगहि बेताचेच आहेत. कापड विणणें, कातडें कमावून बूट शिवणें, लांकडाचीं वाटोळीं भांडीं कातणें, तांब्याच्या कढ्या करणें, एका जातीच्या झाडापासून कागद बनविणें, त्याचप्रमाणें हत्यारें व शेतीचीं आउतें घडविणें एवढेच यांचे धंदे होत. परदेशांशीं व्यापाराकरितां हे कोणतेच पदार्थ तयार करण्याच्या भानगडींत पडत

नाहींत, किंवा परदेशांहून फारसा मालहि मागवीत नाहींत. कारण यांच्या गरजा बेताच्या आणि त्या त्यांना देशांतल्या देशांत भागवितां येतात. तथापि तिबेट देशाशीं यांचा थोडाबहुत व्यापार चालतो.

भूतान देशांत जाण्यास बक्सद्वार हें ईस्टर्न-बेंगॉल रेल्वेच्या एका फांट्यावरील अखेरचें स्टेशन होय. तेथून अनेक घाट चढून जावें लागतें. तासीसूदन ( ताशी-चो-झोंग ) ही उन्हाळ्यांतील राजधानी असून संकोश नदीच्या कांठीं वसलेलें पुनाका शहर हिंवाळ्यांतील राजधानी आहे. तासीसूदनास धर्मराजाचा अतिशय प्रसिद्ध मठ आहे. पुनाका शहराहून जवळच चमलारी नांवाचें २४,१०० फूट उंचीचें गिरिशिखर आहे. बक्सद्वारपासून पारो हें पहिलें मोठें गांव लागतें. मानस नदीवर तुवांग व ताशगांव हींहि प्रसिद्ध गांवें आहेत. यांशिवाय पोटरोंग, टागाझोंग, वादीपूर, थासा इत्यादि दुसरीं मोठीं गांवें आहेत. मानस नदीपलीकडील म्हणजे भूतानच्या पूर्व भागांत निरनिराळ्या जातींचे वन्य लोक राहतात. गांवें वसवून राहण्याची त्यांच्यामध्यें फारशी पद्धत नाहीं. एका ठिकाणीं दोन चार झोंपड्या तर दुसरीकडे दोन चार झोंपड्या यांप्रमाणें झोंपड्या बांधून ते लोक राहतात. या रानटी लोकांत अकास, डफलस, मिरीस व अबोर या मुख्य जाती असून त्यांचे प्रदेश अर्धवट स्वतंत्रच आहेत.

५

# जंगलमय आसाम आणि तेथील चहाचे मळे

आपल्या भरतखंडाच्या अगदीं ईशान्य कोपऱ्यांत आसाम नांवाचा भूप्रदेश पसरलेला आहे. हिमालयाच्या अगदीं पूर्व टोंकास वळसा घालून जेथें ब्रह्मपुत्रा नदी पश्चिमवाहिनी होऊन भरतखंडांत उतरते तोच हा प्रदेश. ब्रह्मपुत्रा नदीचें सुमारें ४५० मैल लांब व ५० मैल रुंद असें हें खोरें व या खोऱ्याच्या दक्षिणेस एका रांगेत असलेले गारो, खासी, जैन्तीया आणि नाग इत्यादि पहाडी प्रदेश आणि या प्रदेशांच्या दक्षिणेस असलेलें सुरमा नदीचें खोरें इतक्या भागांचा या प्रांतांत समावेश होतो. पूर्वेस मिश्मी, पतकोई, नाग, मुबन आणि लुशाई या पर्वतांच्या दक्षिणोत्तर पसरलेल्या उंच रांगांमुळें हा प्रदेश तिबेट व ब्रह्मदेश यांपासून वेगळा झालेला आहे. ब्रह्मपुत्रा व सुरमा या दोन मुख्य नद्यांना त्यांच्या मध्यभागीं असलेल्या अनेक पहाडांतून अनेक लहानमोठ्या नद्या येऊन मिळतात, त्यामुळें आसाम म्हणजे असंख्य नद्याखोऱ्यांनीं गजबजलेला असा एक पर्वतमय-प्रदेश झाला आहे. या प्रदेशाच्या अक्षांश रेखांशांच्या रेषा नकाशांत नीट दाखविल्या आहेत. यांवरून आसामचा विस्तार कळेल.

जून, जुलै, ऑगस्ट आणि सप्टेंबर या चार महिन्यांत जे मोसमी वारे अरबी समुद्रावरून नैऋत्येकडून थेट ईशान्येकडे व बंगालच्या उप-सागरावरून दक्षिणेकडून उत्तरेकडे वाहात येतात त्यांचा सर्व मारा आसामांतील पर्वतांवर अतोनात होत असल्यामुळें येथें या चार

महिन्यांतच चार पांचशें इंच पाऊस पडून जातो. शिलॉंग शिखराच्या दक्षिणभागीं असलेल्या चेरापुंजी येथें तर हा ७००–७५० इंचांपर्यंत पडतो. जगांत इतका पाऊस इतरत्र कोठंच पडत नाहीं! इ. स. १८६१ सालीं तर येथें ९०५ इंच पाऊस पडला, त्यांपैकीं ३६६ इंच एका जुलै महिन्यांत पडला. आसाम प्रान्ताच्या दक्षिण सीमेला बहुतेक भिडूनच कर्कवृत्त जात असल्यामुळें आणि जून २२ तारखेला तर कर्क वृत्तावरच सूर्याचीं किरणें लंब पडत असल्यामुळें मे, जून, जुलै, ऑगस्ट या तीन चार महिन्यांत या प्रान्तांत फारच उष्णता वाढते. अतिशय उष्णता व अतिशय पाऊस, तसेंच पावसामुळें प्रतिवर्षी पर्वतमाथे धुपून जाऊन गाळ सांचून सुपीक झालेले पर्वतांचे उतार व नद्यांचीं खोरीं या अनुकूल गोष्टींमुळें हा सर्वच प्रदेश घनदाट जंगलमय झाला असल्यास नवल नाहीं. मात्र पर्वतांच्या दक्षिण उतारापेक्षां उत्तर उतारावर त्या मानानें झाडी कमी दाट असते ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. कारण पावसाचा मारा उत्तर उतारावर पुष्कळच कमी असतो, इतका कीं, दक्षिण उतारावर तो दरवर्षी ३०० इंच पडत असला तर उत्तरेकडील उतारावर एखादे वेळीं ७५ इंचांहूनहि कमीच पडतो. याचीं चेरापुंजी व शिलॉंग हीं सुंदर उदाहरणें होत.

अशा या जंगलमय प्रदेशांत प्रचंड रानटी हत्तींचे, अक्राळविक्राळ रानरेड्यांचे आणि गलेलठ्ठ रानडुकरांचे मोठमोठाले कळप स्वैरपणें सर्वत्र संचार करीत असतात; आणि पाणथळ जागीं अनेक पाणघोडे मनसोक्त डुंबत असतात. वाघ, चित्ते आणि अस्वलें यांची संख्या तर पुष्कळच आहे. यांशिवाय लांडगे, कोल्हे, रानमांजरें, पाणमांजरें, साळू, हरिण, सांबर, ससे, शेळ्या इत्यादि प्राणी किती आहेत यांची तर गणतीच नाहीं. झाडांवरून हजारों वानरें, माकडें, खारीहि धांवपळ करीत असून त्यांचा सर्व व्यवहार वरच्यावरच चालतो. पांढरे शुभ्र बगळे, भुऱ्या रंगाच्या

पाणकोंबड्या, तित्तिर पक्षी, लावे, त्याचप्रमाणें गिधाड, घारी, ससाणे सर्वत्र विपुल आढळतात. ब्रह्मपुत्रानदीच्या प्रवाहांतून नानाविध मासे खालीं वर येत असून त्यांच्यावर जगणाऱ्या प्रचंड सुसरी अनेक डोहांतून घरें करून राहातात. सरपटणाऱ्या प्राण्यांमध्यें विखारी सर्प पुष्कळच आहेत. यांत जातिवंत नागहि असतात. कोठें कोठें अजस्र अजगरहि झाडाला विळखा घालून दबा धरून बसलेला असतो.

या जंगलांत राहणारे मूळचे लोकहि जंगलीच आहेत; आणि या जंगली लोकांत जातीहि पुष्कळ आहेत. या रानटी जातींमध्यें नाग, सिंगपो, डफलस, मिरि, कामठी, मटक, मिश्मी, अबोर इत्यादि मुख्य जाति आहेत. पण हे लोक डोंगराळ भागांत व सरहद्दीवरील प्रान्तांत कोठें दहा दहा वीस वीस अशा झोंपड्या बांधून राहातात; व ते तांदूळ, द्विदल धान्य, ऊंस, कापूस, मका, मोहरी, रताळीं इत्यादि पिकें ज्याप्रमाणें पिकवितात त्याचप्रमाणें खाऱ्या पाण्याच्या झऱ्यांपासून ते मीठहि पिकवूं शकतात. जरी हे लोक शेतींचा धंदा करीत असले तरी त्यांची शेती बेताचीच असते. तीवर त्यांची उपजीविका जेमतेम सात आठ महिनेच होऊं शकते; आणि बाकीचे चार महिने ते रताळीं, कंदमुळें यांवरच राहतात. कांहीं जातींचे लोक तिबेट देशाशीं व्यापार करितात. तिबेटी लोकांकडून लोंकरीचें कापड, तरवारी किंवा भांडीं घेऊन त्यांऐवजीं कस्तूरी, टीटा नांवाची तापावर उपयोगी पडणारी औषधी वनस्पति व एक प्रकारचें विष या वस्तु तिबेटी लोकांना ते देतात. हाच काय तो त्यांचा व्यापार !

नाग आणि सिंगफो या जातींचे लोक ब्रह्मदेश व आसाम या देशांच्या सीमेवरील डोंगराळ भागांत राहतात; आणि हिमालयाच्या दक्षिण उतारावर म्हणजे ब्रह्मपुत्रेच्या उत्तर भागीं आका, भूतिआ, डफळा, मिरि, अबोर, आणि मिश्मी इत्यादि जातींचे लोक राहतात.

## आसामांतील वन्य जातींचे लोक



सुरमा खोऱ्यांतील काचर स्त्री



पतकोई पहाडां-तील मिश्मी स्त्री



रणनृत्यास सज्ज झालेला नाग



अबोर स्त्री



खाशी स्त्री



चहाच्या मळ्यांतील आसामी मोलकरीण



ज्यूट (सोनताग)

नाग जातींतील पुरुष उंच, सडपातळ पण बांधेसूद असतात. नाक मात्र फेंदरें असतें. डोळे घारे असतात. बायका ठेंगू असतात पण पुरुषांपेक्षां त्यांचें शरीर पीळदार असतें. तरुणपणीं त्या मोहक दिसतात. या लोकांत नवरा बायको तेवढीं एकत्र राहतात. आणि गांवांतील सर्व मुलें एकत्र निजतात.

या लोकांना अंगांत कपडे घालण्याची आवड नाहीं. ते एक लंगोटी तेवढी घालतात.म्हणूनच यांना नाग लोक म्हणतात. स्वभावानें हे लोक अगदीं आनंदी असतात. यांच्यांत एक विलक्षण चाल आहे; बायकांनीं हुके ओढावयाचे आणि त्यांतील पाणी पुरुषांनीं प्यावयाचें! पुरुषांना रण-नृत्याची फार आवड. एका हातांत भाला, एका हातांत काठी, कमरेला शिंग, गळ्यांत मण्यांच्या माळा, दंडावर भुजबळ, असा यांचा नाचाच्या वेळीं पोषाख असतो. मग ते फेर धरून नाचतात.

यांची शेती करण्याची पद्धत वेगळी आहे. आधीं जंगल तोडाव-याचें, मग ती जमीन भाजून पेरणी करावयाची. दोन वर्षें या जमिनींत पीक काढलें कीं ८–१० वर्षें ती पडीत टाकावयाची. पुन्हां जंगल माजलें म्हणजे मग त्यांत पुन्हा शेती करावयाची. पडीत जमीन पुष्कळ म्हणूनच हें शक्य आहे. विणकाम आणि शिकार याहि कामांत हे लोक हुशार आहेत. मात्र ते अंगांत कपडे घालीत नाहींत तें वेगळें!

भूतिआ लोकांचा बांधा मजबूत असतो. यांची उंचीहि बरी असते. हे जरी भांडखोर असले तरी यांची एकंदर वृत्ति आनंदीच असते. ओझें वाहण्याच्या कामांत हे फारच दमदार असतात. अबोर लोक ठेंगू पण बळकट असतात; आणि ते शेजारच्या सुपीक प्रदेशावर मधूनमधून हल्ला करून तो लुटतात. मिस्मी लोक त्या मानानें उंच व दणकट असतात. ते व्यापार करतात.

ज्यांना आसामी म्हणतात त्या लोकांची जात ब्रह्मी व हिंदी या लोकांच्या मिश्रणानें झालेली आहे. धर्मानें बरेच लोक हिंदू आहेत. तथापि हे लोक दिसण्यांत चिनी लोकांप्रमाणें दिसतात. त्याचप्रमाणें त्यांचा शरीरबांधा बुटका पण धिप्पाड असतो. वर्णानें हे लोक किंचित् पिंगटच आहेत; पण एकंदरींत दिसण्यांत पुरुष कुरूप. स्त्रिया मात्र त्या मानानें पुष्कळच सुंदर असतात.

एकंदर लोकसंख्या इ. स. १९३१ सालीं घेतलेल्या मोजणीप्रमाणें सुमारें ९२,५०,००० असून त्यांपैकीं ५५,००,००० हिंदु आहेत, २७,५०,००० मुसलमान आहेत, २,५०,००० ख्रिस्ती आहेत आणि बाकीचे म्हणजे १०,००,००० मूळचे जंगली रहिवाशी आहेत. मात्र ६७३३४ चौ. मैल इतक्या क्षेत्रफळाशीं लोकसंख्येचें प्रमाण दर चौरस मैलास १३८ लोक इतकेंच पडतें. या लोकांपैकीं शेंकडा सुमारें ४५ लोक बंगाली भाषा बोलतात आणि शेंकडा २१ लोक आसामी भाषा बोलतात. आसामी भाषा बंगाली भाषेला जवळची आहे. तथापि कोर्टकचेऱ्यांतील सर्व काम आसामी भाषेंतूनच चालतें.

शेती करावयास जमीन मुबलक असल्यामुळें आणि पाण्याची टंचाई कधींच नसल्यामुळें येथील शेतकरीवर्ग पुष्कळच सुखी आहे. मात्र शेती सुधारण्याकडे त्याचें फारसें लक्ष जात नाहीं आणि त्याची त्याला जरूरीहि वाटत नाहीं. पण त्यामुळें शेतकरी हा जरी जात्या गरीब व सुजन असला तरी तो आळशी व बेफिकीर असतो. खाण्यापिण्यास पुरेसें अन्नपाणी व थंडीवाऱ्यापासून शरीररक्षणार्थ जाडेंभरडें वस्त्र आणि सरकारी शेतसारा इतक्याच त्याच्या गरजा असतात; आणि त्या भागविण्यापुरतें शेतांचें उत्पन्न आलें, कीं तो मोठ्या खुशींत असतो. एवढें उत्पन्न त्याला विनाश्रम मिळतें. बायकोकडे त्याचा भारीच ओढा असतो; आणि त्या प्रेमळ जोडप्याचें आपल्या मुलाबाळांवर अतोनात प्रेम असतें.

त्याचप्रमाणें म्हातारीं माणसेंहि त्यांना कधीं जड वाटत नाहींत. कोणाचाच भार कोणाला वाटत नसल्यामुळें घरांत प्रेम, आनंद आणि सौख्य यांची कधींच कमतरता नसते. नातेवाइकांचा परामर्ष घेण्यांतहि ते उदार असतात.

आसामी लोकांचें मुख्य खाणें म्हणजे भात, आणि हेंच येथील मुख्य पीक. भाताची शेती नद्यांच्या खोऱ्यांतून चालते. नदीकांठीं नारळहि होतात. तसेंच याच भागांत तागाची व उंसाचीहि लागवड पुष्कळ होते. पर्वतांच्या पायथ्याशीं ज्यूट, गहूं, कापूस, तंबाखू, मका; माथ्यावर रबर आणि उतारावर चहा याप्रमाणें इतर लागवड करण्यांत येते. मधून मधून मोहरीचीं शेतें आणि बटाटयाचे मळेहि आढळतात. डोंगरावर साग, ओक व देवदार यांचीं जंगलें आहेत. खाशी टेकड्यांवर संत्रीं होतात.

आसाम म्हटला कीं चहाचा प्रदेश अशी आपली या प्रदेशाबद्दलची आपल्या लहानपणापासूनच ओळख झालेली असते; आणि ही गोष्ट खरी आहे. आसाममध्यें चहाचे मळे पुष्कळ आहेत. पण हे मळे आसामी लोकांचे नसून बरेचसे युरोपियन लोकांच्या मालकीचे आहेत; आणि या मळ्यांतून काम करणारे मजूरहि आसामी नसून दुसऱ्या प्रान्तांतले हिंदी आहेत. बंगाली आणि बिहारी मजूर पुष्कळच आहेत; कारण आसामी लोकांना आपल्या कुटुंबांस पोसण्याकरितां मजूरी करण्याचें कारणच पडत नाहीं, हें आपण पाहिलेंच आहे. मात्र आसाम प्रांताची उत्पन्नाची बरीचशी वाढ चहामुळेंच झालेली आहे यांत शंका नाहीं. या प्रदेशांत चहाचें झाड वाढू शकतें ही गोष्ट इ. स. १८२३त रॉबर्ट ब्रूस नांवाच्या एका इंग्लिश व्यापाऱ्याच्या लक्षांत आली. पुढें त्याच्या आणि त्याच्या भावाच्या प्रयत्नानें तेव्हांचे ग. ज. लॉर्ड बेंटिंक यांच्या नजरेस ही गोष्ट आणण्यांत आली. त्यांनीं प्रोत्साहन दिल्यामुळें कलकत्ता येथील सरकारी बागेंत या झाडांच्या लागवडीबद्दल प्रयत्न व प्रयोग करण्यांत आले. पुढें लॉर्ड

ऑक्लंड् यांच्या कारकीर्दींत खुद्द आसामांतच चांगलें बियाणें पैदा करून कांहीं रोपें तयार करण्यांत आलीं. या कामाकरितां चीन देशांतून कांहीं तज्ज्ञ मळेवाले प्रथम आणण्यांत आले. त्यांच्या साहाय्यानें हा प्रयोग यशस्वी झाल्यावर १८३९ सालापासून कंपनी सरकारनें आपल्या देशबांधवांना कंपन्या स्थापन करण्यास संमति व प्रोत्साहन देऊन आणि या कामीं त्यांना सर्व प्रकारची ( म्हणजे जमिनी मिळवून देणें, मजूर आणवून देणें व भांडवल जमवून देणें ) मदत करून त्यांच्या स्वाधीन हें काम केलें. आज आसामांतील सुमारें ४,३४,००० एकर जमीन चहाच्या मळ्यांत गुंतलेली आहे.

आसामांत दगडी कोळसा व पेट्रोल ही खनिज संपत्ति सांपडते. दगडी कोळशाच्या खाणी नाग डोंगरांत व लक्ष्मीपूर जिल्ह्यांत आहेत, आणि पेट्रोलच्या विहिरी ब्रह्मपुत्रा व सुरमा या नद्यांच्या खोऱ्यांतून पसरलेल्या आहेत. आसामांत इतरहि कांहीं धंदे थोड्या बहुत प्रमाणांत सर्वत्र आढळतात. रेशीम तयार करणें व कापड विणणें हे घरगुती धंदे होत. कापड विणणें तर घरोघरीं चालतें. गलबतें बांधणें, भांडीं घडविणें, व चुना करणें हेहि धंदे पुष्कळ ठिकाणीं चालतात.

ब्रह्मपुत्रा नदीला कुंडिल, डिगरू, टेंगपनी, डिहिंग, डिंबग, डिहांग, सुबनस्तिरि, मानस, धनस्तिरि, आणि कलंग इत्यादि नद्या आसाम प्रदेशांतच मिळत असल्यामुळें आसामांत जिकडेतिकडे नद्यांचें जाळेंच पसरलें आहे; आणि या नद्याहि त्या मानानें रुंद, खोल आणि संथ असल्यामुळें आसामांतून प्रवास करावयास होड्या, गलबतें, तारवें व बोटी यांची फार सोय झालेली आहे; आणि नियमितपणें प्रवास करतां यावा म्हणून या भागांत ‘ दि इंडिअन जनरल नॅव्हिगेशन कंपनी ’ आणि ‘ दि रिव्हर स्टीम नॅव्हिगेशन कंपनी ’ या दोन कंपन्यांनीं बोटींचे तांडे ठेवून ठराविक बंदरांपासून ठराविक वेळीं त्या बोटींतून जाण्यायेण्याची

उत्तम व्यवस्था केली आहे. ब्रह्मपुत्रा नदीस मिळणाऱ्या डिब्रूनदीवरील डिब्रूगडापर्यंत बोटी जात येत असतात.

आसामांतून एक लोहमार्गहि नेण्यांत आला आहे. पूर्वबंगालचें मुख्य बंदर चितगांग. येथून त्याच प्रान्तांतील उत्तरेकडील अखौरा स्टेशनापर्यंत जो लोहमार्ग जातो त्याला जोडूनच आसाममध्यें लोहमार्ग नेण्यांत आला आहे. अखौराहून हा लोहमार्ग थेट ईशान्येकडे जातो. हिमालय पर्वताच्या पूर्व टोंकाला ज्या ठिकाणीं ब्रह्मपुत्रा नदी वळसा घालते त्याच्या जवळच सादीय हें या लोहमार्गाचें शेवटचें स्टेशन आहे. अखौरा स्टेशन सोडल्यापासून एकसारखे घाट चढावे व उतरावे लागतात. याचे लोहमार्गावरील दुसऱ्या घाटमाथ्यावरील लुमडिन स्टेशनला जोडून आसाम प्रान्ताच्या पश्चिम भागांतून त्या भागांतील मुख्य शहर जें गौहत्ती तेथपर्यंत एक फांटा नेण्यांत आला आहे. या लोहमार्गांना आसाम-बंगाल रेल्वे कंपनीचे लोहमार्ग म्हणतात. गौहत्ती हें शहर ब्रह्मपुत्रा नदीच्या डाव्या तीरावर वसलें आहे. उजव्या तीरापर्यंत ब्रह्मपुत्रानदीला समान्तर असा एक फांटा ब्रह्मपुत्रानदीच्या खोऱ्यांतूनच ईस्टर्न बेंगाल रेल्वे कंपनीनें कुचबिहार संस्थानांतून आणलेला आहे. या लोहमार्गाचें अमिनगांव हें गौहत्तीसमोरील ब्रह्मपुत्रेच्या उजव्या तीरावरचें स्टेशन होय. गौहत्ती हें ब्रह्मपुत्रा नदीवरील एक प्रख्यात बंदरहि आहे. येथें ब्रह्मपुत्रा नदीचें पात्र बरेंच खोल व एका मैलाहून रुंद असल्यामुळें येथें अद्याप तरी लोहमार्ग एका तीरावरून दुसऱ्या तीरावर नेण्याकरितां पूल बांधण्यांत आलेला नाहीं. पण उतारू लोकांना एका तीरावरून दुसऱ्या तीरावर नेण्याकरितां बोटींची चांगली सोय करण्यांत आली आहे. गौहत्तीच्या समोर ब्रह्मपुत्रा नदीच्या पात्रांत एक बेट आहे. त्या बेटांत कामाख्य नांवाचें एक सुंदर व रम्य देवस्थान आहे. तेथें मोठी यात्रा जमते.

ज्या ठिकाणीं हिमालय पर्वतास ब्रह्मपुत्रा वळसा घालते त्या

ठिकाणीं तिला पुष्कळ कड्यांवरून उतरावें लागतें. त्यामुळें या अनेक लहान मोठे धबधबे उत्पन्न झाले आहेत. आसामच्या जिल्ह्यांत तर एक प्रचंड खिंड आहे. त्या खिंडींतूनच ब्रह्मपुत्रा आ प्रवेश करते. त्यामुळें या खिंडीला एक प्रकारचें अपूर्व व भव्य असें प्राप्त झालें आहे. या खिंडींतील डोहास ब्रह्मकुंड म्हणतात. ये दुर्गम पण मनोहर आणि भव्य देखाव्यांमुळें या स्थानास स्वाभाविक पवित्रपणा आला आहे; म्हणून दरवर्षी अनेक हालअपेष्टा सोसूनहि हजारों भाविक लोक या पवित्र स्थळीं यात्रेस जात असतात.

ब्रम्हपुत्रा व सुरमा यांच्या खोऱ्यांतून लोहमार्गानें प्रवास करणें कठिण नाहीं. सुरमा नदीच्या पात्रांतून सिल्हेटपर्यंत पावसाळ्यांत तरी जातां येतें. पण आसाम प्रांतांतील बराच मुलूख डोंगराळ व पर्वतांच्या रांगांनीं भरलेला असल्यामुळें या भागांतून प्रवास करणें अतिशयच त्रासदायक व कांहीं कांहीं ठिकाणीं तर अशक्यप्रायच आहे. कारण, पर्वतांच्या व डोंगरांच्या रांगा दाट जंगलांनीं भरगच्च आच्छादलेल्या तरी आहेत किंवा पुष्कळ ठिकाणीं त्यांचे कडे उंच उंच असून, ते एकमेकांपासून तुटलेले आहेत किंवा मधूनमधून खोल खोल दऱ्या तरी आहेत. त्यामुळें एका रांगेवरून दुसऱ्या रांगेवर जाणें दुर्गम होतें. पायीं प्रवास करावयाचा म्हटल्यास तेंहि अपायकारक असतें. जमीन नेहमीं भिजलेली असून उंच गवत, कळक व बोरू यांनीं भरून गेलेली असते, आणि चिखलांतून गेल्यास पायांतील रक्त जळवा शोषून घेतात. याचा परिणाम असा झाला आहे कीं डोंगराळ भागांत जे मूळचे रानटी लोक राहतात त्यांचा एक- मेकांशीं संबंध येत नहीं आणि सखल भागांत राहणाऱ्या लोकांचा संबंध तर रानटी लोकांशीं मुळींच येत नाहीं. या दळणवळणाच्या अडचणीं- मुळेंच या भागांत आरंभीं सांगितल्याप्रमाणें अनेक रानटी जाती निर्माण झाल्या आहेत व त्यांच्यांत सुधारणाहि होणें कठीण जात आहे. कांहीं

भागांतून बैलगाडींचे आणि मोटारींचे रस्ते तयार करण्यांत आले आहेत व येत आहेत. गौहत्तीपासून आसामच्या राजधानीच्या शहरापर्यंत म्हणजे शीलॉंगपर्यंत एक मोटारगाडीचा रस्ता नेला आहे. त्याचप्रमाणें आसाम-बंगाल लोहमार्गावरील दिमापूर स्टेशनपासून पूर्वेकडील मणिपूर संस्थानची राजधानी इंफल येथपर्यंतहि मोटार जाण्याजोगा रस्ता गेला आहे. मोटारींची वाहतुक वाढणार म्हणून रस्तेहि सुधारत आहेत; लोहमार्गांचे लहान लहान फांटेहि ठिकठिकाणीं काढण्यांत येत आहेत.

आसाम प्रांतांतून दगडी कोळसा, पेट्रोल, चुनखडी हे खनिज पदार्थ; कापूस, रेशीम, टस्सर, मोहरी व मोहरीचें तेल, लाख, इमारतीचें लांकूड, वेत, कळक, चटया, वेताच्या छत्र्या, रबर, मेण, मध, संत्रीं, मोसंब्री आणि चहा हे उद्भिज पदार्थ; आणि लोंकर, हस्तिदंत, खेंचरें वगैरे प्राणिज पदार्थ कलकत्त्यास व चितगांवास पाठविण्यांत येतात. तेथून ते निरनिराळ्या देशीं जातात.


आसामांतील वन्य जातींच्या लोकांना जरी इतर देशांत उत्पन्न होणाऱ्या पदार्थांवर अवलंबून राहावें लागत नसलें तरी आसामांतील जे चहाचे मळेवाले आहेत त्यांना आणि त्यांच्या मळयांत काम करणाऱ्या बिहारी व बंगाली मजुरांना धान्य, तेल, मीठ, कापड, छत्र्या वगैरे गोष्टींची गरज लागत असल्यामुळें त्यांना या गोष्टी आणवाव्या लागतात.

राज्यव्यवस्थेसाठीं आसामप्रान्तांत डोंगराळ मुलुखाचे गारो, खासी, जैन्तीया, नाग, कचर; सुरमा नदीच्या खोऱ्यांत सिल्हेट व कचराचा सखल प्रदेश आणि ब्रह्मपुत्रा नदीच्या खोऱ्यांत गारोचा सखल प्रदेश, गोलपाडा, कामरूप, डरंग, नौगॉंग, सिब्रसागर आणि लक्ष्मीपूर असे एकूण १४ भाग केले आहेत. आसामांत शहरें अशीं विशेष नाहींतच. मोठालीं गांवेंहि थोडींच आहेत आणि जीं आहेत तीं नद्यांच्या कांठीं आहेत. ब्रह्मपुत्रानदीच्या खोऱ्यांत गोलपाडा, गौहत्ती, तेजपूर, सिब्रसागर, डिब्रुगड

हीं मुख्य होत. सुरमेच्या खोऱ्यांत सिल्हेट आणि सिलचर हीं मुख्य होत. शिलाँग ही आसाम प्रांताची राजधानी शिलाँगच्या डोंगरांत आहे. हें एक उत्तम हवेचें ठिकाण आहे.

मणिपूर हें संस्थान आसामांतच मोडतें. हें ब्रह्मदेश व आसाम यांच्या सीमेवर आहे. सभोंवतीं डोंगरांच्या रांगांचे अनेक तट पसरलेले असून मध्यभागीं एक पन्नास मैल लांब व वीस मैल रुंद असें सुंदर खोरें आहे. याची उंची २५०० फूटच आहे. पण सभोंवार पसरलेल्या पर्वतांचीं शिखरें १०,००० ते १३,००० फूट उंचीचीं आहेत. संस्थानाचें एकंदर क्षेत्रफळ ८६२५ चौरस मैल असून लोकसंख्या ४,४५,६०० आहे. पैकीं शेंकडा ६० लोक हिंदु व शेंकडा ३५ लोक भूत-पिशाच्च, झाडें-झुडपें, दगड-धोंडे यांना भजणारे आहेत. हे वन्य जातीचे लोक होत. सध्यांचे संस्थानाधिपति महाराज चूरचंदसिंह हे १९०८ सालीं गादीवर बसले. इंफळ ही राजधानी आहे.

मणिपूर संस्थानांत अनेक निर्झर व नद्या वाहात असल्यामुळें एकंदर प्रदेश सुपीक झाला आहे. यांपैकीं सुरमा व मणिपूर नद्यांचीं खोरीं पर्वतांतील ओघाबरोबर धुवून येणाऱ्या मातीमुळें फारच सुपीक झालीं आहेत. पाऊस ७० इंच पडतो. हवा थंड व सुखकारक आहे. या खोऱ्यांतून तांदूळ, ऊंस, तंबाखू, द्विदळ धान्यें आणि मोहरी यांचें पीक उत्तम येतें. त्याचप्रमाणें संत्रीं, मोसंबीं, साखरलिंबू, ईडलिंबू, अननस, केळीं, आंबे, फणस इत्यादि फळांच्या बागा व राया पुष्कळ आहेत. पर्वतावरून पुष्कळ झाडी आहे व ती श्वापदांनीं गजबजलेली असते. मणिपूरचीं खेचरें नामांकित आहेत. मणिपुरास कापूस व रेशीम यांचें कापड, कातडी सामान, तांब्यापितळेचीं भांडीं इत्यादि सामान चांगलें तयार होतें. डोंगरांत इमारतीचें लांकूडहि पुष्कळ मिळतें.




( हिमालयाचा आडवा छेद )

हिमालयाच्या दक्षिण-पायथ्यापासून चढत जाऊन सर्व हिमालय ओलांडून तिबेटांत जावयाचें झाल्यास क्रमानें कशा कशा रांगा लागतील तें या आकृतींत दाखविलें आहे.

# ६

## उत्तरेकडील पर्वतमय प्रदेशांची पाहाणी

काश्मीर, नेपाळ, सिक्कीम, भूतान आणि आसाम या प्रांतांचा प्रदेश म्हणजे मुख्यत: अखिल भूगोलावरील हिंदुकुश, काराकोरम, हिमालय, या प्रचंड पर्वतांच्या अनेक रांगा आणि त्यांतील रमणीय खोरीं हीं होत. त्याचप्रमाणें हिमालयाचेच, ब्रह्मपुत्रा नदीचें खोरें ओलांडून भरतखंडाच्या ईशान्यभागीं पसरलेले पतकोई, नाग, जंतिआ, खाशा, गारो भुवन, लुशै इत्यादि लहानमोठे पहाड आणि या पहाडांमधून वाहणाऱ्या मोठमोठ्या नद्या आणि अनेक निर्झर यांचीं सखल व सुंदर खोरीं यांचाहि यांत समावेश होतो. या सर्व भागांचें स्वरूप एका दृष्टीनें जरी सारखें असलें तरी दुसऱ्या दृष्टीनें तें सारखें नाहीं. सर्व प्रदेश पर्वतमय, दऱ्याखोऱ्यांनीं भरलेला, या दृष्टीनें तो सारखा आहे. पण या प्रदेशाच्या कांहीं भागांत जगांत दुसरीकडे कोठेंहि पडत नाहीं इतका अलोट पाऊस पडतो; तर कांहीं भागांत तो मुळींच पडत नाहीं. कांहीं भाग दलदलीचा, तर कांहीं भाग अखंड हिमाच्छादित शिखरांनीं गजबजलेला; कांहीं भाग गगनचुंबी वृक्षांनीं भरगच्च भरून गेलेला; तर कांहीं भाग ओसाड, वैराण आणि केवळ निर्जनच नव्हे तर निर्पशु, निर्पक्षी असा; असे निरनिराळे प्रकार आढळतात. या दृष्टीनें या प्रदेशाचें स्वरूप वेगवेगळ्या ठिकाणीं वेगवेगळें दृष्टीस पडतें.

हिमालय व इतर पर्वत यांची प्रत्येक ठिकाणीं उंची सारखी नाहीं. या पर्वतांच्या पायथ्याशीं एक हजार ते तीन चार हजार फूट उंचीचा, आणि साधारण सखलच म्हणून वरून वाहात येणाऱ्या नद्यांमुळें दलदलीचा, असा प्रदेश आहे. येथील हवा उष्णच. याच्या पलीकडे म्हणजे उत्तरभागीं चार पासून दहा ते अकरा हजार फूट उंचीच्या रांगा आहेत. येथील हवा थंड व आल्हादकारक असते. या रांगा बहुतेक कमी अधिक पडणाऱ्या पावसाच्या प्रमाणाप्रमाणें कमी अधिक दाट जंगलांनीं आच्छादलेल्या असतात. यांच्या पलीकडे बारा हजार ते सोळा हजार फूट उंचीच्या रांगा असून त्या हिवाळ्यांत सहा महिने बर्फाच्छादित असतात; आणि उन्हाळ्यांत या रांगांतून असंख्य निर्झर, नाले, ओहोळ वाहूं लागतात. येथील हवा नेहमींच थंड या सदराखालीं मोडते. हिमालयांतील थंड हवेचीं निरोगी स्थलें ह्याच टापूंत आहेत. हाहि प्रदेश तेथील पावसाच्या कमी अधिक प्रमाणाप्रमाणें विरळ अथवा घनदाट अरण्यांनीं भरलेला असतो. याहीपुढें १७,००० ते २९,००० फूट म्हणजे सर्व जगांत उंच असा प्रदेश लागतो. हा बाराहि महिने म्हणजे हिंवाळ्यांत तसाच उन्हाळ्यांतहि हिमाच्छादित असतो. उन्हाळ्यांत येथील हिमनद्या थोड्याशा जास्त वेगानें वाहतात. म्हणजे मुंगीच्या पायानें न सरकतां त्या मुंगळ्याच्या पायानें सरकूं लागतात एवढेंच काय तें! येथें कोणत्याच प्रकारची वनस्पति उगवणें शक्य नाहीं. हवा नेहमींच अति थंड आणि वर्षाव हिमकणांचाच. पण बर्फाच्याच डोंगराएवढाल्या एकीवर एक राशींच्या राशी पडलेल्या असतात. अर्थात् हा प्रदेश म्हणजे निर्जन, निर्पशु व निर्पक्षी असा होय. सगळीकडे एकजात शुकशुकाट. दिवसा दुधाप्रमाणें शुभ्र आणि आरशाप्रमाणें गुळगुळीत अशा त्या हिमराशीवर तळपणाऱ्या सूर्याचीं तेजस्वी किरणें पडलीं म्हणजे जिकडे तिकडे जो प्रचंड प्रकाश फाकतो त्यामुळें त्या

सर्व प्रदेशावरून रुप्याच्या रसाचे प्रवाहच वाहात आहेत की काय असा भास होतो, आणि अशा वेळीं तेथें कोणताहि प्राणी सहजगत्या गेला तरी त्या दैदीप्यमान प्रकाशामुळें त्याचे डोळे दिपून जातात, इतकें कीं, एखादे वेळीं तो जन्माचा आंधळाहि होतो. अशी येथें भीति असते म्हणूनच येथील गिरिशिखरावर चढून जाण्याचा प्रयत्न करणारे साहसी प्रवासी आपले डोळे कायमचे अधू होऊं नयेत म्हणून डोळ्यांना थंड काळ्या गारेचे चष्मे लावण्यास कधींहि विसरत नाहींत. चष्मा नसल्या-मुळें पुष्कळ प्रवाशांचे डोळे कायमचे किंवा तात्पुरते तरी अधू झालेले आहेत.

प्रदेशाच्या उंचीप्रमाणें ढोबळ मानानें या पर्वतप्रदेशाचे चार भाग पाडले आहेत. ( १ ) उप-पर्वत-प्रदेश, हा एक हजार ते चार हजार फूट उंचीचा प्रदेश होय. ( २ ) मध्य-पर्वत-प्रदेश, हा चार हजार ते बारा हजार फूट उंचीचा प्रदेश होय. ( ३ ) उच्च-पर्वत-प्रदेश, हा बारा हजार ते सोळा हजार फूट उंचीचा प्रदेश; आणि ( ४ ) अत्युच्च-पर्वत-प्रदेश, हा सोळा हजार फुटांहून उंच असलेला होय.

पर्वतप्रदेशाची उंची जशी येथून तेथून एकसारखी नाहीं, तसेंच सर्व भागांवर सारख्या प्रमाणांत पाऊस पडतो असेंहि नाहीं. हिंदु-स्थानांत जो पाऊस पडतो तो मोसमी वाऱ्यांमुळें आणि हे मोसमी वारे जून, जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर या उष्णकाळांतील चार महिन्यांत अरबी समुद्रावरून नैऋत्येकडून ईशान्येकडे वाहात असतात; आणि त्याच प्रमाणें बंगालच्या उपसागरावरून उत्तरेकडे वाहात असतात. त्यामुळें हिमालयाच्या पूर्वभागीं आणि आसामांतील सर्व पहाडांवर या पावसाचा जोर असतो हें आपण पाहिलेंच आहे. मात्र येथील पर्वत-प्रदेशावरील थंड हवेमुळें या भागांत जरी अलोट पाऊस पडत असला तरी या पर्वता-मुळें हे वारे अडविले गेल्याकारणानें त्यांची दिशा बदलून ते आग्नेयकडून

म्हणजे गारो, शिलाँग, खाशी या टेकड्यांच्या रांगांपासून हिमालयाच्या कडेकडेनेंच वायव्येकडील हिंदुकुश पर्वतापर्यंत जाऊन पोंहोंचतात. मात्र जवळजवळ १५०० मैलांच्या या प्रवासांत त्याबरोबर येणाऱ्या ढगांचा पाऊस एकसारखा कमी कमी होत जात असतो. म्हणून आसामांत जितका पाऊस पडतो त्यापेक्षां कितीतरी कमी काश्मीरांत पडतो. ही एक गोष्ट झाली. आतां दुसरीहि एक गोष्ट आपण लक्षांत घेतली पाहिजे, ती ही कीं, पाऊस ज्या दिशेनें येत असतो त्या बाजूच्या पर्वताच्या उताराबर आणि माथ्यावर पाऊस बराच पडतो; आणि त्याच्या उलट्या उतारावर तो बराच कमी पडतो. म्हणजे पर्वतांत जर अनेक रांगा असल्या, आणि हिमालय पर्वतांत तशा अनेक रांगा आहेतहि, तर पहिल्या रांगेच्या वाऱ्याकडे असलेल्या बाजूवर पुष्कळ पाऊस पडतो, आणि उलट्या उतारावर तो कमी पडतो किंवा पडतहि नाहीं. पुन्हा त्याच्या पुढच्या रांगेच्या ( अर्थात् पहिल्या रांगेहून ही रांग जास्त उंच असल्यासच ) पहिल्या उतारावर जास्त पाऊस व तिच्या उलट्या उतारावर पुष्कळच कमी या क्रमानें पाऊस पडत जातो. मात्र तो पुढें पुढें कमी कमी होत जातो. चेरापुंजी व शिलाँग हीं याचीं उदाहरणें होत. दोन रांगांच्या मध्यभागीं जरी कमी पावसाचा प्रदेश असला तरी त्या ठिकाणीं पाण्याची कमतरता असतेच असें नाहीं. उलट एखादे वेळीं दोन रांगांच्या मधल्या सखल व सपाट प्रदेशांतून एखादी नदी व तिला मिळणारे असंख्य ओहोळ वाहात गेल्यास तिच्या संथ प्रवाहामुळें तेथें एखादें रम्य खोरें उत्पन्न होतें. काश्मीरचें खोरें, नेपाळचें खोरें आणि मणिपूर संस्थानचें खोरें हीं खरीं याच कारणामुळें रमणीय झालेलीं आहेत.

प्रदेशाच्या कमीजास्त उंचीवर आणि पावसाच्या मानावर तेथें कोणत्या प्रकारची वनस्पति स्वाभाविकपणें उगवावयाची हेंहि अवलंबून

असतें. या दृष्टीनें आतां या पर्वतप्रदेशाची आपण पाहणी करूं या. उंचीच्या मानानें या प्रदेशाचे चार भाग पडतात हें पाहिलेंच आहे.

**पहिला भाग उप-पर्वत-प्रदेशाचा** किंवा **पर्वत-पायथ्याचा**

हा जास्तींत जास्त चार हजार फूट उंच आहे. येथील हवा एकंदरींत उष्णच. या प्रदेशांत पाऊस पडत असल्यास ती दमट व कांहींशी सम होते. पण पडत नसल्यास ती कोरडी व विषम असते. नेपाळच्या दक्षिणेस तराई, भूतानच्या दक्षिणेस द्वारें किंवा दुआरें आणि आसामांतील ब्रह्मपुत्रा व सुरमा या नद्यांचीं खोरीं व पांच हजार फुटांपर्यंत उंच असलेला प्रदेश या भागांत दरवर्षी चाळीस इंचांवर पण शंभर इंचांच्या आंत बाहेर पाऊस पडतो. यांत पुन्हा दोन भाग करावयाचे—( १ ) ज्या टापूंत चाळीस इंचांवर पण ऐशीं इंचांच्या आंत पाऊस पडतो त्या ठिकाणीं उष्ण कटिबंधांत वाढणाऱ्या आणि हिंवाळ्यांत ज्यांचीं पानें गळतात अशा झाडांचीं अरण्यें होतात, आणि ( २ ) ज्या टापूंत ऐशीं इंचांवर पाऊस पडतो त्या ठिकाणीं उष्ण कटिबंधांत उगवणाऱ्या पण सदा हिरवीं राहणाऱ्या अशा झाडांचीं अरण्यें वाढतात. तराईंत जीं अरण्यें वाढलीं आहेत तीं पहिल्या प्रकारचीं होत आणि दुआरें व आसामांत जीं अरण्यें वाढलीं आहेत तीं दुसऱ्या प्रकारचीं होत. हे दोन्ही टापू हवेच्या दृष्टीनें मनुष्याला रहावयास अपायकारकच आहेत. कारण उष्ण आणि दमट अशी हवा, दलदलीचा प्रदेश आणि माजलेलें गवत, बोरू व वेत यांचीं घनदाट बेटें; साग, शिसव, रबर वगैरे झाडांच्या गर्द अरण्यांमुळें सगळीकडे काळोख असतो. मात्र येथील पाणथळ जागीं हत्ती, गेंडे, पाणघोडे, सुसरी, हे प्राणी सर्वत्र आढळतात. नेपाळच्या तराईंत त्या मानानें कमी.

**मध्य-पर्वत-प्रदेश** किंवा **पर्वताच्या मधल्या रांगा हा दुसरा भाग**

यांत पावसाचें प्रमाण कमी असतें हें खरें, पण हवा थंड असते. कारण या प्रदेशाची उंची ५००० ते १२,००० फूट इतकी असते. म्हणून

पाऊस जरी कमी पडत असला तरी येथें झाडी वाढते. यांतहि दोन प्रकार पडतात. ( १ ) ज्यांचीं पानें रुंद असतात अशा प्रकारचीं झाडें; ओक, पॉप्लर, एल्म् , यू , चेस्टनट, अक्रोड, भूर्ज, बीच, ॲश, मॅपल इत्यादि झाडें या भागांत वाढतात. (२) ज्यांचीं पानें चिंचोळीं व निमूळतीं असतात अशा झाडांचीं अरण्यें. यांस सूचिपर्णी वृक्षांचीं अरण्यें म्हणतात. यांत देवदार, फर, सुरू, चिनार, स्प्रूस, सीदर इत्यादि झाडें वाढतात. झाडांपासून इमारतीचें लाकूड, टर्पेन्टाइन, लाख इत्यादि गोष्टी मिळतात. हवेच्या दृष्टीनें हा पट्टा फारच चांगला असतो. थंड, आल्हादकारक, श्रम केल्यानेंहि थकवा उत्पन्न न करणारी, अशी येथील हवा असल्या-कारणानें थंड हवेचीं ठिकाणें याच पट्ट्यांत आहेत. मुरी, सिमला, मसूरी, नैनिताल, दार्जिलिंग, शिलाँग इत्यादि स्थळें प्रसिद्ध आहेत. काश्मि-रांतील श्रीनगर, किलनमर्ग, गुलमर्ग हीं ठिकाणें तर सर्व जगांत पहिल्या प्रतीचीं समजलीं जातात.

## तिसरा टापू उच्च-पर्वत-प्रदेशाचा

या भागांत सूचिपर्णी वृक्षांचींच अरण्यें वाढतात. मात्र हीं त्या मानानें विरळ असतात, आणि प्रदेशाची उंची जों जों वाढते तों तों तीं खुरटीं होत जातात. कारण या भागांत थंडीचें मान फार असतें; आणि ती झाडांची वाढ खुंटविते. मात्र येथील भागांतच कस्तूरी-मृग आढळतात. नेपाळच्या भागांत हे मृग पुष्कळ आहेत. यॅक हा प्राणीहि याच भागांतील होय. त्याच्या अंगावर लांब व दाट केंस असतात. ओझें वाहण्याच्या कामीं आणि डोंगरावरून चढ उतार करण्याच्या कामीं याचा फारच उपयोग होतो. या भागांत बऱ्याच नद्या उगम पावल्या आहेत. झेलम, बिआस, रावी, सतलज, घोग्रा, गंडकी, कुशी, मानस, सुरमा, मणिपूर वगैरे नद्या याच भागांत उगम पावलेल्या होत.

## चवथा भाग म्हणजे अत्युच्च-पर्वतांचा

यांत गिरिशिखरेंच पुष्कळ आहेत. गॉडविन आस्टेन, नंगापर्वत, कैलासपर्वत, नंदा देवी, धवलगिरी, गौरीशंकर, कांचनगंगा, चमलारी यांसारखीं जवळ जवळ पंचवीस तीस शिखरें तरी आढळतील. हीं सर्व २०,००० फुटांहून उंच असलेलीं. १६,००० ते २०,००० फुटांपर्यंत उंच असलेलीं तर पुष्कळच आहेत. हीं शिखरें व अत्युच्च पर्वतांच्या निरनिराळ्या रांगा या नेहमींच बर्फाच्छादित असतात. त्यामुळें येथें कोणतीच वनस्पति वाढूं शकत नाहीं. या भागांतून हिमनद्या वाहात असतात; आणि पुढें यांच्याच गुहांतून नद्या उगम पावतात. सिंधु, ब्रह्मपुत्रा, गंगा, यमुना, सतलज, कुशी इत्यादि नद्या अशा बर्फाच्छादित गुहांतूनच उगम पावल्या आहेत. गंगोत्री आणि जम्नोत्री हीं उगमस्थानें हिंदु लोकांच्या पूर्ण परिचयाचीं आहेत. या भागांत मनुष्यवस्ती कायमची असणेंच शक्य नाहीं. यात्रेनिमित्त अगर व्यापारानिमित्त जे लोक जात येत असतील तेवढेच. एका सिकीम संस्थानांतून प्रवास केला तर हे सर्व प्रदेश व जगांतील वनस्पतींचे प्रकार पाहण्याचें श्रेय मिळतें.

पहिल्या तीन भागांत मनुष्यांनीं योग्य किंवा उपयुक्त ठिकाणें पाहून वस्ती केली आहे, आणि त्या त्या ठिकाणीं पाऊस पाणी यांचें प्रमाण, थंडीचें व उष्णतेचें मान व त्यांची मुदत आणि एकंदर हवेचें लक्षण या गोष्टी पाहून तेथें कोणकोणत्या प्रकारचीं पिकें काढणें शक्य आहे याचा अनुभव घेऊन त्या त्या प्रकारचीं पिकें काढून त्यांवर आपली उपजीविका ते करूं लागले आहेत. काश्मीरच्या खोऱ्यांत, नेपाळच्या खोऱ्यांत, आसामांत आणि मणिपूर संस्थानांत तंबाखू, कापूस, ऊंस, गहूं, मका, बार्ली, तांदूळ हीं पिकें होतात. उत्तम प्रकारचीं आणि नाना प्रकारांचीं फळझाडें वाढतात आणि भाजीपालाहि मुबलक


तयार होतो हें आपण पाहिलेंच आहे. तथापि काश्मिरांतील केशर व रेशीम आणि आसामांतील चहा व ज्यूट या पिकांना विशेष महत्त्व आहे.

मनुष्यांनीं येथील कांहीं प्राण्यांचाहि चांगला उपयोग करून घेतला आहे. अर्थात् ज्या भागांत जे प्राणी आढळतात त्यांचाच त्या भागांत उपयोग होतो. आसाम, दुआरें आणि तराई या जंगलांतून हत्ती सांपडतात. या अवाढव्य आणि सशक्त प्राण्यांचा उपयोग प्रचंड सागवानी तुळया उचलून नेण्याकडे पुष्कळच होतो. हस्तिदंताची किंमतहि पुष्कळ येते. गेंड्याच्या कातड्याचा फार उपयोग होतो. डोंगराळ व चढउतारांच्या प्रदेशांत जाण्यायेण्याला खेंचरें, गाढवें, शेळ्या, मेंढ्या आणि यॅक हे प्राणी नसते तर मनुष्यांना स्वत:च्या पाठीवरून ओझें नेण्याशिवाय गत्यंतर नव्हतें. कांहीं कांहीं डोंगराळ भागांतील रानटी लोक भलीं मोठीं ओझीं आपल्या पाठीवरून नेतातहि. काश्मिरांतील पश्मिना मेंढ्यांना चांगली किंमत येते. त्यांच्या लोकरीच्या शाली जशा प्रख्यात आहेत, तसाच नेपाळांतील व भूतानांतील कस्तूरी-मृगाचा सुवास जगभर पसरला आहे. असो.

पर्वतप्रदेशांतील लोकांची राहणी साधी व त्यांच्या गरजा बेताच्या यांमुळें त्यांना इतर प्रान्तांत होणाऱ्या पदार्थांवर फारसें अवलंबून राहावें लागत नाहीं. उलट आपल्या निसर्गरमणीय प्रदेशांत ते एकंदरीनें आनंदांत, सुखांत व कांहीं अंशीं ‘ स्वातंत्र्यांतच ’ राहतात, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.



आर्यलोक आले तेव्हां ] खैबर-खिंड [ हा बोगदा नव्हता.



आर्यलोकांनीं नावेंतून ] सिंधूवरील·पूल-अटक [ ही नदी ओलांडली.

# ७

# पंजाब–धर्मवीर आणि कर्मवीर शीखांचा प्रदेश

पुराणप्रसिद्ध पांडवांनीं पंजाबांतच आपली प्रख्यात राजधानी इंद्रप्रस्थ येथें राज्य केलें. आणि हल्लींची राजधानी दिल्ली ही इंद्रप्रस्थाजवळच आहे. कौरव-पांडवांमधील घनघोर भारतीय महायुद्ध हें पंजाबांतील सुप्रसिद्ध कुरुक्षेत्राच्या रणांगणावर म्हणजे आधुनिक पानिपताच्या विस्तृत अशा पटांगणाजवळच धडाडलें. प्राचीन' आर्य लोकांनीं म्हणजेच पांडवांच्या व आपल्याहि पूर्वजांनीं फार पुरातन काळीं भरतखंडाच्या वायव्येकडील खैबर-खिंडींतून मार्ग काढीत प्रथम सिंधुनदाच्या उजव्या तीरावर आणि नंतर सिंधुनद ओलांडून डाव्या तीरावर वसाहती स्थापिल्या. नंतर तो प्रांत पुरा पडेना म्हणून झेलम, चिनाब, रावी, बिआस व सतलज या नद्यांच्या दुआबांतील प्रदेशांत आपल्या वसाहती क्रमाक्रमानें वाढवीत त्यांनींच तेथील मूळ झाडी-जंगल तोडून पंजाब प्रांत निर्माण केला. या पांच नद्यांमधील प्रदेश म्हणून जरी याला 'पंजाब' किंवा 'पंचनद' नांव मिळालें असलें तरी या प्रदेशाला ' सप्ताब ' किंवा 'सप्तनद' हेंच नांव एका अर्थी सार्थ झालें असतें. कारण पूर्वीं ' सप्तसिंधु ' हें नांव या प्रदेशास होतेंच. या प्रदेशाची पश्चिमेकडील मर्यादा जशी सिंधुनदानें आंखली आहे, तशी पूर्वेकडील मर्यादा यमुनेनें घातली आहे. वरील पांच नद्या आणि सिंधु व यमुना या दोन नद्या मिळून सात नद्यांचा हा प्रांत होतो. तथापि मधल्या मुख्य प्रदेशांतून पांचच नद्या वाहात असल्यामुळें पंजाब हें नांव

तेथील लोकांनीं कायम केलें असावें. प्राचीन मुनींनीं हिंदुधर्माचा पुराण-प्रसिद्ध ऋग्वेद येथेंच तयार केला अशी या प्रान्ताची महति आहे.

या सातहि नद्या हिमालयाचा सर्व प्रदेश ओलांडून मगच पंजाबांत शिरतात. हा प्रान्त सखल व सपाट असल्यामुळें या नद्या संथपणें वाहूं लागतात. पंजाब प्रान्ताची उंची ५०० ते ९०० फूट आहे. नाहीं म्हणावयास पंजाबच्या ईशान्य भागांतून मात्र हिमालयाच्या शिवालिक नांवाच्या कांहीं रांगा पसरलेल्या आहेत आणि वायव्येकडील कोपऱ्यांतून सर्व जगांत मोठे असे मिठाचे डोंगर आहेत. अगदीं पश्चिमेकडील सीमेवर सुलेमान पर्वताची रांग आहे. सतलज नदी हिमालयांतील कैलासशिखराजवळील मानस व राक्षस सरोवरांतून उगम पावते. तेथून जवळ जवळ २०० मैल वाहात जाऊन शिपकी घाटापाशीं हिमालयाच्या खोल खिंडींतून खालीं उतरून नंतर ती नैऋत्य दिशेनें पर्वत-पायथा उतरूं लागते. याच पर्वत-प्रदेशांत सिमला हें व्हाइसरॉयांचें प्रसिद्ध थंड हवेचें ठिकाण आहे. सिमल्याहून सतलज नदीचें खोरें सारें पंधरावीस मैलांवर आहे. बिआस नदी पंजाबच्या ईशान्य कोपऱ्यांत असलेल्या हिमालयाच्या कुलु नांवाच्या हिमाच्छादित रांगेंत सुमारें १३,३२५ फूट उंचावर उगम पावते; आणि जालंदर खोऱ्यांतून १००।१२५ मैल वाहात जाऊन मग सखल प्रदेशांत येते. पुढें १५० मैल वाहात गेल्यावर ती कपूरथळापाशीं सतलज नदीस मिळते. रावी नदीचा उगम काश्मिरांतील पीर-पंजाल रांगेच्या दक्षिण उतारावरील चांबा-खोऱ्यांत होतो. सुमारें पन्नास मैलांचा उतार उतरल्यावर धौलधार पर्वतास वळसा घालून पथनकोटाजवळ ही पंजाबच्या सखल प्रदेशांतून वाहूं लागते. पुढें पंजाबांतील या पांचहि नद्या एकमेकांस मिळत मिळत एक होऊन मिथुनकोटपाशीं सिंधू नदीस मिळाल्यामुळेंच सिंधु नदीचा सिंधुनद बनतो. जरी एकंदर प्रांतास पंजाब हें नांव देण्यांत आलें असलें तरी प्रत्येक दोन नद्यांमधील भागास

( दुआबास ) निरनिराळीं नांव देण्यांत आलीं आहेत. सिंधु व झेलम या नद्यांमधील भूप्रदेशास (१) सिंधु-सागर दुआब म्हणतात. झेलम व चिनाब यांमधील भूभागास (२) झेच दुआब म्हणतात. चिनाब व रावी यांच्यामध्यें पसरलेल्या भूमीस (३) रेचना दुआब म्हणतात. रावी व व बिआस यांमधील प्रदेशास (४) बारी दुआब आणि रावी व सतलज यांमधील प्रदेशास (५) जालंदर दुआब हीं नांवें देण्यांत आलीं आहेत. सिंधु नदी आणि सुलेमान पर्वत यांमधील प्रदेशास दिराज म्हणतात. सतलज आणि यमुना यांमधील प्रदेश दोन नद्यांच्या कैचींत येत नसल्या-मुळें त्या प्रदेशास दुआब ही संज्ञा लागू पडत नाहीं; मात्र प्राचीन काळीं या दोन नद्यांमधील प्रदेशांतून सरस्वती नांवाची प्रसिद्ध नदी वाहात जाऊन तीहि सिंधुनदाला मिळत असे. पण हल्लीं ती पंजाबच्या दक्षिणेस असलेल्या राजपुतान्यांतील वाळवंटापर्यंत जेमतेम वाहात जाऊन पुढें त्यांतच गडप होते. सरस्वती व तिला मिळणाऱ्या घगर नद्यांमधील भागास ब्रह्मावर्त म्हणत. वरील प्रत्येक दुआबांतील प्रदेश, पर्वतांचा प्रदेश वेगानें उतरून येत असतां नद्यांबरोबर जी माती धुपून येते त्या मातीचा झालेला आहे. हे प्रदेश इतके सपाट आहेत कीं, एका मैलाच्या टापूंत नद्यांना सारा दोन फुटांचा उतार उतरावा लागतो. यामुळें नद्यांना पूर आला म्हणजे त्यांच्या दोन्ही तीरांवर पाणी पसरतें. नद्यांना पूर एकदम व भरपूर येत असल्यामुळें आणि तीराकांठची जमीन केवळ माती व वाळू यांचीच बनली असल्यामुळें पूर आला म्हणजे पाण्याच्या ओघामुळें नद्यांचीं पात्रें सारखीं बदलत असतात. त्यामुळें पात्रें खोल असूनहि जलमार्ग म्हणून त्यांचा फारसा उपयोग होत नाहीं. नावा, होड्या, मचवे व लहान लहान बोटी यांच्यांतून थोडें बहुत दळणवळण चालतें, नाहीं असें नाहीं. तथापि पंजाबांत पावसाचें प्रमाण एकंदरींत कमीच असल्यामुळें या नद्यांना बांध घालून त्यांचे कालवे दुआबांतील

भूप्रदेशांत शक्य त्या त्या ठिकाणीं पाण्याचा पुरवठा करण्याकरितां नेण्यांत आले आहेत. त्यामुळें पंजाबांत दुष्काळ असा पाण्याच्या कमतरतेमुळें तरी फारसा कधीं पडत नाहीं. नद्यांना पावसाळी पूर येतातच, पण उन्हाळ्यांतहि पूर येतात. कारण सर्वच नद्या हिमाच्छादित पर्वतावर उगम पावणाऱ्या आहेत. म्हणून काल्व्यांनाहि पाणी कमी पडत नाहीं. उलट कालवे काढले असल्यामुळें एकदम पूर येऊन जी शेतांतील पिकांची नासाडी किंवा कांठीं असलेल्या गांवांतील मनुष्यांची प्राणहानी झाली असती, ती फारशी होत नाहीं. कारण काल्व्यांमुळें पुराचें पाणी आपोआपच वांटलें जाऊन पुष्कळ प्रदेशावर पसरतें. त्यामुळें पुष्कळ प्रदेशास पुराच्या पाण्याचा फायदाच होतो. या प्रान्तांत प्रथम फेरोजशहा तखलघ यानें रावी व यमुना या दोन नद्यांचे कालवे काढले, हें त्यास खरोखरच भूषणावह आहे. शेतकऱ्यांची त्यानें सोय लावली. ब्रिटिश अंमदानींत तर सर्वच नद्यांना कालवे काढण्यांत आले आहेत. हल्लींच्या पंजाबसरकारनें कालवे खणण्याकरितां बत्तीस कोटि रुपये खर्चले. हल्लीं या काल्व्यांमुळें जवळ जवळ ८६ लक्ष एकर जमीन लागवडीखालीं आणण्यांत आली आहे. पंजाबचें क्षेत्रफळ एकूण १,३६,३३० चौरस मैल आहे; आणि एवढ्या क्षेत्रफळाच्या मानानें काल्व्यांमुळें लागवडीखालीं आणलेली इतकी जमीन जगांत दुसरीकडे कोठेंहि नाहीं. या काल्व्यांमुळें वर्षांतून दोन वेळां एकाच जमिनींतून पिकें काढतां येतात.

पंजाबांत वर्षांतून दोन वेळां पाऊस पडतो. एकदां उन्हाळ्यांत मोसमी वाऱ्यांमुळें जून ते सप्टेंबरपर्यंत; आणि दुसऱ्यांदां हिंवाळ्यांत डिसेंबर ते मार्चपर्यंत म्हणजे जवळ जवळ आठ महिने येथें पावसाळा असतो. हिंवाळ्यांतील पावसाचें लक्षण वळीव पावसाप्रमाणें असतें. पाऊस अर्थात् ईशान्येकडील हिमालयाच्या प्रदेशांत व जवळपास पुष्कळच पडतो. इतरत्र त्या मानानें कमी. पूर्वेकडून पश्चिमेकडे पावसाचें मान कमी

कमी होत जातें. हिमालयाखेरीज इतरत्र पाऊस जास्तींत जास्त ४० इंचांवर पडत नाहीं. आग्नेय ते वायव्य अशी रेघ मारून पंजाबचे जर दोन भाग पाडले तर नैऋत्येकडील निम्या भागांत वार्षिक पाऊस २० इंचांहूनहि कमी पडतो. ईशान्येकडील हिमालयाच्या कांहीं भागांत मात्र ८० इंचांहूनहि जास्त पाऊस पडतो. ज्या भागांत पाऊसहि पडत नाहीं व प्रदेशाच्या उंचीमुळें कालव्याचें पाणीहि देतां येत नाहीं अशा भागांतील जमीन बिनपानी—कांटेरी झाडाझुडपांनीं भरलेली आहे. कांहीं ठिकाणीं वाळूच्या टेंकड्या आहेत. पण अशी जमीन आतां फारच थोडी आहे. या पड जमिनीस ' बर ' म्हणतात. या जमिनींत दोनदोनशें फूट खोल खणावें तेव्हां कोठें पाणी लागतें; आणि तेंहि खारट ! मात्र या प्रदेशांत उंट आणि शेळ्या-मेंढ्या चरत असतात. मिठाच्या डोंगराच्या उत्तरेकडील भागाची उंची १००० फुटांपासून २००० फुटांपर्यंत आहे. मिठाचे डोंगर आणि सिंधु नदी यांमधील या भागास पातवड किंवा रावळपिंडी म्हणतात. प्रसिद्ध बाप्पा रावळ, रजपुतांचा मूळ पुरुष येथला. दक्षिणेस अरवली पर्वताचा कांहींसा भाग दिल्लीपर्यंत आला आहे. पंजाबचा बाकीचा प्रदेश एकजात सखल असून अत्यंत मऊ अशा मातीचा बनलेला आहे. त्यांत खडा किंवा गोटासुद्धां सांपडत नाहीं. मधून मधून वाळू मात्र मिसळलेली असते.

हवेच्या व पिकाच्या दृष्टीनें पंजाबचे पांच विभाग पडतात. ( १ ) ला विभाग म्हणजे ईशान्येकडील हिमाच्छादित हिमालयाच्या रांगा यांचा होय. पर्वताच्या उंचीमुळें या भागांत हिमनद्याहि आहेत इतकी थंड हवा येथील आहे. त्यामुळें या विभागांतील पर्वतमाथ्यावर खुरट्या झाडाझुडपांशिवाय कांहीं फारसें वाढतच नाहीं. हा कस्तूरीमृगांचा प्रदेश होय. कमी उंचीच्या उतारावर मात्र शेजारच्या काश्मिरांत किंवा नेपाळांत ज्याप्रमाणें सूचिपर्णी वृक्षांची वाढ झाली आहे, तशी येथेंहि


झाली आहे. तेथें जी फळफळावळ अथवा जो भाजीपाला उत्पन्न होतो त्याच प्रकारची फळफळावळ व भाजीपाला हीं येथेंहि उत्पन्न करण्यांत येतात. या विभागाचें क्षेत्रफळ कांहींनाहीं तरी २२,००० चौरस मैलां-हून जास्त आहे. या पहाडी प्रदेशांत पहाडी व वन्य जातींच्या लोकां-चीच वस्ती आहे; पण तीहि फार तुरळक. ( २ ) रा विभाग हिमालय पर्वताच्या पायथ्याशीं असलेल्या आग्नेय ते वायव्य दिशांनीं पसरलेल्या, १००० ते ५००० फूट उंचीच्या प्रदेशाचा होय. ही एक चिंचोळी अशी पट्टी आहे. हिचें क्षेत्रफळ १०,००० चौ. मैल आहे पण या पट्टींत पाऊसहि चांगला पडतो आणि यांतून नदी नालेहि पुष्कळ वाह-तात, त्यामुळें हा प्रदेश फारच सुपीक झाला आहे. ठिकठिकाणीं जंग-लहि माजलें आहे. पाणथळ जागीं जंगलांत साग, जांबू, शिसव यांचीं झाडें वाढलेलीं आहेत. कोरड्या जागीं बाभूळ व खैर हीं झाडें होतात. नेपाळच्या दक्षिणेस असलेल्या तराई जातीचाच हा प्रदेश होय. या भागांत हत्ती, गेंडे यांचे तुरळ थवे आढळतात. या भागांत लोकवस्तीहि बरीच आहे. कांहीं शेतकरी, कांहीं गुराखी व कांहीं मेंढपाळ आहेत. ४० लाखांवर हे लोक आहेत. दमट हवेमुळें शेतकरी लोक मात्र हिंवतापा-मुळें आजारी असतात. क्रिकेट्, टेनिस्, बॅड्मिन्टन इत्यादि इंग्लिश पद्धतींच्या खेळांचें सामान तयार करण्याबद्दल प्रसिद्धीस आलेलें शहर सिआलकोट हें याच भागांतील होय. पण या भागांत हें एकच काय तें मोठें शहर. येथूनच काश्मिराची एक राजधानी जम्मू येथपर्यंत लोहमार्ग नेला आहे. या भागांतील बिआस नदीच्या आणि कांग्राच्या पहाडी खोऱ्यांत हिमालयाच्या उताराvर चहाचे मळे आहेत. इतर बऱ्याच साधारण सखल अशा ठिकाणीं तांदूळ पिकतो. मका, ऊंस, तंबाखू यांचेंहि पीक येतें. डोंगराळ भागांत शेळ्यामेंढ्या पुष्कळच चरतात. त्यांपासून पुष्कळ लोकर पैदा होते. त्यांच्या कातड्यांनाहि किंमत येते.

( ३ ) या विभागांत मिठाच्या डोंगरांचा, त्याच्या उत्तरेस असलेल्या पठारांचा व टेकडाळ मुलखांचा समावेश होतो. येथील हवा थंडच. पण पावसाचें प्रमाणहि कमी; व विशेष नद्याहि या भागांतून वाहात नसल्यामुळें पाण्याचे हाल आहेत. त्यामुळें हा प्रदेश ओसाड असाच आहे. या प्रदेशाचें क्षेत्रफळ सुमारें ९००० चौ. मैल आहे. राहिलेल्या सखल प्रदेशाचे २ भाग पाडावयाचे. एक पश्चिमेकडील निम्मा प्रदेश आणि एक पूर्वेकडील निम्मा प्रदेश. या सखल प्रदेशांतून हजारों मैलांचा जरी प्रवास केला तरी एखादा पहाड अगर डोंगर कीं टेंकडी कांहींहि लागत नाहीं. हे २ व पूर्वीचे ३ मिळून पंजाबचे हवेच्या व पिकांच्या दृष्टीनें एकंदर ५ भाग होतात. सखल प्रदेशांतील पश्चिमार्धीची हवा हिंवाळ्यांत अति थंड व उन्हाळ्यांत अति उष्ण अशी आहे. थंडीच्या दिवसांत पाणी गोठतें, तर उन्हाळ्या दिवसांत १२०° अंशांपर्यंत उष्णता वाढते. इतकी विषम हवा हिंदुस्थानांत दुसरीकडे कोठेंहि नाहीं. तथापि ऑक्टोबरपासून मार्चअखेर येथली हवा प्रकृतीस फारच मानवते. कारण येथें या दिवसांत बरीच थंडी असली तरी ती कोरडी असल्याकारणानें उन्हाळ्यांतील थंड हवेच्या ठिकाणांप्रमाणें आल्हादकारक व शरीरसंवर्धक अशीच असते. या भागांत पाऊस अतिशय बेताचा पडतो. इतका कीं पांच नद्या असूनहि कालव्यांची जर सोय केली नसती तर हा भाग अर्धवट ओसाड असाच झाला असता व तसा तो पूर्वी होताहि. पूर्वार्धातील सखल प्रदेशांत पाऊस पडतो. पण त्या मानानें नद्या कमी. तथापि याहि भागांत कालव्यांची सोय भरपूर झाली असल्याकारणानें हा प्रदेश फारच सुपीक झाला आहे. इतका कीं, या भागांत जो अलोट गहूं पिकतो त्यामुळें जगांतील एक नामांकित गव्हाचा प्रदेश म्हणून पंजाबची गणना होऊं लागली आहे. कारण हजारों मैल गव्हाचींच शेतें पसरलेलीं असतात. येथील हवाहि विषमच,


पण पश्चिमार्धाइतकी नाहीं. या दोन्ही सखल भागांत गहूं, तांदूळ, जाळीं, बाजरी, ज्वारी, मका हीं धान्यें व सर्व कडधान्यं पिकतातच. शिवाय कापूस, ऊंस, गळिताचीं धान्यें (ज्यांपासून तेल काढतात अशीं जवस, तीळ, कारळे, करडई इत्यादि धान्यें), तंबाखू यांचेंहि पीक चांगलें येतें. येथील गहूं तर खंडोगणती परदेशास जातो. इतर धान्यहि जातें. शिवाय अलीकडे कापसाचीहि निर्यात होऊं लागली आहे.

पंजाब हा शेतकीप्रधान असाच प्रांत आहे. खनिज संपत्ति पुष्कळच कमी. तरी पण ती मुळींच नाहीं असें नाहीं. मिठाच्या डोंगरापलीकडील प्रदेशांत रॉकेलच्या कांहीं विहिरी आहेत. झेलम व चिनाब नद्यांच्या मधील प्रदेशांत कोळशाच्या एकदोन खाणी आहेत. नद्या-निर्झरांबरोबर वाहून येणाऱ्या वाळूंत सोनें सांपडतें; व तें गोळा करणाऱ्या कांहीं लोकांचा धंदा चांगला चालतो. लोखंड व तांबें पुष्कळ सांपडणें शक्य आहे, पण जळणाच्या अभावीं त्यांच्या खाणी काढणें फायदेशीर होत नाहीं. चुनखडीचे दगड व गोटे, सोरमीठ, शेंदेलोण, पादेलोण यांच्या खाणी मात्र पुष्कळ आहेत.

पंजाबांत शेंकडा साठ लोक शेती करणें व गुरें पाळणें हे धंदे करतात. कांहीं भागांत कापसाच्या व लोंकरीच्या कापडांच्या गिरण्या निघाल्या आहेत. लुधियाना व अमृतसर हीं दोन शहरें याबद्दल सर्व हिंदुस्थानांत प्रख्यात आहेत. अमृतसरच्या सतरंज्या आणि गालिचेहि प्रसिद्ध आहेत. रेशमी कापड विणणें, सोन्याचांदीचे दागिने घडविणें, त्यांवर आणि हस्तिदंतावर नक्षीकाम कोरणें आणि चिनीमातीचें व कांचेचें साहित्य करणें, कातडी सामान बनविणें इत्यादि प्रकारांचे कारखाने पंजाबांत कांहीं कांहीं ठिकाणीं आहेत आणि त्यांची सर्वत्र प्रसिद्धिहि पण आहे. दिल्ली, पतियाळ, अंबाला, सिमला, मुलतान, लाहोर, ल्यालपूर, गुजरणवाला, गुरुदासपूर, गुजराथ, भावलपूर इत्यादि



आकाशांतून दिसणारें अमृतसर



अमृतसर येथील सुरम्य सुवर्ण मंदिर



ने. ना. गव्हर्नर जनरल यांचें निवासस्थान—सिमला

सिमल्यांजवळील
कांगा
खोऱ्यांतील



सिपी जातीची
एक सुंदर
तरुणी



सिमल्याची वसाहत

ठिकाणें विशेष नांवाजलेलीं आहेत. यांपैकीं बहुतेक शहरें पूर्वेकडील सखल प्रदेशांत आहेत ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. कांहीं शहरें अर्थात् मोठमोठ्या व्यापारी पेठाहि आहेत.

पंजाबची प्रसिद्धि पंजाबांतील शेतीपेक्षां, व्यापारापेक्षां किंवा तेथील कारखान्यांपेक्षां तेथील लोकांबद्दल आहे हें विसरतां कामा नये. पंजाबी मनुष्य पुरा उंच, गोरागोमटा, नाकीं डोळीं सुरेख, बांधेसूद असा असतो. हा जसा देखणा तसा शूरहि पण असतो. पंजाबांतच खरे आर्य लोक आहेत; आणि पंजाब ही खरी वीरभूमि आहे यांत शंका नाहीं. धर्मानें ते मुसलमान, हिंदु किंवा शीख असतील, पण खरें आर्यतेज या लोकांतच आढळून येतें. पंजाबी मल्ल, आर्यपुत्र पंडुसुत भीमसेन यांची आठवण करून देतात. प्रसिद्ध गामा व कल्लु यांची कीर्ति अर्वाचीन भीमसेन म्हणून आजसुद्धां जगभर पसरली आहे. ज्याप्रमाणें आर्य लोक खैबरखिंडींतून हिंदुस्थानांत येऊन सिंधुपार होऊन प्रथम पंजाबांत स्थायिक झाले, त्याप्रमाणें त्यांच्या मागून ग्रीक, असीरिअन, यवन, शीथिअन, इराणी, दुराणी, तुर्की, मंगोलिअन इत्यादि वंशांचे दुसरे आर्य अगर अनार्य लोक याच मार्गें येऊं लागल्यामुळें पंजाबांत स्थिर झालेल्या आर्य लोकांना त्यांच्याशीं नेहमीं झगडावें लागे. म्हणून या लोकांच्या रक्तांत पिढ्यान्‌पिढ्या शौर्य, बाणेदारपणा, अभिमान, स्वातंत्र्य राखण्याकरितां जीवापाड धडपड इत्यादि गुण मुरलेले आहेत. कांहीं लोकांनीं कांहीं कांहीं कारणांमुळें महंमदी धर्म जरी पत्करला असला व मुसलमानी राज्येंहि स्थापन झालीं असलीं तरी त्यांच्यांतहि राष्ट्राभिमान दिसून येतो यांत शंका नाहीं. कांहीं झालें तरी येथील मुसलमान लोक आर्यच आहेत हें विसरतां कामा नये. मुसलमान व हिंदु यांच्यांत समता, प्रेम व परस्पर सहिष्णुता हे गुण उत्पन्न करण्याकरितांच शीख धर्म (किंवा संप्रदाय) उत्पन्न झाला. या धर्माचे मूळ संस्थापक गुरु नानक यांना मुसलमान व हिंदु

सारखेच भजत. इ.स. १५३८ सालीं ते समाधिस्थ झाले. पुढें या शीख लोकांचेहि मुसलमान लोकांशीं झगडे होऊं लागले. शीख लोक गुरु नानकानें रचिलेल्या ग्रंथराजास-यासच आदिग्रंथ म्हणतात-फारच भजतात, पूजितात व मान देतात. हिंदूंना जशी गीता व वेद, ख्रिस्ती लोकांना जसें बायबल, मुसलमानांना जसें कुराण तसा शीखांना हा ग्रंथराज पूज्य आहे. यांच्या चवथ्या गुरूनें प्रसिद्ध सम्राट् अकबर बादशहा यानें बक्षिस दिलेल्या जागीं एक सुंदर तलाव खणून त्यांत देवालय स्थापिलें. हेंच तें अमृतसर आणि सुवर्णमंदिर हें त्यांतील देवालय. हिंदूंचा ज्याप्रमाणें मुसलमानांकडून जाच होत असे त्याचप्रमाणें शीख लोकांनाहि पण त्यांच्या कडून जाच होऊं लागला. प्रथम त्यांनीं अत्यंत सहनशीलपणा दाखविला. पण स्वत:चें राज्य असल्याशिवाय व स्वत: लढवय्ये बनल्याशिवाय आपला धर्म टिकावयाचा नाहीं, याची जाणीव शीख लोकांत उत्पन्न झाली आणि त्यामुळें १६०६त शिखांचा साहवा गुरु हरगोविंद यांनीं वीरधर्म पत्करला; पुढें मुसलमानांशीं रणांगणावर सामने होऊं लागले. १६७५ सालीं गुरुगोविंद हे दहावे गुरु धर्मपदारूढ झाले. यांनीं स्वत: 'सिंह' ही पदवी धारण करून मुसलमानांविरुद्ध लढाईच पुकारिली; आणि १,२०,०००शूर धर्मवीरांचें पथक तयार केलें. गुरुगोविंदसिंहांनीं १७०८ सालीं समाधी घेण्यापूर्वी धर्मपदावर दुसऱ्या पुरुषाची योजना न करितां आदिग्रंथाचीच स्थापना केली. तेव्हांपासून धर्मपुस्तक आदिग्रंथ हाच शिखांचा धर्मगुरु झाला. मुसलमानांबरोबर स्वातंत्र्याकरितां आणि धर्म-रक्षण व धर्मप्रसार यांकरितां त्यांचीं युद्धें चालूच होतीं. १७६३ सालीं त्यांनीं सरहिंद येथें स्वातंत्र्य संपादन केलें, अमृतसर राजधानी झाली; आणि महाराज रणजितसिंह या शूर योद्ध्यानें (पंजाबच्या सिंहानें) पंजाबचा सर्व प्रांत आपल्या ताब्यांत आणिला.

अमृतसरचें वैभव वाढलें. तेथील सुवर्णमंदिराची प्रसिद्धि जगभर

झाली आणि आजकाल हिंदुस्थानांत जे जे परदेशीय प्रवासी येतात ते ताजमहालाबरोबरच सुवर्णमंदिर पाहिल्याशिवाय जात नाहींत. इतकें शोभिवंत हें अमृत-सरोवरांतील सुवर्ण-मंदिर आहे.

सध्यां पंजाबांत हिंदूंचेंहि राज्य नाहीं, मुसलमानांचेंहि नाहीं किंवा शिखांचेंहि नाहीं. आज पंजाबचा प्रांत प्रबल ब्रिटिश सरकारच्या सत्ते-खालीं आहे; पण जगांत पंजाब म्हणतांच तेथील धर्मवीर, कर्मवीर शीखांचीच आठवण होते यांत मात्र शंका नाहीं.

मात्र शीख संप्रदायाबरोबरच हिंदु धर्माच्या उज्ज्वल स्वरूपाचें रक्षण करण्याकरितां उत्पन्न झालेला आर्यसमाज याचीहि आठवण झाल्या-शिवाय राहात नाहीं. यास नव-वैदिक-धर्म म्हणतात. हा धर्म स्वामी श्रीमद्दयानंद सरस्वती यांनीं जरी प्रथम मुंबईंत इ.स.१८७५ सालीं स्थापन केला असला तरी या धर्माचे खरे अनुयायी पंजाबांतच आहेत. आर्य-समाज म्हणतांच पंजाब प्रांताचीच आठवण होते. या पंथाचे अनुयायी स्वर्गवासी स्वामी श्रद्धानंद, कै. दे. भ. लाला लजपतराय, आणि सांप्रतचे हिंदुमहासभेचे अध्यक्ष भाई परमानंद हे याच प्रांताचे पुढारी होत.

पंजाबांत मुसलमानांची संख्या एकंदर लोकसंख्येच्या निम्मी आहे. एकंदर लोकसंख्या २,८४,९०,८६० आहे. पण मुसलमान लोकांतहि रजपूत, जाट, गुजर या मूळ हिंदु म्हणजे आर्य लोकांचीच संख्या, जास्त आहे. धर्मानें ते मुसलमान असतील, पण मूळ संस्कृतीनें ते आर्य असून त्यांना राष्ट्राचा अभिमान असणें स्वाभाविक आहे. डॉ. आलम, डॉ. अनसारी हे या वृत्तीचेच परम थोर लोक होत.

पंजाबी लोकांचें मुख्य खाणें म्हणजे तूप-शक्कर व डाळ-रोटी. भाजीपाल्याला मसाला घालणें त्यांना फारसें आवडत नाहीं. रोटी बहुतेक गव्हाचीच करतात. क्वचित् ज्वारी, बाजरी किंवा मका यांचीहि करितात, नाहीं असें नाहीं. तांदूळ फार करून ते खातच नाहींत.

पूर्वेकडील भागांत दूध-दुभतें मुबलक असतें. मांस खाणारे लोक पुष्कळ आहेत. पंजाबांत शहरें फारशीं नसल्यामुळें बहुतेक लोक खेड्यापाड्यांतूनच राहतात. त्यांचीं घरें माती, विटा, कडबा, झाडाच्या फांद्या, तट्टे अशा वस्तूंचा उपयोग करूनच बांधलेलीं असतात. दगडांचा उपयोग करणेंच शक्य नाहीं. कारण हजारों मैलांच्या टापूंत दगड सांपडत नाहींत. घरें धाब्याचीं असतात. पण अशा प्रकारचीं घरें ज्या भागांत डोंगर किंवा टेकड्या नाहींत, जेथें पाऊस कमी व जेथें जवळपास जंगलझाडी नाहीं तेथील होत. ईशान्येकडील व उत्तरेकडील हिमालय पर्वताच्या भागांत आणि पूर्व भागांत असलेल्या खेड्यापाड्यांतील घरें काश्मिरी अगर नेपाळी घरांप्रमाणें दुमजली तिमजली असतात हें विसरतां कामा नये. त्या भागांतील लोकांचें खाणेंपिणें हें सर्व कांहींसें काश्मिरी व नेपाळी पद्धतीप्रमाणें व कांहींसें पंजाबी पद्धतीप्रमाणें असतें. पंजाबी लोकांना ( बायकांनाहि ) हुक्का पिण्याची फार चटक असते.

पंजाबी लोकांना कापसाचे व लोंकरीचे दोन्ही प्रकारचे कपडे वापरावे लागतात. कारण उन्हाळ्यांत उन्हाळा अतिशयच असतो, तेव्हां कपडा बिलकुल सहन होत नाहीं; आणि हिंवाळ्यांत थंडीहि अति कडक असते, तेव्हां एकजात लोंकरीचे कपडे वापरावे लागतात. मात्र या लोकांचे कपडे फारसे सैल नसतात. लढवय्ये लोकांना सैल कपडे आवडत नाहींत. येथील बहुतेक सर्व पुरुष दाढी, मिशा व कल्ले राखतात; आणि ते त्यांची फारच काळजी घेतात. खरे शीख कधींच हजामत करीत नाहींत. त्यामुळें त्यांच्या डोक्यावरहि लांब केंस असतात. शीख लोकांच्या फेट्याची बांधणी विशिष्ट प्रकारची असते. त्यांच्या फेट्याच्या कपाळावरील भागीं एक पिवळें कडें बसविलेलें असतें तें त्यांचें चिह्न होय. मुसलमानी पेहराव कांहींसा वेगळ्या प्रकारचा असतो. ते सैलसर विजार घालतात. अंगांत लांब शर्ट, त्यावर जॅकीट, आणि

डोक्यावर तुर्की टोपी. खेड्यापाड्यांतील शेतकरी लोक धोतर नेसतात. सर्वांच्याच पायांत चढाव असतो. पंजाबी फेटा प्रसिद्ध आहेच.

स्त्रिया निरनिराळ्या तऱ्हांनीं वेण्या घालतात. कधीं त्यांचा बुचडा असतो, कधीं त्यांच्या वेण्या पाठीवर किंवा खांद्यावर रुळत असतात; यांच्या कानांत तीनतीन चारचार प्रकारांचीं वळीं असतात. पायांत पोकळ वाळे, हातांत गोट, बांगड्या, आणि गळ्यांत सरी हे त्यांचे दागिने. त्या विजारी घालतात त्यांवर ल्हंगा नेसून त्यावरून कापड गुंडाळतात. त्याचाच पदर डोक्यावरून घेतां येतो. अंगांत पैरण किंवा लांब बाहीचें पोलकें असतें. पुष्कळ वेळां यावरून पायघोळ झगा असतो. कपडे ऋतुमानाप्रमाणें कापसाचे अगर लोंकरीचे असतात. बायकाहि चढाव घालतात.

आम्हां महाराष्ट्रीयांना पंजाबची दोन गोष्टींमुळें आठवण राहाणार आहे. एक पानपत येथें १७६१ सालीं मराठ्यांचा झालेला पुरा पराभव ही होय. या गोष्टीचें विस्मरण जोंपर्यंत पानपतचें रणांगण पंजाबांत आहे तोंपर्यंत तरी होणें शक्य नाहीं. तथापि राघो भराऱ्यानें आपला घोडा अटकेपार नेऊन मराठ्यांचा झेंडा तेथें कांहीं दिवस त्यानें फडकविला ही हि गोष्ट अभिमानाची व चिरस्मरणीय अशीच आहे.

ब्रिटिश सरकारच्या अंमलाखालीं असलेल्या इतर प्रांतांप्रमाणेंच या प्रान्ताचेहि राज्यकारभाराच्या सोयीकरितां जिल्हे पाडण्यांत आले आहेत. असे जिल्हे एकूण २९ आहेत. भावलपूर, पतियाळा, नाभा, झिंद इत्यादि देशी संस्थानेंहि आहेत. पंजाब प्रान्ताची राजधानी लाहोर. हिंदुस्थानांत ब्रिटिश सत्तेखालीं जेवढे म्हणून प्रान्त आहेत त्या सर्वांवर ज्या व्हाइसरॉयांची म्हणजे राजप्रतिनिधींची सत्ता चालते त्यांची राजधानी कलकत्ता येथें होती; पण इ. स. १९११ सालीं दिल्ली शहर अखिल हिंदुस्थानची राजधानी करण्यांत आली. हा अपूर्व समारंभ १२ डिसेंबर

पूर्वेकडील भागांत दूध-दुभतें मुबलक असतें. मांस खाणारे लोक पुष्कळ आहेत. पंजाबांत शहरें फारशीं नसल्यामुळें बहुतेक लोक खेड्यापाड्यांतूनच राहतात. त्यांचीं घरें माती, विटा, कडबा, झाडाच्या फांद्या, तट्टे अशा वस्तूंचा उपयोग करूनच बांधलेलीं असतात. दगडांचा उपयोग करणेंच शक्य नाहीं. कारण हजारो मैलांच्या टापूंत दगड सांपडत नाहींत. घरें धाब्याचीं असतात. पण अशा प्रकारचीं घरें ज्या भागांत डोंगर किंवा टेकड्या नाहींत, जेथें पाऊस कमी व जेथें जवळपास जंगल-झाडी नाहीं तेथील होत. ईशान्येकडील व उत्तरेकडील हिमालय पर्वताच्या भागांत आणि पूर्व भागांत असलेल्या खेड्यापाड्यांतील घरें काश्मिरी अगर नेपाळी घरांप्रमाणें दुमजली तिमजली असतात हें विसरतां कामा नये. त्या भागांतील लोकांचें खाणेंपिणें हें सर्व कांहींसें काश्मिरी व नेपाळी पद्धतीप्रमाणें व कांहींसें पंजाबी पद्धतीप्रमाणें असतें. पंजाबी लोकांना ( बायकांनाहि ) हुक्का पिण्याची फार चटक असते.

पंजाबी लोकांना कापसाचे व लोंकरीचे दोन्ही प्रकारचे कपडे वापरावे लागतात. कारण उन्हाळ्यांत उन्हाळा अतिशयच असतो, तेव्हां कपडा बिलकुल सहन होत नाहीं; आणि हिंवाळ्यांत थंडीहि अति कडक असते, तेव्हां एकजात लोंकरीचे कपडे वापरावे लागतात. मात्र या लोकांचे कपडे फारसे सैल नसतात. लढवय्ये लोकांना सैल कपडे आवडत नाहींत. येथील बहुतेक सर्व पुरुष दाढी, मिशा व कल्ले राखतात; आणि ते त्यांची फारच काळजी घेतात. खरे शीख कधींच हजामत करीत नाहींत. त्यामुळें त्यांच्या डोक्यावरहि लांब केंस असतात. शीख लोकांच्या फेटयाची बांधणी विशिष्ट प्रकारची असते. त्यांच्या फेटयाच्या कपाळावरील भागीं एक पिवळें कडें बसविलेलें असतें तें त्यांचें चिन्ह होय. मुसलमानी पेहराव कांहींसा वेगळ्या प्रकारचा असतो. ते सैलसर विजार घालतात. अंगांत लांब शर्ट, त्यावर जॅकीट, आणि

डोक्यावर तुर्की टोपी. खेड्यापाड्यांतील शेतकरी लोक धोतर नेसतात. सर्वांच्याच पायांत चढाव असतो. पंजाबी फेटा प्रसिद्ध आहेच.

स्त्रिया निरनिराळ्या तऱ्हांनीं वेण्या घालतात. कधीं त्यांचा बुचडा असतो, कधीं त्यांच्या वेण्या पाठीवर किंवा खांद्यावर रुळत असतात; यांच्या कानांत तीनतीन चारचार प्रकारांचीं वळीं असतात. पायांत पोकळ वाळे, हातांत गोट, बांगड्या, आणि गळ्यांत सरी हे त्यांचे दागिने. त्या विजारी घालतात त्यांवर लहंगा नेसून त्यावरून कापड गुंडाळतात. त्याचाच पदर डोक्यावरून घेतां येतो. अंगांत पैरण किंवा लांब बाहीचें पोलकें असतें. पुष्कळ वेळां यावरून पायघोळ झगा असतो. कपडे ऋतुमानाप्रमाणें कापसाचे. अगर लोंकरीचे असतात. बायकाहि चढाव घालतात.

आम्हां महाराष्ट्रीयांना पंजाबची दोन गोष्टींमुळें आठवण राहाणार आहे. एक पानपत येथें १७६१ सालीं मराठ्यांचा झालेला पुरा पराभव ही होय. या गोष्टीचें विस्मरण जोंपर्यंत पानपतचें रणांगण पंजाबांत आहे तोंपर्यंत तरी होणें शक्य नाहीं. तथापि राघो भराऱ्यानें आपला घोडा अटकेपार नेऊन मराठ्यांचा झेंडा तेथें कांहीं दिवस त्यानें फडकविला .हीहि गोष्ट अभिमानाची व चिरस्मरणीय अशीच आहे.

ब्रिटिश सरकारच्या अंमलाखालीं असलेल्या इतर प्रांतांप्रमाणेंच या प्रान्ताचेहि राज्यकारभाराच्या सोयीकरितां जिल्हे पाडण्यांत आले आहेत. असे जिल्हे एकूण २९ आहेत. भावलपूर, पतियाळा, नाभा, झिंद इत्यादि देशी संस्थानेंहि आहेत. पंजाब प्रान्ताची राजधानी लाहोर. हिंदुस्थानांत ब्रिटिश सत्तेखालीं जेवढे म्हणून प्रान्त आहेत त्या सर्वांवर ज्या व्हाइसरॉयांची म्हणजे राजप्रतिनिधींची सत्ता चालते त्यांची राजधानी कलकत्ता येथें होती; पण इ. स. १९११ सालीं दिल्ली शहर अखिल हिंदुस्थानची राजधानी करण्यांत आली. हा अपूर्व समारंभ १२ डिसेंबर


१९११ या दिवशीं खुद्द इंग्लंडचे राजे व हिंदुस्थानचे बादशहा पंचम जॉर्ज यांच्या हस्तें मोठ्या थाटामाटानें साजरा करण्यांत आला.

दिल्ली शहरास पांडवांच्या वेळेपासून पूर्वपरंपरा आणि प्राचीन वैभव आहे. नव्या दिल्लीनें २५ चौरस मैलांची जागा व्यापिली असून हा भाग टोलेजंग इमारती, प्रशस्त उद्यानें, मोठमोठ्या बाजारपेठा, मांडलिक राजेलोकांचे राजवाडे, सरकारी कचेऱ्या, न्यायमंदिरें, सभागृहें आणि व्हाइसरॉयांचें रमणीय निवासस्थान इत्यादि गोष्टींनीं भरून गेला आहे. मात्र इमारतींची कोठेंहि गर्दी होणार नाहीं अशी काळजी घेण्यांत आली आहे. प्रत्येक इमारतीच्या सभोंवतीं विस्तीर्ण बागा करून भरपूर रुंद रस्ते ठेवण्यांत आल्यामुळेंच हें साध्य झालें आहे. जुनें शहर यमुनेच्या तीरावर वसलें असल्यामुळेंहि शहरास एक प्रकारची शोभा प्राप्त झाली आहे. शिवाय मोंगलांच्या अंमदानींतीलहि मोठमोठ्या प्रेक्षणीय इमारती, जयस्तंभ व उद्यानेंहि आहेत. शहरांतील चांदणी चौक हा राजरस्ता पाहिला म्हणजे तेथील श्रीमंतीची कल्पना येते. पण एकंदर लोकसंख्या ३,८०,००० च आहे. ही मुख्य राजधानी असल्याकारणानें मुंबई, मद्रास, नागपूर, कलकत्ता, पाटणा, अलाहाबाद, लाहोर इत्यादि प्रांतांच्या उपराजधान्यांशीं लोहमार्गांनीं हें जोडलें आहे. यांपैकीं कोणत्याहि शहरीं लोहमार्गानें दोन दिवसांत जातां येतें. लाहोरांतहि सुंदर सुंदर इमारती व बागा आहेत. शालिमार बाग तर प्रख्यात आहेच.

पंजाब प्रांत अफगाणिस्थानास जवळ असल्यामुळें व या बाजूनेंच आजपर्यंत हिंदुस्थानावर परचक्र आल्यामुळें पंजाब प्रांतास जोडून सरहद्द प्रान्त निर्माण करण्यांत आला. या भागांतून लष्करी दळणवळण सुलभ व लवकर व्हावें म्हणून सरहद्दीवरील मुख्य ठिकाण पेशावर येथपर्यंत आणि त्याहिपुढें २७ मैल म्हणजे अगदीं सरहद्दीवरील लंडीखोना या ठिकाणापर्यंत लोहमार्ग नेण्यांत आला आहे. या सत्तावीस मैलांच्या



पूर्व पंजाबांतील एक खेडें



कुतुब-मिनार, दिल्ली

पहाडी मुलुखांतून नेलेल्या लोहमार्गास सत्तावीस कोटि रुपये खर्च लागला. यावरून या लोहमार्गाचें महत्त्व लक्षांत येईल. पंजाबांत नद्यांना समांतर असे एन्. डब्ल्यू. आर्. कंपनीचे लोहमार्ग प्रांतभर पसरले आहेत. दिल्ली, अंबाला, लुधियाना, भातिंदा, अमृतसर, लाहोर, जम्मू, वझिराबाद, पथनकोट, अटक, पेशावर या सर्व जंक्शनांकडून अगर अखेरच्या स्टेशनांकडून येणारे फांटे मिळत मिळत भावलपूरपाशीं एक होतात. आणि ज्याप्रमाणें पंजाबांतील सर्व नद्या मिथनकोट येथें एक होऊन सिंध प्रांतांत सिंधुनद म्हणून प्रवेश करितात, त्याचप्रमाणें भावलपुरापाशीं एकवटलेला हा लोहमार्ग सिंधुनदाला समांतर असाच सिंध प्रांताच्या प्रस्त्यात कराची बंदरापर्यंत गेला आहे. याच लोहमार्गें आणि कराची बंदरांतूनच पंजाबाचा सर्व व्यापार परदेशांशीं चालतो. खंडोगणति गहू कराचीस पंजाबांतूनच येतो.

ग्रंथ संग्रहालय
प्रत

# ८

# सिंधुनदानें पोसलेला अर्थात् सिंध-प्रांत

सिंधुनदी हिमालयाच्या अगदीं उत्तरेकडील अत्युच्च रांगेंतील कैलास-शिखराच्या पश्चिमभागीं १८,००० फूट उंचीवरील हिममय प्रदेशांत उगम पावते. प्रथम थेट वायव्य दिशेनें पांचशें साडेपांचशें मैल हिमालय व काराकोरम या दोन प्रचंड पर्वतांमधील खोल दरींतून उतरत उतरत ती आपली वाट काढते. नंतर मध्य-हिमालयाच्या नंगापर्वत या शिखरास वळसा घेऊन, दक्षिण दिशेनें उरलेला पर्वत-प्रदेश ओलांडून, व पुढें पंजाबच्या पश्चिम मर्यादेजवळून वहात जाऊन, पंजाबमधून येणाऱ्या पांचही नद्यांचा एकवटलेला जलभार मिथनकोटपाशीं स्वीकारते. मग हा एकत्र झालेला सर्व जलप्रवाह सिंधुनद या नांवानें सिंध-प्रांतांत प्रवेश करतो. किंवा हिमालय, हिंदुकुश व काराकोरम या पर्वतांवरून येणारा सर्व जलभार घेऊन या प्रांतांत सिंधुनद प्रवेश करतो, म्हणूनच या प्रांतांतील लोकांनीं आपली कृतज्ञता व्यक्त करण्याकरितांच आपल्या प्रांतास सिंध हें नांव दिलें. खरोखर सिंधुनदाचे या प्रांतावर इतके उपकार आहेत कीं, या प्रांतांतून हा जर वाहात गेला नसता तर जगांतील अनेक वाळवंटांत याही प्रांताची आणखी भरच पडली असती. नव्हे सिंधुनद वाहात असूनहि या नदाच्या दोहों अंगांस थोड्याच अंतरावर वालुकामय प्रदेश पसरलेला आहे, यावरून हीच गोष्ट सिद्ध होते. सिंधुनद नसता तर हा सर्वच्या सर्व प्रदेश वालुकामय झाला असता.

सिंध-प्रांताचें क्षेत्रफळ ५३,११६ चौरस मैल असून जास्तींत जास्त लांबी दक्षिणोत्तर ३५० मैल आणि रुंदी पूर्वपश्चिम १५० मैल आहे. एवढ्या टापूंत एकही म्हणण्यासारखी डोंगराची किंवा टेकड्यांचीसुद्धां रांग नसल्यामुळें या भागांत वरून पाण्यानें भरलेले ढग जात असतांहि पाऊस पडत नाहीं. पश्चिमेच्या सीमेवर हालापर्वतांच्या रांगा दक्षिणोत्तर पसरल्या असल्यामुळें त्याहि बाजूनें वाऱ्याबरोबर येणाऱ्या थोड्याशा ढगांचा पाऊस बलुचिस्तानांतच पडून जातो. सिंध प्रांताच्या उत्तरेस सुलेमान पर्वत व पंजाबचा प्रांत असून पूर्वेस रणमय राजस्तान पसरलें आहे. दक्षिणेस कच्छचें रण व अरबी समुद्र. अशा या प्रांताच्या मर्यादा आहेत. सिंध-प्रांत हा एका दृष्टीनें भरतखंडांतील इतर प्रांतांशीं विलग असाच आहे, हें वरील सीमांवरून सहज लक्षांत येण्यासारखें आहे. बलुचिस्तानाशींहि तो जोडून नाहीं. पंजाब प्रांताशीं मात्र सिंधुनदाच्या खोऱ्यामुळें तो थोडा-बहुत जोडलेला आहे. आणि पंजाब प्रांताशींच त्याचें जास्त दळण-वळण आहे; नव्हे पंजाब प्रांताला सिंध प्रांताचें मुख्य बंदर कराची हेंच जवळ पडत असल्याकारणानें पंजाबचा परदेशांशीं होणारा सर्व व्यापार कराची बंदरांतूनच चालतो. बलुचिस्तानांत बोलन खिंडींतून जातां येतें.

सध्यां सिंधप्रांताचा समावेश मुंबई इलाख्यांतच १८४३ सालीं ब्रिटिशांनीं तो जिंकल्यापासून करण्यांत आला आहे हें खरें. पण लवकरच तो प्रांत स्वतंत्र होण्याचें जवळ जवळ नक्की ठरलें आहे; आणि भौगोलिक दृष्ट्या म्हणजे वरील सीमांवरून व त्यांत राहणाऱ्या लोकांच्या चालीरीति, खाणें-पिणें, पोषाख, भाषा, धर्म इत्यादि गोष्टींचा विचार करतां तसें होणेंच इष्ट आहे यांत शंका नाहीं. नव्हे, पूर्वीं तरी तो मुंबई इलाख्यास कां जोडला गेला हा प्रश्नच आहे. राजकीय दृष्ट्या त्या वेळीं तसें करणें त्या वेळच्या सरकारास इष्ट वाटलें हेंच त्याचें उत्तर. हा प्रांत इतके दिवस मुंबई इलाख्यास जोडला गेला असल्यामुळें एकदां लग्नानें

बद्ध झाल्यानंतर जसें पति-पत्नींचें नातें तोडूं नये असें उच्च हिंदु लोकांस प्रामाणिकपणें वाटतें, तसेंच हाहि प्रांत आतां वेगळा करूं नये असेंच पुष्कळ हिंदु लोकांना मनापासून वाटत आहे. “ हा प्रांत वेगळा केल्यास आजपर्यंत तो सुपीक करण्याकरितां सर्व मुंबई इलाख्यानें जो पाण्यासारखा पैसा सिंधुनदाचें पाणी अडविण्याकरितां खर्च केला तो व्यर्थच नव्हे तर काय?” त्याचप्रमाणें “हा प्रांत वेगळा केल्यास त्या प्रांतांत जे मूठभर हिंदु लोक आहेत, त्यांचे हाल कुत्राहि खाणार नाहीं.” अशा कांहीं लोकांच्या प्रामाणिक शंका आहेत. या शंकांना उत्तरें आहेत. पण त्यांचा विचार येथें नको. एकच उत्तर द्यावयाचें म्हणजे भाषेप्रमाणें प्रांत पाडणें हेंच तत्त्व सगळीकडे लागू करून इतरहि प्रांत तसेच निर्माण करावेत हेंच ज्या त्या प्रांताच्या दृष्टीनें इष्ट होय. धर्माच्या दृष्टीनें प्रांत पाडणें शक्यहि नाहीं व इष्टहि नाहीं.

सिंधमध्यें पाऊस पडत नाहीं याचा अर्थ मुळींच पडत नाहीं असा नव्हे. शपथ घेण्यापुरता पडतो. पण पुष्कळ ठिकाणीं तो वर्षांतून पुरा तीन इंचसुद्धां पडत नाहीं. किनाऱ्याजवळ थोडाबहुत जास्त पडतो येवढेंच. कांहीं कांहीं वर्षी तर पावसाविना सबंध वर्ष जातें अशीं कांहीं ठिकाणें आहेत. डोक्यावरून ढग जात असतात; पण पाऊस पडत नाहीं. अशी स्थिति आपल्याकडेसुद्धां वर्षांतून अनेक वेळां पहावयास सांपडते. सिंधमध्यें ती बहुतेक नेहमींच पहावयास सांपडते. हे ढग थेट हिमालयाकडे डोक्यावरून वाट चालत असतात. कांहीं कांहीं वेळां वळवाचे पाऊस पडतात, आणि ते मात्र जोरांत पडतात.

सिंधची हवा समुद्रकिनारा सोडून जों जों आंत जावें तों तों जास्त जास्त कोरडी व विषम होत जाते. अगदीं उत्तरेंकडील व बलुचिस्तानच्या सरहद्दीवरील जाकोबाबाद या शहरानें तर सर्व हिंदुस्थानांत विषम हवेबद्दल दुर्लौकिक मिळविला आहे. उन्हाळ्यांत येथील

उष्णता १२६° पर्यंत वाढते आणि हिंवाळ्यांत ३२° च्याहि खालीं उतरते. रोजच्या चढउतारांतहि असेंच पुष्कळ अंतर पडतें. कर्कवृत्त ( म्हणजे उत्तर २३॥ वें अक्षवृत्त ) आणि उत्तर २८॥ वें अक्षवृत्त यांच्या मधोमध हा प्रदेश येत असल्यामुळें सूर्य ज्या तीन चार महिन्यांत कर्कवृत्ताच्या आसपास असतो, त्या तीन चार महिन्यांत सिंधु-नदापासून कांहीं अंतरावर शेंकडों मैल पसरलेलें वाळूचें रण अतिशय तापतें. हे तीन चार महिने म्हणजे जून, जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर होत. आणि सूर्य जेव्हां मकर-वृत्ताच्या आसपास तीन चार महिने असतो, त्या तीन चार महिन्यांत हेंच वाळवंट थंडगार पडतें. हे तीन चार महिने म्हणजे नोव्हेंबर, डिसेंबर, जानुआरी व फेब्रुआरी हे होत. तसेंच बारा महिनेहि दिवसा वाळू जास्त तापते आणि रात्रीं ती एकदम गार पडते. आतां येथें जें वाळवंट निर्माण झालें आहे तें पाऊस पडत नाहीं म्हणून; आणि पाऊस न पडण्यास कारण म्हणजे येथील एकजात सखल प्रदेश होय. कारण याच अक्षवृत्तांच्या मध्यभागीं अगदीं असाच आसाम प्रांत पसरलेला आहे हें आपण पाहिलें आहेच. आसाम व सिंध या दोन प्रांतांच्या भूरचनेंतील मुख्य फरक म्हणजे सिंध सखल व सपाट आहे आणि आसाम हा पर्वतमय आहे, आणि या पर्वतावरील थंड हवा लागल्यामुळेंच मोसमी वाऱ्यांबरोबर येणाऱ्या ढगांचा वर्षाव आसामांत जून, जुलै, ऑगस्ट आणि सप्टेंबर याच चार महिन्यांत इतका होतो कीं, जगांत इतका वर्षाव इतरत्र कोठेंहि होत नाहीं. आणि केवळ एका गोष्टीमुळेंच जंगलमय आसाम व रणमय सिंध असे अत्यंत परस्परविरोधी प्रांत निर्माण झाले आहेत. पण अशा विषम व प्रतिकूल परिस्थितींतहि सिंध प्रांतांत कांहीं कांहीं पिकें सिंधुनदाच्या बळावर काढतां येतात.

पंजाबचें सपाट मैदान ओलांडून आल्यावर सिंधच्या सखल प्रदेशांत प्रवेश करण्यापूर्वी सिंधुनदाला कांहीं टेंकड्यांच्या अरुंद खिंडारांतून

जावें लागतें. हें खिंडार ओलांडल्यावर सिंधु-नदाचे तीन फांटे होतात. मधला मुख्य नद सक्करहून पश्चिमेकडे कलत कलत सेवान या गांवापर्यंत जातो. तेथून पुन्हां पूर्वेकडे कलत कलत हैद्राबाद शहरापाशीं येऊन पुन्हां पश्चिमेकडे कलत कलत ठठ्ठापर्यंत जातो. तेथें पुन्हां त्याला मुखें फुटतात, आणि मग अनेक मुखांनीं पश्चिमेकडेच झुकत झुकत तो अरबी समुद्रास मिळतो. डावा फाटा किंवा नारा मधल्या नदाशीं समांतर असा खैरपूर संस्थानांतून व उमरकोटाजवळून जाऊन कच्छच्या रणांत लुप्त होतो. उजवा फाटा किंवा नारा सक्करपासून नैऋत्येकडील मेहरगांवाकडे गेला आहे. सिंधुनदाचे स्वाभाविकपणें असे तीन फांटे झाल्यामुळें तितक्या जास्त प्रदेशास पाण्याचा पुरवठा झाला. सिंधुनदाला पावसाळ्यांत फारसे पूर न येतां ते उन्हाळ्यांत येतात. पूर आला म्हणजे या फांट्यांवाटे सिंधु नदाचें पाणी शेंकडों मैल एकदम पसरत असे. त्यामुळें त्यांच्या कांठीं वसलेल्या गांवांचें आणि शेतांचें अपरमित नुकसान होई. या नुकसानामुळें कित्येक गांवें अनेक वेळां वाहून गेलीं आहेत. सिंधूच्या खोऱ्यांत प्राचीन काळीं फारच सुधारलेलीं नगरें होतीं त्यांचा मागमूससुद्धां लागत नाहीं. ही आपत्ति टाळण्याकरतां सिंधूचे अनेक कालवे काढण्यांत आले. पण हे कालवे उन्हाळ्यांत पूर येई तेव्हांच उपयोगीं पडत. बाकीच्या वेळीं ते कोरडे ठणठणीत असत. म्हणून या कालव्यांचा फारसा उपयोग होत नसे. हे कालवे बारा महिने उपयोगीं पडावेत म्हणून व सिंधला एकदां कायमचें पाण्याच्या काळजींतून सोडवावें म्हणूत १९२३ सालीं एक भली मोठी योजना सुरू करण्यांत आली. लॉर्ड लॉइड हे त्या वेळीं मुंबई इलाख्याचे अधिपति होते. त्यांनीं या कामीं पुढाकार घेतला म्हणून या योजनेस त्यांचेंच नांव मिळालें. सक्करपाशीं असलेल्या टेंकड्यांच्या दरम्यान एक भलें मोठें धरण बांधून सिंधुनदाला बांध घालावयाचें ठरलें. या

योजनेस पैसाहि मंजूर झाला, आणि सतत दहा वर्षे पाहणी, आखणी, बांधकाम, खोदकाम इत्यादि कामें चालून वीस कोटि रुपये खर्चून हें अजस्र काम तडीस नेण्यांत आलें आहे. या धरणामुळें सिंधमधील ६०,००,००० एकर जमिनीस पाणी पुरविलें जाणार आहे !

सिंधची जमीन नापीक होती असें नव्हे तर जमिनीस पाणीपुरवठा नव्हता हें सिंधच्या जमिनीचें दुर्भाग्य होतें. पण मनुष्याच्या प्रयत्नानें हें दुर्भाग्य नष्ट होऊन सिंधला आतां चांगले दिवस लाभतील अशी आशा करण्यास मुळींच हरकत नाहीं. सिंधुनदाच्या मुखांमधील प्रदेश मात्र तितका सुपीक नाहीं. कारण या जमिनींत प्रवाहाबरोबर येणारी वाळूच फार आहे. वाळवंटावर कांहीं कांहीं भागांवर गवत उगवतें. म्हणून या भागांचा उंट, शेळ्या, मेंढ्या यांना चराई रानाप्रमाणें उपयोग होतो.

सिंधमध्यें तांदूळ, गहूं, ज्वारी, बाजरी, कडधान्य, गळिताचें धान्य, मुङ्मूग आणि कापूस, ऊंस व तंबाखू हीं सर्व पिकें होऊं शकतात. वाळवंटाच्या प्रदेशांत खजूर पिकतो. यापुढें कालव्यांमुळें बरींच पिकें मोठ्या प्रमाणावर होऊं शकतील. पावसावर मात्र एकहि पीक होत नसल्यामुळें प्रत्येक पिकास कालव्याचेंच पाणी द्यावें लागतें. सिंधमध्यें अप्रतिम प्रतीचा कापूस होऊं शकतो. आणि कापसाचेंच पीक वाढविण्याचा हेतु सक्करचें धरण बांधतांना सरकार व लोक यांच्या मनांत होता तो आतां सफल होईल. कालव्याखालची जमीन वीस पंचवीस वर्षांतच निस्सत्त्व होते. याची काळजी आरंभापासूनच घेतल्यास बरें.

सिंधमधील बहुतेक सर्व शहरें व मोठमोठीं गांवें सिंधुनदाच्या अगर त्याच्या नारांच्या व कालव्यांच्या कांठांवर वसलेलीं आहेत. उत्तरेकडून थेट दक्षिणेकडे गेल्यास रोऱ्ही, सक्कर, शिकारपूर, खैरपूर, लारखाना, मेहर, नौशेरा, सेवान, हाला, मियानी, हैद्राबाद, झरक, महमदखानाचा तांडा, ठट्टा, शाहबंदर इत्यादि शहरें व गांवें नदापासून १५।२०

मैलांच्या आंत बाहेर वसलेलीं आढळतात. मात्र जाकोबाबाद हें लष्करी ठाणें सरहद्दीवर आहे; आणि कराची हें ब्रिटिशांनीं वसविलेलें बंदर नैर्ऋत्यभागीं आहे. कराची बंदराचें महत्त्व फार आहे. हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावरील प्रख्यात बंदर मुंबई याच्या खालोखाल कराची बंदराचाच अनुक्रम लागतो. पंजाबांत पिकणारा अलोट गहूं आणि सिंध-मधील उच्च प्रतीचा कापूस हे पदार्थ या बंदरांतूनच परदेशांना आणि परप्रांतांना पाठविण्यांत येतात. पंजाबांतील गहूं तेथील लोकांना पुरून उरतो. सिंधमधील कापसाचें तसें नाहीं. सिंधची हवा अतिशय कोरडी असल्यामुळें कापसापासून सूत काढणें, अगर सुताचें कापड विणणें या प्रकारच्या गिरण्या काढणें येथें शक्य नाहीं. म्हणून हा कापूस प्रांता-बाहेर पाठवावा लागतो. कराची बंदर हें नॉर्थ-वेस्टर्न रेल्वे कंपनीच्या लोहमार्गाचें आरंभीचें ( अगर अखेरचें म्हणा ) स्टेशन होय. या लोह-मार्गानें प्रथम सिंधप्रान्तांतून सिंधूच्या कांठाकांठानें भावलपूरपर्यंत जातां येतें. मग पंजाबांत प्रांतभर त्याचे फांटे नेण्यांत आले आहेत. म्हणून या लोहमार्गांनीं कास्मीर, अफगाणिस्थान व मध्य आशिया येथपर्यंत व्यापार चालतो. सक्करहून जाकोबाबादमार्गें बोलनखिंडींतून बलुचिस्तानांतील चमनपर्यंतहि एक लोहमार्ग नेला आहे. म्हणून कराची बंदरास या सर्व प्रदेशांचें प्रवेशद्वार म्हणतात. बंदरास तीन मैल लांबीचा स्वाभाविक धक्का असल्यामुळें बोटींची उत्तम सोय होते. कराची, हैद्राबाद आणि सक्कर येथून उंटांचे तांडे राजपुताना, बलुचिस्थान व अफगाणि-स्थान या ओसाड प्रदेशांकडे जात येत असतात. कराची शहराची हवाहि समुद्रावरून येणाऱ्या थंड व हितावह वाऱ्यामुळें आल्हादकारक असते; आणि समुद्रसान्निध्यामुळें ती नेहमींच सम राहते. कराची शहर राहण्यास फारच हितकारक आहे, म्हणून प्रांताची राजधानी कराचीच.

सिंध हा मूळचा हिंदु लोकांचाच प्रांत. खिस्त शकारंभींच येथें

बौद्ध धर्माचा पसार झाला होता. पण इ. स. ७११ या सालीं मुसलमान लोकांनीं अरबी समुद्रावरून सिंधुनदाच्या मुखांतून या प्रांतांत प्रथम प्रवेश केला. मुसलमानांचा अखिल हिंदुस्थानांत हाच पहिला प्रवेश होय. तेव्हांपासून १८४३ सालापर्यंत मुसलमानी वंशांतील निर-निराळ्या राजघराण्यांनीं सिंधवर राज्य केलें. १८४३ सालीं हा प्रांत ब्रिटिशांनीं आपल्या ताब्यांत घेऊन तो मुंबई इलाख्यास जोडला. सिंधवर अकराशें वर्षे मुसलमानांनीं निर्वेधपणें राज्य केल्यामुळें तेथील ब-याच हिंदु लोकांनीं मुसलमानी धर्म पत्करला. येथें शीख धर्माचे अनुयायीहि फार आहेत; हिंदु मात्र शेंकडा दहाच असतील. तथापि सिंधची मुख्य भाषा सिंधी होय. ही वेदपूर्वकालीन आर्यलोकांच्या प्राकृत 'उदीच' भाषेंतून निर्माण झाली असें तज्ज्ञांचें मत आहे. अर्थात् या भाषेंत पुष्कळ परकीय शब्दांचा भरणा हल्लीं झालेला आहे.


सिंधी लोक गौर वर्णाचे आहेत. ते उंच व सडपातळ असून नाकीं डोळीं सुरेख असतात. कांहीं लोक बुटकी दाढी राखतात. मूळ सिंधी लोक, मग ते कोणत्याही धर्माचे असले तरी जात्या सहनशील आणि कष्टाळू आहेत. इतर मुसलमानांत मात्र बलुची, अफगाण, पठाण, सिद्दी वगैरे जे लोक आहेत ते दणगड, भांडखोर आणि स्वैर वृत्तीचे असे आहेत. हे लोक वेळीं लूटमार करण्यासहि कचरत नाहींत. यांपैकीं कित्येक टोळ्यांचा धंदा व्यापारी लोकांचे उंटांचे तांडे लुटण्याचाच असतो. सरहद्दीवर तर हा प्रकार नेहमींच घडत असतो.

सिंधी लोकांचा पोषाख साधा असतो. पायघोळ विजार आणि अंगांत सैल असा पातळ तलम अंगरखा, हा उन्हाळ्यांतील पोषाख झाला. हिंवाळ्यांत सदऱ्यावर जॅकिट आणि लांब कोट घालतात. हे लोंकरीचे अगर रेशमी कपडे असतात. त्यांच्या डोक्यावर मात्र एक पंचपात्र्यासारखी उभी टोपी असते. अलीकडे कित्येक सुशिक्षित लोक कोणतीच टोपी घालीत

नाहींत. बायका विजारीच घालतात. अंगांत लांब अंगरखा असून त्यावर जॅकीट असतें आणि त्यावरून ओढणी असते. कानानाकांत आणि अंगाखांद्यावर दागिने घालण्याचा प्रघात आहेच. गरीब लोक सोन्याचे नसले तरी चांदीचे दागिने घालतातच.

सिंधी लोक कलाकौशल्याच्या कामांत विशेष कुशल आहेत. सोन्या-चांदीवरील नक्षी, सुंदर गालीच्यांवरील वेलबुट्टी, रेशमी कापडांवरील भरजरी कशीदा, चिटांवरील रंगीत आकृति, लाखेच्या आणि मातीच्या वस्तूंवरील रंगकाम इत्यादि कलेचीं कामें प्रख्यात आहेतच. शिवाय सिंधमधील चामड्याचें सामान विशेषत: खोगीर, लगाम, तोबरे वगैरे जिनसा आणि कातडी पेट्या व ट्रंका यांना बाहेरील प्रांतांतून बरीच मागणी असते.

-. सिंधमधील एक विशेष दृश्य म्हणजे उंटाचा नांगर व उंटांची गाडी हीं होत. बहुतेक प्रदेश वाळवंटाचा असल्यामुळें प्रवासास उंटांचे तांडे उपयोगी पडतातच. पण शेतें नांगरण्यास आणि गाड्या ओढण्यासहि यांचा उपयोग होतो. मनुष्य प्राण्यानें प्रत्येक प्रदेशांतील विशिष्ट प्राण्याचा शक्य तितका उपयोग करून घेतला आहे. उंटाची गाडीहि मोठी असते आणि लॉरीप्रमाणें तींतून बराच माल नेतां येतो. सिंध-मधील आणखी एक दृश्य म्हणजे तेथील प्रत्येक घरावरील उंच उंच गेलेल्या आणि धुराड्याप्रमाणें दिसणाऱ्या हवेंतील अनेक खिडक्या होत. हवेच्या वरच्या थरांतून जे वारे वाहात असतात ते या खिडक्यांतून पकडण्यांत येऊन त्यांना घरांत खेळविण्यांत येतें. मनुष्यानें केलेल्या या अजब युक्तीमुळें येथील उष्ण हवेपासून होणारा उपद्रव पुष्कळच कमी होतो. मनुष्यास स्वस्थता मिळाली म्हणजे कोणत्याहि परिस्थितींत तो सुखसोयी निर्माण करूं शकतो हेंच खरें.



सिंधमधील घरें व उंटाची गाडी



सुरम्य सरोवराकाठीं वसलेलें उदेपूर



रणमय राजस्थान



सिं'च्या वाळवंटातील एक निर्झर-प्रदेश



अबूच्या पहाडावरील एक सुंदर सरोवर

## ९

# रणशूर रजपुतांचें रणमय व राकट राजस्थान

राणा हमीर व राणा प्रतापसिंह यांचीं नांवें राजस्थानच्या इतिहासांत तरी अमर झालीं आहेत. राजस्थान म्हणतांच राणा प्रतापसिंहाचें नांव एकदम आपल्या स्मरणांत येतें. आम्हां महाराष्ट्रियांना श्रीशिव-छत्रपति महाराज हे जसे परमपूज्य, तसे रजपुतांना राणा प्रतापसिंह हे आदरणीय वाटतात. राणा प्रतापसिंहांनीं राजस्थानचें गेलेलें स्वातंत्र्य मिळविण्याकरितां आजन्म रणांगणांत आयुष्य घालविलें, अनेक लढाया जिंकिल्या आणि मोंगलांच्या हातीं गेलेला बहुतेक प्रांत परत मिळविला; पण प्रसिद्ध किल्ला चितोड हा त्यांना परत जिंकून घेतां आला नाहीं. महाराष्ट्रांतील सिंहगड किल्ला मोंगलांच्या हातीं असाच गेला होता. तो परत जिंकून घेईपर्यंत छत्रपतींना जसें काळजांत शल्य रुतल्यासारखें वाटत होतें तसेंच राणा प्रतापसिंह यांना चितोडचा किल्ला मोंगलांच्या स्वाधीन असेतोंपर्यंत आपलें काळीजच शत्रूच्या स्वाधीन आहे असें वाटत होतें. तथापि शेवटपर्यंत त्यांना चितोडचा किल्ला मोंगलांच्या ताब्यांतून स्वतंत्र करितां आला नाहीं याला कारण त्यांचेच जातभाई ! स्वातंत्र्याच्या तुंबळ युद्धांत राणा प्रतापसिंहांना मोंगलांच्या अफाट सैन्यापुढें जो अखेरपर्यंत टिकाव धरितां आला त्याचें मुख्य कारण म्हणजे त्यांचें स्वतःचें आणि त्यांच्या रणशूर वीरांचें अतुल शौर्य, त्यांचा जाज्वल्य देशाभिमान आणि त्यांची स्वातंत्र्यप्रियता या गोष्टी खऱ्याच; पण त्यांच्या पाठीशीं असलेला जो अरवलीचा दुर्गम राकट पहाडी मुलूख होता त्याचेंहि

महत्त्व विसरतां कामा नये. पुढें १७व्या शतकांत मावळी सैन्याशीं लढतांना सह्याद्रीच्या पहाडी मुलखांत मोंगली सैन्याचें जसें तेज पडलें नाहीं तसेंच येथेंहि झालें !

राजपुतान्यांतील पहाडी मुलूख प्रदेशाच्या एकंदर विस्ताराच्या मानानें बेताचा आहे. ६,८७,३३९ चौरस मैल क्षेत्रफळांत पहाडी मुलूख १,१४,२८९ चौरस मैल भरेल. पण हा सर्व पहाडी मुलूख राजपुतान्याच्या एकाच कोपऱ्यांत म्हणजे आग्नेयभागीं आहे. मुख्य रांग अरवली पर्वताची. ही नैऋत्य ते ईशान्य या दिशेनें प्रदेशाच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत पसरलेली असून ईशान्येकडे दिल्लीपर्यंत याच्याच लहान लहान टेकड्या गेल्या आहेत. मात्र या पर्वताचें मुख्य शिखर अबू हें अगदीं पर्वतांच्या नैऋत्येकडील टोंकाशीं आहे. याची उंची ५६५० फूटच आहे. तथापि उत्तर, पश्चिम आणि दक्षिण या तिन्ही दिशांकडील प्रदेश एकजात सखल असल्याकारणानें हेंच शिखर उत्तुंग वाटतें. अरवली पर्वत स्फटिकमय, कुरुंद, जंबूर आणि गारगोटी अशा दगडांचा आणि शीस्ट जातीच्या पापुद्रे असलेल्या दगडांचा बनलेला आहे. यांत संगमरवरी आणि पाटीचे दगड यांच्या खाणी खोदल्या आहेत.

राजपुतान्याची रचना कांहींशी शंकरपाळ्यासारखी लंबचौकोनी असून त्याची मांडणी नैऋत्य ते ईशान्य अशी आहे. अरवली पर्वतानें याचे दोन असमान भाग होतात. तीन पंचमांश भाग वायव्येकडे पंजाबपर्यंत व पश्चिमेकडे सिंधपर्यंत पसरलेला असून दोन-पंचमांश भाग आग्नेयेकडे माळव्याच्या पठारापर्यंत आणि ईशान्येकडे यमुनेच्या खोऱ्यापर्यंत पसरलेला आहे. वायव्येकडे आणि पश्चिमेकड पसरलेला भाग रेताड, ओसाड, निर्जल आणि त्यांमुळेंच कांहींसा निर्जन असा झाला आहे. यांतून एकच लुनी नांवाची नदी अरवली पर्वतांत ईशान्यभागीं अजमीरजवळील पुष्कर खोऱ्यांत उगम पावून

पर्वतास डावें घालून २०० मैल वाहात जाते. पुढें ती कच्छच्या रणांत लुप्त होते. यामुळें थोडाबहुत तरी प्रदेश सुपीक झाला आहे. लुनी नदीच्या मुखाशीं तर दाट जंगल आहे. अरवली पर्वताच्या ईशान्येकडे आणि आग्नेयेकडे पसरलेल्या दोनपंचमांश प्रदेशापैकीं दक्षिणेकडे निम्याहून अधिक भाग डोंगराळ राकट मुलुखाचा असून बाकीचा उत्तरेकडील भाग सपाट व सखल असाच आहे. मात्र मधूनमधून लहान सहान टेकड्या आहेत.. अरवली पर्वताच्या पूर्वेकडे आग्नेय दिशेनें पसरलेल्या रांगा, आणि विंध्य पर्वताच्या उत्तरेकडे वायव्य दिशेनें पसरलेल्या, माळव्याचें पठार निर्माण करणाऱ्या रांगा, यांच्यामध्यें जें खोरें उत्पन्न झालें आहे, त्या खोऱ्यांतून विंध्यपर्वतांत उगम पावलेली चंबळा नदी प्रथम वायव्येकडे व मग ईशान्येकडे वाहात जाते व पुढें ती यमुनेस मिळते. चंबळा नदीनें राजपुतान्याची नैऋत्य तें ईशान्य अशी पूर्वसीमाच आंखली आहे. अरवली पर्वतांत उगम पावून बऱ्याचशा इतर लहान सहान नद्या चंबळा नदीस मिळतात. या नद्यांमध्यें बनास व बाणगंगा या मुख्य होत. बनास नदीचें खोरें म्हणजेच उदेपूरचें खोरें. अगदीं आग्नेयेकडील कोपऱ्यांतून महीनदी एक अर्धवर्तुळाकार वळसा घेत व पुढें ती दक्षिणेस असलेल्या गुजरात प्रांतांत शिरते. अरवली पर्वतावर आणि पूर्वेकडे पसरलेल्या डोंगरांच्या रांगांवर वर्षाकांठीं जवळ जवळ ४० इंचांपर्यंत पाऊस पडतो; अबूच्या शिखरावर तर १०० इंचांवर प्रतिवर्षी पाऊस पडतो. यामुळें अरवलीच्या वायव्येकडे जों जों जावें तों तों प्रदेश जसा जास्त जास्त रेताड होत गेला आहे, तसें या आग्नेयेकडील भागांत नाहीं. अरवलीच्या आग्नेयभागांतील डोंगराळ प्रदेशांत उत्तम उत्तम सुपीक खोरीं आहेत. तसाच ईशान्येकडील सपाट व सखल प्रदेशहि सुपीक आहे.

राजपुतान्याचा विस्तार उत्तर अक्षवृत्त २३° आणि ३०° येवढ्या भागांत असल्यामुळें राजपुतान्याची हवा एकंदरींत उष्णच आहे. अरवली

पासून जों जों वायव्येकडे अगर पश्चिमेकडे लुनी ओलांडून जावें तों तों तेथील सखल, रेताड व निर्जल प्रदेशामुळें ती फारच विषम होत जाते. उन्हाळ्यांत अति कडक व कोरडी आणि हिंवाळ्यांत अति थंड व कोरडी अशा प्रकारची येथील हवा असते. उन्हाळ्यांत १२०° पर्यंत हवेची उष्णता वाढते आणि हिंवाळ्यांत ती २०° हून खालीं उतरते. त्याचप्रमाणें रेताड प्रदेशामुळें दिवसा कडक ऊन असतें तर रात्रीं थंड गारठा वाटतो. पुराणांतला मरु प्रदेश तो हाच. मारवाड हें मरुवाडचें अपभ्रष्ट रूप आहे. मरुवाड अथवा मरुस्थळ अथवा मरुस्थान अथवा मरुदेश अशींहि याचीं नांवें आहेत. या सर्वांचा अर्थ मृत्यूचा प्रदेश, अर्थात् निर्जल, रेताड, निर्जन प्रदेश असाच होतो. मारवाडांत जोधपूरचें संस्थान मुख्य आहे आणि त्याच्या पश्चिमेस जेसलमीर संस्थान येतें. राजपुतानाचा हवेच्या दृष्टीनें हा पहिला भाग होय.

अरवलीच्या पूर्वभागांतील हवा त्या मानानें पुष्कळ थंड असते. उन्हाळ्यांत ती दमट व उष्ण असते खरी, पण एकंदरींत आल्हादकारकच. अबूचा पहाड म्हणजे एक नामांकित हवेचें ठिकाण आहे. प्राचीन काळच्या लोकांनासुद्धां या स्थळाचें महत्त्व कळलें होतें व तेथील नैसर्गिक सौंदर्य त्यांना अतिशय आवडलें होतें असें दिसतें. त्याच्या पूर्व-भागास मेवाड हें नांव आहे. मध्यवाड याचें मेवाड हें रूपांतर. याचा अर्थ मध्य-प्रदेश. याच भागांत उदेपूरचें रमणीय संस्थान आहे. मोंगलांविरुद्ध लढून अखेरपर्यंत उदेपूर घराण्यानेंच तेवढें आपलें स्वातंत्र्य राखलें. येथील शुद्ध व डोंगरी हवेचा परिणाम येथील लोकांवर होणें साहाजिक आहे. हवेच्या दृष्टीनें हा दुसरा भाग होतो.

ईशान्य भागांतील हवा उन्हाळ्यांत दमट व उष्ण असते त्यामुळें ती किंचित् त्रासदायक अशीच वाटते. हिंवाळ्यांतहि प्रदेश सखल व समुद्रा-

पासून दूर असल्यामुळें तेथील हवा अतिशय थंड असते. या भागास प्राचीन काळीं मत्स्यदेश म्हणत. पांडव अज्ञातवासांत असतांना या देशाच्या विराटराजाच्या पदरीं त्यांनीं नोकरी पत्करिली होती. या भागांत सध्यां जयपूर, अलवार आणि भरतपूर हीं मुख्य संस्थानें आहेत. हवेच्या दृष्टीनें राजपुतान्याचा हा तिसरा भाग होय.

पहिला भाग स्वाभाविकपणें नापीकच आहे. तथापि जोधपूर संस्थानांतील लुनीच्या खोऱ्यांत कांहींसें पीक होऊं शकतें. पंजाब प्रांताच्या दक्षिणेस जो रेताड प्रदेश आहे त्या भागांत म्हणजे बिकानेर संस्थानांत वर्षासरा १२ इंच पाऊस पडतो. तथापि या संस्थानांत पंजाबांतील सतलज नदीपासून गंगेचा कालवा आणण्यांत आला आहे व पुढेंमागें आणखी कांहीं कालवे आणण्यांत येतील. गंगेच्या कालव्यामुळें ६,२६,००० एकर जमिनीस पाणी मिळण्याची सध्यां व्यवस्था झाली आहे. जोधपूर व बिकानेर या दोन संस्थानांपेक्षां पश्चिमेकडील जेसलमीर संस्थान मात्र अगदींच कोरडें आहे. तेथें वार्षिक पाऊस जास्तींत जास्त सहा इंच पडतो. जोधपूर, जेसलमीर आणि बिकानेर या संस्थानांत येणाऱ्या बहुतेक सर्व प्रदेशांत २००—३०० फूट खोल खणावें तेव्हां कोठें पाणी लागतें. आणि तेंहि मचूळ! जोधपूरच्या पूर्वेकडील व दक्षिणेकडील डोंगराळ भागांत व लुनीच्या खोऱ्यांत मात्र जंगल वाढलें आहे. या भागांत पाऊसहि बरा पडतो. अशा या विषम परिस्थितींतहि ज्या ठिकाणीं अनुकूलता असेल तेवढ्या भागांत शेतकरी लोक बाजरी, ज्वारी, मका, गहूं, मूग, कुळीथ, हरभरे, तीळ, खसखस, मोहरी, ताग, तंबाखू हीं पिकें कमी-अधिक प्रमाणांत काढूं शकतात. यापुढें बिकानेर संस्थानांत गहूं, कापूस व ऊंस यांचें पीक अर्थात् जास्त प्रमाणांत निघण्याचा पुष्कळ संभव आहे. शेतकीकरतां उंटांचा पुष्कळ उपयोग करतात. ओसाड प्रदेशांत कांटेरी झाडें व गवत यांवर उंट, घोडे, शेळ्या-मेंढ्या चरत असतात,

त्यामुळें त्यांच्यापासून लोंकर, कातडीं, दूधदुभतें यांचें उत्पन्न बरेंच होतें. जोधपुरी घोडे नामांकित आहेत. या सर्व भागांत दुष्काळ नेहमींच कमी-जास्त प्रमाणांत वारंवार पडतो. पण कोरड्या हवेमुळें रोगराई फारशी नाहीं. त्यामुळें लोक एका अर्थी सुखी आहेत. पाण्याच्या टंचाईमुळें मात्र त्यांना पुष्कळ वेळां गांवोगांवीं भटकावें लागतें. मारवाडांत पाण्याचें नेहमींच दुर्भिक्ष्य असतें म्हणूनच एखादे वेळीं कांहीं कारणामुळें आपल्या गांवीं पाणी मिळेनासें झालें म्हणजे "गांव कसा अगदीं मारवाड झाला आहे!" असें आपण म्हणतों. मारवाडी मनुष्य क्वचितच उधळ्या असतो. पाण्याची काटकसर करावी लागत असल्यामुळेंच काटकसर हा गुण त्याच्या अंगांत जन्मतः इतका मुरलेला असतो कीं सर्वच बाबतींत तो हात अखरून खर्च करतो. पण याच गुणामुळें आपला वैराण देश सोडून इकडे येणारे कंगाल मारवाडी परत जातांना लक्षाधीश होऊन जातात.

उदेपूरच्या खोऱ्यांत आणि आजूबाजूच्या पठारांत ४० इंचांवर पाऊस पडत असल्यामुळें हा भाग पुष्कळच सुपीक झाला आहे. या भागांत इतके तलाव आणि सरोवरें आहेत कीं, या भागाला "सरोवरांचा प्रदेश" म्हणतात. येथें वरील प्रकारचींच पण वर्षाकाठीं दोन दोन पिकें काढतात. येथें फळफळावळहि चांगली होते. ईशान्येकडील जयपूरचें संस्थान, अलवारचें संस्थान आणि भरतपूरचें संस्थान व आजूबाजूचा प्रदेश साधारण सपाट असला तरी येथेंहि ३० इंचांपर्यंत पाऊस पडतो. त्यामुळें येथील हवेचें एकंदर मान महाराष्ट्रांतील खानदेशाप्रमाणें आहे. म्हणून खानदेशांत होणारीं कापूस, तंबाखू, गळिताचीं धान्यें इत्यादि सर्व पिकें येथें होतात. मात्र जों जों यमुनेच्या खोऱ्याकडे जावें तों तों गव्हाचें प्रमाण वाढत जातें. याहि भागांत दलदलीचा प्रदेश नसल्यामुळें हवा निरोगी असते. उदेपूरची हवा तर अत्यंत आल्हादकारक आहे, कारण येथील उष्णता उन्हाळ्यांत सुद्धां ९१° पलीकडे जात नाहीं.

राजपुतान्यांत खनिज संपत्ती ब्याच प्रकारची आढळते. सोमल, हरताळ, कोबल्ट, जस्त, तांबें, शिसें, लोखंड, तुरटी, मोरचूद, इत्यादि खनिज पदार्थ अरवलीच्या रांगांतून आणि अलवार व जयपूर संस्थानांतील शेखवती परगण्यामधील क्षेत्री-टेकड्यांतून आढळतात. त्याचप्रमाणें येथील इमारतीचे दगडहि प्रख्यात आहेत. जंबूर, कुरंद, संगजिरा, संगमखरी इत्यादि जातींचे, स्फटिकमय चुनखडीचे, पांढरट काळसर आणि पांढरट तांबूस असे वाळूचे आणि पापुद्रे असलेले मऊसर पाटीचे दगड, राजपुतान्याच्या बहुतेक भागांतून सांपडतात. अरवली पर्वताच्या उत्तरेकडील सखल भागीं असलेल्या सांबर नांवाच्या खाऱ्या पाण्याच्या सरोवरापासून पुष्कळच मीठ पिकवितात. या सरोवराचा परीघ सुमारें ५० मैल आहे.


अरवली पर्वतांत विपुल झाडी असल्यामुळें या भागांत सिंह, वाघ, चित्ते, अस्वल, इत्यादि हिंस्र श्वापदें झाडाझुडपांनीं आच्छादलेल्या गुहांतून, आणि खबदाडींतून वस्ती करून राहतात. पण रजपूत वीरांना शिकारीचा अतिशय नाद असल्यामुळें या प्राण्यांना फारसें सुख लाभत नाहीं. अलीकडे सिंहांची संख्या पुष्कळच कमी झाली आहे. हरिण, काळवीट, सांबर, नीलगायी, आणि रानडुकरें विपुल आहेत. या जंगलांत साग, शिसव यांसारखीं झाडें वाढतात. पण तीं दुर्मिळ असतात.

रजपूत हे मूळचे राजपुतान्यांतील नव्हेत; रामायणकालीं रघुकुल म्हणजे सूर्यवंशीय क्षत्रिय, आणि महाभारतकालीं कुरुकुल म्हणजे सोमवंशीय क्षत्रिय यांचीं घराणीं गंगेच्या खोऱ्यांतील आणि पंजाबांतील भूप्रदेशांवर राज्यें करीत होतीं. आणि याच घराण्यांतील राजांचें इ. स. ६ व्या शतकापर्यंत ज्या भागांतील प्रदेशावर राज्य होतें. या राजकुलांतूनच रजपूत कुलें निर्माण झालीं असें भारताचार्य चिंतामणराव वैद्य यांचें म्हणणें आहे. पण हा संशयग्रस्त प्रश्न आहे असें ज्ञानकोशकार

डॉ. केतकर यांचें म्हणणें आहे. हा वाद कांहींहि असला तरी सातव्या शतकापासून अनेक रजपूत घराणीं उदयास आलीं यांत मात्र शंका नाहीं. हीं घराणीं प्रथम पंजाबांतील रावळपिंडीपासून लाहोर, दिल्ली, तें गंगेच्या काठीं असलेल्या कनोज शहरापर्यंत राज्यें करीत होतीं. पण पुढें महमद गिझनी, महमद घोरी, व इतर मुसलमान सरदार यांच्या पुढें रजपुतांचा टिकाव न लागल्यामुळें त्यांना मायभूमीचा त्याग करावा लागला. पण हे राजपुरुष असल्यामुळें जेथें जेथें हे गेले तेथें तेथें त्यांनीं राज्यें निर्माण केलीं. बरींच घराणीं हल्लींच्या राजस्थानांत आलीं आणि त्यांनीं ठिकठिकाणीं आपआपलीं राज्यें स्थापिलीं. मेवाडचे गुहिलोट किंवा शिसोदिया, मंदोरचे परिहार, जयपूरचे चव्हाण, जोधपूरचे राठोड, जेसलमीरचे यादव, यांशिवाय सोळंकी, कच्छवाह, परमार हीं घराणीं प्रमुख होत. रजपूत कुलांनीं आपलीं राज्यें या भूप्रदेशांत स्थापिलीं म्हणूनच या भूप्रदेशास राजस्थान हें योग्य नांव मिळालें. मायभूमीचा त्याग करून जरी यांनीं नवीं राज्यें निर्माण केलीं तरी यांना स्वातंत्र्य-सुख फार काळ लाभलें नाहीं. अल्लाउद्दिन खिलजीपासून मोंगल घराण्याचा उदयकाल येईपर्यंत यांना मुसलमानांकडून सारखा त्रास पोहोंचत होताच. सम्राट् अकबरानें तर मेवाडप्रांताशिवाय बहुतेक राजस्थान आपल्या साम्राज्यास जोडलें. पुढें मराठ्यांनीं राजस्थानचें स्वातंत्र्य हरण करून त्याचें वैभवच नष्ट केलें. हल्लीं येथील सर्व राजे ब्रिटिश सरकारचे अंकित आहेत.

असें जरी असलें तरी रजपूत हे खरे रणवीर यांत मुळींच शंका नाहीं. चितोड, कालिंज़र, कमळमेर, रणथंबोर, उदेपूर, जालोर, हळदी-घांट, अजमीर इत्यादि स्थळीं स्वातंत्र्यरक्षणार्थ त्यांनीं जे घनघोर रण-संग्राम केले ते, आणि त्यांच्या वीरांगनांनीं शत्रूंच्या स्वाधीन होण्यापेक्षां अनेक वेळां होम पेटवून त्यांत मुलांबाळांसह जे जोहार केले ते, अंगीं बाणलेल्या वीरधर्मामुळेंच होत.

राठी ग्रंथ संग्रहाल
स्थळ प्रत
सं. ........ नं. ........
ता. ........



( देऊळवाडा ) दिलवाडा–अबू



पंजाबी



काश्मीरी पंडीत



हिंदी.

## कांहीं स्त्री–पुरुष



मारवाडी



मारवाडी



रजपूत वीर

राजपुतान्यांत रजपुतांची संख्या मात्र शेंकडा सहा सात इतकीच आहे. एकंदर लोकसंख्या १५,८६,००४ असून त्यांपैकीं शेंकडा ८३ लोक हिंदु आहेत. त्यांत ब्राह्मण, भाट, वाणी, गुजर, जाट, मीना, भिल्ल, चांभार, माळी इत्यादि जाती मुख्य आहेत. मूळच्या मेयो लोकांनीं मात्र मुसलमानी धर्म पत्करला आहे. गुजर, जाट, मीना आणि मेयो हे लोक शेती करतात. वाणी बहुतेक जैन धर्माचे आहेत. व्यापार हा त्यांचा मुख्य धंदा. ब्राह्मणांची नोकरी; आणि बहुतेक रजपूत लोकांना मिरास असतेच. बहुतेक सर्व लोक राजस्तानी भाषा बोलतात. प्राचीन काळीं ज्याप्रमाणें रणांगणांत त्याप्रमाणें आज पोलोच्या खेळांत रजपूत लोकांनीं सर्व जगांत नांवलौकिक मिळविला आहे.

राजपुतान्यांतील पुरुषांचा पोषाख साधाच असतो. मारवाडी लोक तर शक्य तितका कमी पोषाख करतात. डोक्यावर डावीकडून घट्ट बांधलेलें सुताच्या नाडीचें रंगी बेरंगी पागोटें किंवा तलम सुताचा रंगी बेरंगी पट्टे असलेला उलटीकडून बांधलेला फेटा, अंगांत तंग अशी बंडी किंवा सैल असा पांढरा लांब सदरा, गुडघ्यांपर्यंतच पोहोंचणारें घट्ट काचा कसलेलें धोतर किंवा गुडघ्यापर्यंत तंग व मांडीपाशीं सैल अशी विजार असा यांचा पोषाख असतो. सर्वांच्या पायांत चढाव असतात. बायकांचे परकर रंगी बेरंगी असून त्यांस बराच मोठा घोळ असतो. त्यांवरून लाज काढण्याकरितां डोक्यावरून पदर घेण्यास चित्रविचित्र रंगांचें चीट असतें. अंगांत पाठीकडील बाजूस बंद असलेली चोळी असते. पोषाख शक्य तितक्या भडक रंगाचा करण्याची आणि त्यांत शक्य तेथें जर वापरण्याची त्यांना फार आवड असते. पायांत मोठमोठाले पोकळ वाळे, आणि हातांत कोपरापर्यंत चपट्या हस्तिदंती बांगड्या घालतात. तसेंच वेणींत ठिकठिकाणीं सोन्या-चांदीचीं फुलें गुंफतात आणि गळ्यांत मोठमोठ्या जड सऱ्या घालतात. एकंदरींत यांना दागिन्यांचा फारच सोस असतो. रजपूत

वीरांचा पोषाख थोडासा निराळा असतो. पायघोळ तंग विजार, अंगांत लांब अंगरखा, खांद्यावरून कमरेस गुंडाळलेला शालू, त्यांत लटकावलेली तलवार, आणि डोक्यावरील चंदेरी पगडी येवढाच यांचा पोषाख. बहुतेक लोक कल्ले व लांब दाढी राखतात.

येथील लोकांच्या खाण्यांत ज्वारी, बाजरी यांच्या भाकऱ्या आणि गव्हाच्या पोळ्या हेच मुख्य पदार्थ असतात. डाळभात (खिचडी), दूध-तूप, भाजीपाला या गोष्टी प्रांतांतील पुरवठ्याप्रमाणें कमी जास्त प्रमाणांत असतात. भात मात्र फारसा कोणी खात नाहीं.

राजपुतान्यांत दगड मुबलक असल्यामुळें बहुतेक इमारती दगडांच्या असतात. गांवांना पाण्याचा पुरवठा तलावांपासूनच होत असतो. म्हणून बहुतेक शहरें नैसर्गिक किंवा कृत्रिम सरोवरांच्या काठीं वसलेलीं आहेत. संस्थानिकांचे टोलेजंग राजवाडे, हवेल्या, महाल, हीं सरोवरांना सुंदर घाट बांधून, त्यांवर बांधलेलीं आहेत. कांहीं ठिकाणीं तर सुंदर जलमंदिरें आहेत. त्यामुळें शहरांना एक प्रकारची विशेषच शोभा आलेली असते. जयपूर, जोधपूर, उदेपूर, बुंदी हीं शहरें तर त्यांच्या सुंदर मांडणीमुळें प्रख्यात आहेत. त्यांतल्यात्यांत जयपूर शहराची रचना अखिल भरत-खंडांत सुरेख व नमुनेदार आहे. जयपूर शहरांत जगप्रसिद्ध जंतर-मंतर नांवाची वेधशाळा आहेत. जोधपूरचा किल्ला भारी बळकट आहे.

राजपुतान्यांत पुष्कळच स्थळें पाहण्यासारखीं आहेत. अबूचा पहाड तर मनोरम धबधबे, प्रशान्त सरोवरें आणि वृक्षाच्छादित शिखरांवरून वाहणाऱ्या रम्य निर्झरांमुळें निसर्गरमणीय झाला असून त्यावरील दिल-वाडचीं जैन मंदिरें, अचलगडावरील अचलेश्वर, गुरु-शिखर, वसिष्ठाश्रम, गौतमाश्रम इत्यादि रम्य स्थानें अत्यंत सुंदर आहेत. अजमीरजवळचें पुरातन पुष्कर तीर्थ असेंच प्रसिद्ध आहे. तसेंच राजपुतान्यांत एकंदर

वीस एकवीस लहान मोठीं संस्थानें असून प्रत्येक संस्थानिकानें आपली राजधानी सुंदर सुंदर राजवाडे, विलासमंदिरें, रम्य उपवनें, विस्तृत पेठा यांनीं सुशोभित केली आहे. संस्थानिकांचीं रत्नभांडारें, गजशाला, हयशाला, आणि रथशाला यांचें वैभवहि पाहण्यासारखें असतें. प्रत्येक राजधानीचें सौंदर्य कांहीं वेगळेंच. अजमीरचा कांहीं भाग ब्रिटिशांनीं आपल्या ताब्यांत ठेवला असून तेथें व्हाइसरॉयांचा प्रतिनिधि असतो. या भागास अजमीर-मारवाड म्हणतात. याही भागाचें स्वाभाविक सौंदर्य वाढविण्यांत आलें आहे.

शेतकी हा जरी येथील लोकांचा मुख्य धंदा असला तरी तलम कापड, सतरंज्या आणि कांबळीं विणणें, मातीचीं सुबक भांडीं घडविणें, हस्तिदंती, पोलादी व पितळी पदार्थ तयार करणें, इत्यादि धंदे सगळी-कडे चालतात. जयपूर, जोधपूर, अलवार, उदेपूर या राजधान्या सोन्या-चांदीवरील नक्षीकाम, हस्तिदंतावरील कोरीव काम आणि मातीच्या भांड्यांवरील रंगीत काम यांबद्दल विशेष प्रख्यात आहेत.

बहुतेक राजधान्यांतून व्यापार चालतोच; शिवाय सांबर, नागोर, पाली, भीलवाडा, सीकार, झुंझव, फलोदी इत्यादि व्यापारी पेठा विशेष प्रसिद्ध आहेत. व्यापारासाठीं बऱ्याच पक्क्या सडका बांधलेल्या असून लोहमार्गहि चौफेर नेलेले आहेत. दिल्लीपासून अरवलीच्या पश्चिम पायथ्यानें सांबर, किशनगड, अजमीर या शहरांवरून अबूपर्यंत आणि तेथून गुजराथेंतील अहमदाबादपर्यंत; भरतपूर ते रतलामपर्यंत; पंजाब-मधील भातिंदापासून बिकानेर, जोधपूर ते सिंध-हैद्राबाद आणि पुढें कराचीपर्यंत; रतलाम ते अजमीरपर्यंत, असे लोहमार्ग नेले आहेत. वालुकामय प्रदेशांतून उंटांचे तांडे नेहमींच जात येत असतात. मोटारींचा सुळसुळाट सगळीकडे आहेच. प्रत्येक संस्थानिकापाशीं दहा दहा, वीस वीस, पन्नास पन्नास मोटारी असतात त्या वेगळ्याच.

## राजपुतान्यांतील हल्लींचीं संस्थानें

| नांव व घराणें | राजधानी | क्षेत्रफळ सुमारें चौ. मै. | लोकसंख्या सुमारें | उत्पन्न सुमारें |
|---|---|---|---|---|
| अलवार, रजपूत | अलवार | २१,३०० | १०,००,००० | ५५,००,००० |
| बिकानेर, रजपूत | बिकानेर | ३३,५१२ | ९,३६,२२० | १,००,००,००० |
| जोधपूर, रजपूत | जोधपूर | ३५,०६६ | २१,००,००० | १,३७,१६,००० |
| जयपूर, रजपूत | जयपूर | १६,६८२ | २६,३१,००० | १,२५,००,००० |
| जेसलमीर, यादव | जेसलमीर | १६,०६२ | ८५,००० | ४,००,००० |
| उदेपूर, रजपूत | उदेपूर | १२,९१५ | १६,०३,००० | ८०,६०,००० |
| कोटा, रजपूत | कोटा | ५६८४ | ७,५६,००० | ५४,००,००० |
| टोंक, अफगाणी | टोंक | २५८६ | ३,०७,५०० | २३,८२,४५० |
| बुंदी, रजपूत | बुंदी | २२२० | २,१२,३०० | १२,००,००० |
| भरतपूर, जाट | भरतपूर | १९८२ | ५,१३,००० | ३५,००,००० |
| सिरोही, रजपूत | सिरोही | १९६४ | २,२०,००० | १०,५०,००० |
| बन्सवाडा, रजपूत | बन्सवाडा | १९४६ | २,६०,६७० | ७,००,००० |
| डुंगरपूर, रजपूत | डुंगरपूर | १४५० | २,००,००० | ६,५०,००० |
| केरवली, रजपूत | केरवली | १२४२ | १,८९,८०० | |
| धोलपूर, जाट | धोलपूर | १२०० | २,६०,००० | |
| प्रतापगड, रजपूत | प्रतापगड | ८८६ | ९५,००० | ५,५०,००० |
| किशनगड, रजपूत | किशनगड | ८५८ | ९०,००० | ९,००,००० |
| झालवाडा, रजपूत | झालवाडा | ८१० | १,१४,००० | ८,००,००० |
| शाहपुरा, रजपूत | शाहपुरा | ४०५ | ५०,००० | |
| लावा, रजपूत | लावा | १९ | २५०० | ५०,००० |

श्री ... संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ... नं.
ता. ...

# १०

## गंगेचें सुपीक खोरें हीच भारतीय सुवर्ण-भूमि

तत्रापि, त्याहि सुपवित्र महानद्यांत
गंगेसमान दुसरी न दिसे प्रतीत; ॥
भोगी जसें अधिपतित्व पिता नगांचें,
कन्या तसेंच महिषीपद सागराचें ॥ १३ ॥
हें उत्तरेकडिल भारतखंड सारें
पोषेचि केवळ तुझ्या गुरुवारि भारें ॥ ९९ ॥

'गंगावर्णना'

आपल्या सुप्रसिद्ध 'गंगावर्णना' नामक खंड-काव्यांत कविवर्य चिंतामणि पेटकर यांनीं श्रीगंगेचें महात्म्य मोठ्या रसाळ वाणीनें आणि मुक्तकंठानें वर्णिलें आहे. काव्य-वाचनाची ज्यांना आवड आहे त्यांनीं तें अवश्य वाचावें. विश्वविद्यालयांच्या परीक्षांकरितां तें नेमण्यांत येतहि असतें. यावरून त्याची योग्यता समजेल.

" भूगोलावर जे अनेक पर्वत आहेत त्यांचा हिमालय हा राजाधिराज आहे. अशा या नगराजेंद्रांत ज्या मोठमोठ्या नद्या उगम पावतात त्या सर्वांमध्यें गंगेच्या योग्यतेची दुसरी कोणतीच नदी नाहीं, म्हणूनच ही हिमनग-कन्या सागराची पट्टराणी झाली असून तिला तें पद शोभतेंहि." हा पहिल्या श्लोकाचा अर्थ. आणि "तुझ्या ( गंगेच्या ) प्रवाहांतून जें अलोट पाणी वाहात येतें त्या पाण्यावर उत्तरेकडील सगळेंच्या सगळें भरत-खंड पोसलें जात आहे." हा दुसऱ्या श्लोकार्धाचा अर्थ.

हिमालयाच्या उत्तरभागीं सिंधु, ब्रह्मपुत्रा आणि सतलज या नद्या उगम पावतात; त्याचप्रमाणें पंजाबांतून वाहात जाणाऱ्या इतर चार नद्या आणि गंगा, यमुना, व नेपाळ, भूतान आणि सिकीम या प्रदेशांतून वाहात येणाऱ्या सर्व नद्या हिमालयाच्या दक्षिण उताराव्रर उगम पावतात. पण या सर्व नद्यांमध्यें गंगेची थोरवी विशेष आहे यांत शंका नाहीं. कारण गंगेमुळें जेवढा भूप्रदेश सुपीक झाला आहे तेवढा भूप्रदेश भरतखंडांतील इतर कोणत्याहि नदीमुळें सुपीक झालेला नाहीं ही गोष्ट सत्य आहे. गंगेची उगमापासून मुखापर्यंतची लांबी सुमारें १८०० मैल भरते. सिंधूचीहि लांबी तेवढीच आहे, व ब्रह्मपुत्राची सुमारें १९०० मैल आहे. लांबीला या तीन्ही नद्या जरी सारख्या असल्या तरी गंगा काठचें खोरें जास्त विस्तृत आणि जास्त सुपीक आहे. ब्रह्मपुत्रा आणि सिंधु या नद्यांना हिमालय पर्वतास एकीला पूर्वेकडून आणि दुसरीला पश्चिमेकडून वळसा घालून यावें लागत असल्यामुळें त्यांचा अनुक्रमें १००० आणि ८५० मैल लांबीचा प्रवास केवळ पहाडी मुलुखांतून होतो, म्हणून त्या प्रदेशास त्यांचा तसा फारसा फायदा झालेला नाहीं. गंगेला मात्र गंगोत्री( गंगेचें पवित्र उगमस्थान )पासून हिमालयाच्या पायथ्याशीं असलेल्या हरिद्वार येथील पवित्र हर-की-पायरीपर्यंत येई तों सारा १८० मैलांचा प्रवास उताराव्ररून करावा लागतो. हा प्रवास तिला जाणाऱ्या वेगानेंच करावा लागतो; कारण या १८० मैलांत तिला १६,००० फूट उतरून यावें लागतें. हरिद्वारापासून पुढें ती बऱ्याच संथपणानें वाहूं लागते. कारण, पुढील १६०० मैलांच्या प्रवासांत तिला सारा १००० फुटांचाच उतार उताराव्रयाचा असतो. या शांत प्रवाहामुळेंच तिच्या काठीं पसरलेल्या सखल प्रदेशास तिचा भरपूर फायदा मिळतो. म्हणूनच कवीनें

"हें उत्तरेकडिल भारतखंड सारें, पोपेचि केवळ तुझ्या गुरुवारि भारें ॥" अशी कांहींशी अतिशयोक्तिपूर्णच पण गौरवपूर्वक गंगामाईची स्तुति गायिली आहे.

भूगोलावर गंगेपेक्षां पुष्कळ मोठमोठ्या नद्या आहेत, नाहींत असें नाहीं. आफ्रिकेंतील कांगो, नाइल आणि नाइजर; दक्षिण अमेरिकेंतील ॲमेझॉन आणि ओरीनोको; उत्तर अमेरिकेंतील मिसिसिपी, सेंट लॉरेन्स आणि युकॉन; ऑस्ट्रेलियांतील मरे-डार्लिंग; युरोपांतील डॅन्यूब आणि व्होल्गा; आणि आशियांतील हो-आंग-हो, यांगत्सेकिआंग, ओबी, लेना इत्यादि नद्या पुष्कळच मोठ्या आहेत. पण भूप्रदेश सुपीक करण्यास याहि नद्यांचा या नाहीं त्या कारणामुळें गंगेइतका उपयोग होत नाहीं. कांहीं नद्यांच्या कांठीं शेंकडों मैल एकजात घनदाट आणि किर्र अरण्यें आहेत, तर कांहींना आपला बराच मार्ग केवळ वाळवंटांतूनच काढावा लागतो; कांहींना अनेक धबधब्यांवरून उड्या घेत यावें लागतें तर कांहींना आपलें प्रवाह-पात्र अनेक वेळां बदलण्याची स्फूर्ति होते; कांहीं नद्यांचें पाणी हिंवाळ्यांत गोठून जातें तर कांहीं नद्यांच्या मुखांशीं गोठलेला समुद्र असल्यामुळें पाणी प्रदेशभर पसरून तो प्रदेश केवळ दलदलीचा बनतो. अशा एक ना एक कारणामुळें या नद्या फारशा उपयोगीं पडत नाहींत. गंगेला एक पूर्वपरंपराहि आहे. वरील कोणत्याहि नदीपेक्षां गंगेच्या काठीं झालेली लोकांची सुधारणा किंवा संस्कृति फार पुरातन आहे व ती अद्याप टिकून आहे. इतर कांहीं नद्यांच्या काठीं सुधारणा झाली होती; पण ती मध्यंतरीं नष्ट झाली. गंगामाईला एक प्रकारचें पावित्र्यहि आहे तें वेगळेंच.

गंगेच्या भूतलावरील अवतरणासंबंधीं एक सुरम्य कथा आहे. त्या कथेंत भूप्रदेशाचा शोध आहे. ती कथा अशी:—"फार प्राचीन काळीं आर्यावर्तांत ( उत्तर हिंदुस्थानचें प्राचीन नांव ) इक्ष्वाकु-कुलोत्पन्न सगर-

राजा राज्य करीत होता. तो जसा महान् पराक्रमी होता तसा यज्ञयाग करण्यांत सदा तत्पर असे. त्यानें अनेक यज्ञ केले; शिवाय अश्वमेध यज्ञहि केले. शेवटच्या अश्वमेध यज्ञाच्या वेळीं श्यामकर्ण अश्वास इंद्रानें हरण करून पाताळांत कपिलमुनि तपश्चर्या करीत समाधिस्थ बसले होते त्या ठिकाणीं नेऊन ठेविलें. सगरराजास साठ सहस्र पराक्रमी पुत्र होते. ते त्याचा शोध करीत करीत समुद्राच्या तळाशीं जाऊन तेथें खणत खणत पाताळांत गेले. कपिलमुनि समाधिस्थच होते, त्यांस त्यांनीं मारण्यास सुरुवात केली. कपिलमुनींच्या समाधीचा भंग झाला म्हणून रागानें त्यांनीं आपले डोळे उघडले त्यासरशीं ते सर्व सगर-पुत्र दग्ध झाले. सगर राजास अंशुमान् नांवाचा नातु होता. त्यानें कपिलमुनींना प्रसन्न करून घेतलें आणि तो अश्व परत मिळविला व अर्धवट राहिलेला अश्वमेध यज्ञ शेवटास नेवविला. सगर राजा पुढें तपश्चर्येकरितां अरण्यांत निघून गेला. पण साठ सहस्र सगरकुमार दग्ध झाले त्यांना सद्गति कशी मिळावयाची हा प्रश्न सगर-कुलोत्पन्न दिलीप राजापुढें होता. स्वर्गंगा जर भूतलावर आणतां आली तर तिच्या पवित्र जलस्पर्शानें दग्ध झालेले कुमार पुनीत होतील म्हणून दिलीप राजानें हिमालयांत जाऊन तप केलें, पण यश आलें नाहीं. पुढें भगीरथ राजानें हिमालयांत जाऊन तेथील गोकर्ण क्षेत्रीं खडतर तपश्चर्या करून गंगा-मातेस प्रसन्न केलें. पण स्वर्गंगा भूतलावर यावयाची म्हणजे स्वर्गावरून खालीं पडणारा तिचा प्रचंड ओघ भूमीस सहन होणें शक्य नव्हतें. म्हणून प्रथम ती कैलासपर्वतावर वास करणाऱ्या शंकराच्या शुभ्र जटेंत अवतरली आणि तेथून मग मंद गतीनें भगीरथ राजाच्या पाठीमागून येऊं लागली." ज्या स्थलाहून गंगेचा प्रवाह सुरू होतो त्या ठिकाणीं गोमुखीसारखें ३०० फूट जाडीच्या हिमराशींत एक खिंड आहे. या स्थळासच गंगोत्री म्हणतात. भगीरथ राजापाठीमागून गंगा वाहात येऊं लागली म्हणून गंगेला या भागांत भागीरथी म्हणतात.



हिमाचलावरून वेगानें उतरणारी गंगा

इं. स्टे. रेल्वेज् मासिकावरून ( मूळ चित्रकाराचा मी आभारी आहें. )

वरील सुंदर कथेंत कवींची सुरम्य कल्पना दिसून येते यांत शंका नाहीं. पण या कथेंत भौगोलिक सत्यहि ग्रथित केलें आहे. सगर राजानें जो अश्वमेध यज्ञ केला त्यानिमित्त सगर राजाच्या कुमारांनीं इक्ष्वाकु-कुलाची राजधानी जी अयोध्या तेथपासून बंगालच्या उपसागरापर्यंत त्या वेळीं पसरलेल्या निबिड अरण्यांतून मार्ग काढीत काढीत प्रदेशाचा शोध केला असावा आणि या साहसांत ते मृत्युमुखीं पडले असावेत. हे जसे साहसप्रिय होते, तसेच राजा दिलीप आणि राजा भगीरथ हेहि साहस प्रिय असावेत त्यांनीं बंगालच्या उपसागराकड न जातां हिमालया-कडील पर्वत-प्रदेशाचा शोध लावला असावा. दिलीप राजास गंगेच्या उगमस्थानापर्यंत जरी जातां आलें नाहीं तरी त्या दिशेनें त्यानें बराच शोध केला असावा आणि पुढें राजा भगीरथ यानें गंगेच्या उगमस्थानाचा शोध लावून कैलास पर्वताच्या हिममय प्रदेशांतून (म्हणजेच शंकराच्या शुभ्र जटेंतून) येणाऱ्या प्रवाहास नीट वाट करून दिली असावी. प्राचीन काळींहि साहसी प्रवासी होतेच, पण त्यांच्या साहसावर कवींनीं सुंदर आख्यायिका, अद्भुत कथा किंवा सुरम्य काव्यें रचिल्यामुळें त्यांतील सत्य लुप्त झालें एवढेंच !

असो. गंगेचें खोरे म्हणजे कैलासपर्वत, केदारनाथ, बदरीनाथ, शिवालिक-पहाड इत्यादि हिमालयाच्या रांगांपासून तें थेट बंगालच्या उपसागरापर्यंत जो गंगेचा १८०० मैल लांबीचा अर्धवर्तुळाकार प्रदेश हिमालयाच्या पायथ्याशीं समांतर असा आहे तो प्रदेश होय. गंगोत्री-जवळच जम्नोत्री येथें उगम पावणारी गंगेची सहोदरी यमुना तिला समांतर अशीच हिमगिरीवरून वाहात येऊन प्रयागपाशीं तिच्याशीं एकरूप होते. गंगेच्या खोऱ्याची दक्षिण मर्यादा म्हणजे यमुना नदीचा दक्षिण तट होय. ज्याप्रमाणें या खोऱ्याची उत्तर-मर्यादा हिमालयाच्या पायथ्यानें पडली आहे तशी दक्षिण मर्यादा अरवली पर्वताच्या दिल्लीपर्यंत

आलेल्या टेंकड्या आणि विंध्य पर्वताच्या कैमूर, मैकल, अमरकंटक आणि पारसनाथ अशा ज्या तुटक तुटक रांगा पसरलेल्या आहेत त्या रांगांनीं प्रयागपासून बंगालच्या उपसागरापर्यंत स्वाभाविक मर्यादा घातली आहे. पंजाबच्या पांचहि नद्या नैऋत्येकडे वाहात जातात तर गंगा यमुना आग्नेयेकडे वाहात जातात. गंगा यमुना या नद्यांच्या प्रवाहांना हें जें वळण मिळतें, तें एखादा प्रचंड पर्वत आड आल्यामुळें नव्हे; तर सतलज नदी आणि जम्नोत्री यांमधील शिवालिक टेकड्या आणि पुढें कुरुक्षेत्र, पानिपत आणि सोनपत येथील सपाट उंचवटे येवढ्यामुळेंच होय. हे उंचवटे जर आड आले नसते तर राजस्थानचें स्वरूप पालटलें असतें. यमुना नदीमुळें गंगेचें बळ वाढलें खरें, पण राजस्थानचें मात्र कायमचें नुकसान झालें.

यमुनेला बाणगंगा, चंबळा, सिंध, वेत्रवति ( बटवा ) इत्यादि नद्या विंध्य व अरवली पर्वतांतील जलभार आणून देतात. गंगेला हिमालयाच्या नंदादेवी शिखराजवळील सर्व जलभार घेऊन अलकनंदा नदी ही देवप्रयागपाशीं प्रथम मिळते. त्यानंतर हिमालयाच्या दक्षिण उतारावरून वाहात येऊन रामगंगा, गोमती, शारदा, घोग्रा, राप्ती, गंडकी, बागमती आणि कुशी या मुख्य मुख्य नद्या ओळीनें येऊन मिळतात. याशिवाय याच उतारावरून शेंकडों नद्या—निर्झर येऊन मिळतात ते वेगळेच. ब्रह्मपुत्रानद उत्तर-उतारावरील सर्व जलभार घेऊन गंगेस गंगेच्या अगदीं मुखांजवळ येऊन मिळतो. ब्रह्मपुत्रा मिळाल्यानंतर गंगेस मेघ्ना हें नांव प्राप्त होतें. मेघ्ना नदीची रुंदी २० मैल असून खोली ३० फूट आहे. गंगेला दक्षिणेकडून जशी यमुना मिळते तशीच कैमूरच्या डोंगरांत उगम पावणाऱ्या केण, तान्सा, शोण, आणि पारसनाथाजवळ उगम पावणाऱ्या फल्गु, बरखर, दामोदर आणि रूपनारायण या नद्या येऊन मिळतात. मात्र यमुनेशिवाय या नद्या म्हणण्यासारख्या मोठ्या नाहींत. बंगाल प्रांतांत गेल्यावर गंगेला अनेक फाटे फुटतात आणि अनेक

मुखांनीं ती बंगालच्या उपसागरास मिळते. निम्मा अधिक बंगाल प्रांत या मुखांमधील भूप्रदेशांचाच बनलेला आहे. हिमालयाच्या पायथ्याशीं असलेल्या हरिद्वारापासून तों गंगेच्या मुखांपाशीं पसरलेल्या सुंदरबन नांवाच्या केवळ गाळानें बनलेल्या प्रदेशापर्यंतचा सर्वच भूप्रदेश चिक्कण माती, मऊसर गाळ व मऊ रेती यांचा बनलेला आहे. **भारतीय सुवर्ण-भूमि ती हीच होय.** गंगेच्या मुखापासून कांठाकांठानें प्रवास केल्यास शेंकडों मैल खडा कीं गोटा सांपडत नाहीं, कीं एखादा उंचवटा आढळत नाहीं; त्यामुळें सर्वच खोरें एकजात सुपीक झालें आहे. क्रमच लावावयाचा झाल्यास या सुपीक खोऱ्याचे साधारणपणें तीन भाग पडतात. हरिद्वारापासून प्रयागाजवळ गंगा यमुना यांच्या संगमापर्यंतचा १ला पूर्वविभाग; प्रयागापासून राजमहालपर्यंत गंगानदी थेट पूर्वेलाच जाते तेथपर्यंतचा २रा मध्य-विभाग; आणि राजमहालपासून गंगा दक्षिणवाहिनी होते व तिला अनेक फाटे फुटूं लागतात, आणि अनेक दुआब निर्माण होतात तेव्हां हा अनेक दुआबांचा ३रा मुख-विभाग. पहिल्या भागापेक्षां दुसरा भाग जास्त सरस आणि दुसऱ्यापेक्षां तिसरा जास्त सरस आहे. मात्र पहिल्या भागांतील गंगा आणि यमुना यांमधील जो दुआब आहे तोहि कमी सुपीक नाहीं. उलट अनेक कालव्यांमुळें तो दुसऱ्या भागापेक्षांहि किंचित् सरसच ठरेल.

गंगेच्या खोऱ्यांत जितकी दाट वस्ती आहे तितकी दाट वस्ती चीन देशांतील हो-आंग-हो आणि यांगत्से-कि-आंग या दोन नद्यांच्या मुखाजवळील प्रदेशांशिवाय दुसरीकडे जगांत कोठेंहि नाहीं, यावरून गंगेचें खोरें किती सुपीक असावें याची कल्पना सहज करितां येण्यासारखी आहे. गंगेच्या खोऱ्याचें क्षेत्रफळ सुमारें २,२०,००० चौरस मैल भरतें आणि येवढ्या क्षेत्रफळांतील लोकसंख्या १९३१ सालांतील खानेसुमारीवरून सुमारें १२,५४,००,००० हून जास्तच भरेल असें दिसतें. म्हणजे प्रत्येक चौरस मैलाच्या क्षेत्रफळांत ५७० लोक राहात आहेत असें आढळून येतें.

मुख-विभागांत हें प्रमाण ७५० हून जास्त पडतें. आतां हे सर्वच लोक हल्लीं खाऊन पिऊन अगदीं सुखी असतील असें नव्हे. मात्र प्राचीन काळीं सुखानें राहण्यास येथील लोकांस भरपूर मिळत असे यांत शंका नाहीं. त्या वेळीं लोकवस्तीहि पुष्कळ कमी असे, गंगेच्या खोऱ्यांत अलोट पीकहि येत असे आणि म्हणूनच लोक अत्यंत सुखी असत. उपासमार त्यांना स्वप्नांतसुद्धां माहीत नव्हती. शेती, उद्योगधंदे, व्यापार, विद्या, कलाकौशल्य या सर्वांचीच समृद्धि आणि भरभराट असल्यामुळें सर्व जगांत "**गंगेचें सुपीक खोरें हीच भारतीय सुवर्ण-भूमि**" अशी कीर्ति पसरली असल्यास नवल नाहीं. हल्लीं जे जमिनदार आहेत ते अत्यंत सुखी आहेत, पण शेतकरी व इतर लोक कंगाल आहेत. बरेच लोक बेकार आहेत; त्यांची स्थिति तर विचारूंच नये!

गंगेच्या खोऱ्यांत जरी इतकी दाट वस्ती असली तरी शहरांच्या मानानें खेड्यांचीच संख्या जास्त. असंख्य खेडीं या विस्तृत आणि लांबलचक खोऱ्यांत सगळीकडे दाट पसरलेलीं आहेत. शेतकऱ्यांच्या झोपड्या व घरेंदारें आणि जमिनदारांचे टुमदार बंगले, त्यांच्या सभोंवार कांहीं झाडें, केळीचीं आगरें, बांबूचीं बेटें आणि लांबवर पसरलेलीं भाताचीं हिरवीं गार शेतें अगर शेताशेतांतून गव्हाचें सोनेरी रंगाचें उभें असलेलें पीक, खसखस, तीळ, कारळे, जवस, करडई, यांचीं फुललेलीं शेतें, किंवा एका पुढें एक असें हजारों एकर पसरलेले उंसाचे मळे हेंच दृश्य मुखापासून हरिद्वारापर्यंत कमीजास्त प्रमाणांत सर्वत्र दिसतें.

मसूरी, हरिद्वार आणि नैनिताल या हिमालयांतील पायथ्यासन्निध असलेल्या स्थळांपासून तें उत्तरेकडील जम्नोत्री, गंगोत्री, केदारनाथ, बदरीनाथ आणि नंदादेवी या मध्य-हिमालयांतील शिखरांपर्यंत आणि पश्चिमेकडील सिमल्याजवळील शिवालिक पहाडापासून तें पूर्वेकडील नेपाळ प्रांतापर्यंत येणारा पर्वतमय प्रदेश यांचाहि समावेश गंगेच्या खोऱ्यांत

होतो. या पर्वतमय प्रदेशाची पूर्वपश्चिम लांबी १८० मैल असून दक्षिणोत्तर रुंदी १२० मैल आहे आणि एकंदर क्षेत्रफळ सुमारें २१,५०० चौरस मैल भरतें. या भागांतील लोकवस्तीचें प्रमाण मात्र प्रदेशाच्या पहाडी स्वरूपामुळें पुष्कळ कमी पडतें. तरी दर चौरस मैलास सुमारें १०० लोक पडतातच.

गंगेचें खोरें जें इतकें सुपीक झालें तें तिला मिळणाऱ्या असंख्य नद्या-निर्झरांमुळें, हें तर खरेंच. पण तें केवळ यामुळेंच मात्र नव्हे. कारण पंजाबांतूनहि पांच, नव्हे सात मोठमोठ्या नद्या वाहात जातात, तरी तो प्रदेश गंगेच्या खोऱ्याशीं तुलना करण्याइतका सुपीक खास नाहीं. याचें खरें कारण म्हणजे गंगेच्या खोऱ्यांत वर्षाकाठीं जो भरपूर पाऊस पडतो त्यामुळें तिचें खोरें इतकें सुपीक झालें आहे. उन्हाळ्या दिवसांत हिमाळ्यांतील हिमराशी वितळून नद्यांना जे पूर येतात ते पूर, पावसाळ्यांतील पाऊस आणि इतर दिवसांत किंवा जरूर तेव्हां या नद्यांना जे कालवे काढले आहेत त्या कालव्यांचें पाणी या तिन्ही कारणांचा समुच्चय झाल्यामुळेंच गंगेचें हें विशाल खोरें इतकें विलक्षण सुपीक झालें आहे.

गंगेच्या खोऱ्यामध्यें दोन दिशांनीं मोसमी वारे येत असतात. एक अरबी समुद्रावरून नैऋत्य दिशेकडून येणारा वारा. या वाऱ्याबरोबर येणाऱ्या ढगांचा पाऊस बेताचा पडतो. कारण या वाऱ्यास सह्य, सातपुडा, विंध्य आणि विंध्यपर्वताच्या कैमूर, मैकल, अमरकंटक आणि पारसनाथ इत्यादि गंगा-यमुना या नद्यांच्या दक्षिण तीरापर्यंत पसरलेल्या शाखा या सर्वांना ओलांडून यावें लागत असल्यामुळें त्याबरोबर येणाऱ्या ढगांचा पाऊस वाटेंतच बहुतेक संपून जातो. अर्थात् जो थोडाबहुत साठा उरतो त्याचा वर्षाव हिमाळ्याच्या पायथ्याशीं असलेल्या प्रदेशावर होतो. दुसरा मोसमी वारा बंगालच्या उपसागरावरून प्रथम थेट उत्तरेकडे येतो, मग गारो, खाशा, जैंतिआ, इत्यादि आसामांतील पहाडांच्या रांगा आणि

त्यांच्या पलीकडील असलेल्या हिमालयाच्या रांगा आड आल्यामुळें या वाऱ्यांची दिशा बदलून ते वायव्य दिशेनें गंगेच्या मुखांपासून तिच्या उगमाकडे वाहूं लागतात. पाण्याच्या प्रवाहाला एखादा डोंगर किंवा टेकडी अथवा खडक जरी आड आला तरी ज्याप्रमाणें त्या प्रवाहाची दिशा बदलते आणि तो प्रवाह ज्या बाजूनें अडथळा नाहीं त्या बाजूला वळून आड येणाऱ्या जमिनीच्या भागास वळसा घालून पुढील वाट चालूं लागतो, त्याचप्रमाणें वातावरणांत उत्पन्न होणाऱ्या प्रवाहांचें म्हणजे वाऱ्याचेंहि आहे. पाठीमागून येणाऱ्या वाऱ्याचा ( हवेचा ) लोट पुढच्या वाऱ्याला ( हवेला ) पुढें पुढें लोटीत असतो. आणि पुढें तर पर्वत आड आलेला. तेव्हां मागून येणाऱ्या वाऱ्यानें लोटल्यामुळें या पुढच्या वाऱ्याला आजूबाजूनें सरकावयास जागा नसल्यास पर्वतावर चढून मग पलीकडे पर्वत उतरावा लागतो. पण बाजूला सरकण्यास जर अवसर असेल तर पुढचा वारा आपली दिशा बदलून त्या दिशेनें वाहूं लागतो आणि मागून येणारा लोटहि त्याच्या मागूनच जाऊं लागतो. यामुळेंच गंगेच्या मुखापासून गंगेच्या उगमाकडे पण हिमालयाच्या कडे-कडेनेंच हा बंगालच्या उपसागरावरून येणारा मोसमी वारा वाहूं लागतो. तथापि या वाऱ्याबरोबर येणाऱ्या ढगांचा पाऊस गंगेच्या मुखापासूनच पडूं लागत असल्याकारणानें जों जों हे ढग उगमाकडे जाऊं लागतात तों तों त्यापासून पडणाऱ्या पावसाचें प्रमाण कमी कमी होऊं लागतें. इतकें कीं मुखापाशीं वार्षिक पावसाचें मान १०० इंच आहे तर हरिद्वारापाशीं हें मान ३० इंचांच्या आसपास असतें. पुढें हेच वारे पंजाबाकडे जात जात पेशावरपर्यंत जातात आणि पंजाबांत जों जों पश्चिमेकडे जावें तों तों या पावसाचें वार्षिक प्रमाण २० इंचांहूनहि कमी होत जातें ही गोष्ट पंजाबच्या प्रकरणांत आलेलीच आहे.

सुपीकतेच्या दृष्टीनें गंगेच्या मुखांपासून हरिद्वारापर्यंत जे तीन

त्रिभाग पडतात ते पावसाच्या प्रमाणामुळेंच होय. हरिद्वारापासून प्रयागपर्यंतच्या प्रदेशांत म्हणजे पूर्व-विभागांतील प्रदेशांत वर्षास २० ते ४० इंच पाऊस पडतो. प्रयागपासून राजमहालपर्यंतच्या प्रदेशांत म्हणजे मध्य-विभागांतील प्रदेशांत ४० ते ६० इंच पाऊस पडतो. आणि राजमहालपासून बंगालच्या उपसागरापर्यंतच्या भूप्रदेशावर म्हणजे मुख विभागांतील प्रदेशावर ६० ते १०० इंच पाऊस पडतो. पहिल्या भागाची हवा मे, जून आणि जुलै या तीन महिन्यांमध्यें विशेषच ऊष्ण असते. हा सर्व प्रदेश सखल, सपाट आणि कर्कवृत्तास जवळ असल्यामुळें आणि विशेषतः समुद्रापासून पुष्कळ दूर असल्यामुळें या दिवसांत तो विलक्षण तापतो. तसेंच डिसेंबर, जान्युआरी, आणि फेब्रुआरी या महिन्यांत येथें थंडीचा चांगलाच कडका असतो. या भागांतील पावसाचें वार्षिक मान कमी पडत असल्यामुळें पिकांना पाण्याची भासणारी टंचाई कमी करण्याकरितां प्राचीन काळापासून येथील राजांनीं, महाराजांनीं, सम्राटांनीं, आणि लोकांनींहि गंगा-यमुना नद्यांचे कालवे काढले आहेत. गंगा-यमुनां-मधील दुआबांत हजारों विहिरी खणून, तलाव बांधून शेतांना पाण्याचा भरपूर पुरवठा करण्याकरितां त्यांनीं शक्य ते उपाय योजिले. तथापि ब्रिटिश अमदानींत जुने कालवे पुन्हा खणून, दुरुस्त करण्यांत येऊन दुसरे पुष्कळच नवेनवे कालवे खणण्यांत आले. आज ब्रिटिश सरकारनें खणलेले कालवे आणि पूर्वीचे कालवे या दोन्ही कालव्यांमुळें या भागां-तील कांहीं नाहीं तरी ३६,३९,८६७ एकर जमीन पोसली जात आहे. या भागांत कालव्यांच्या ज्या प्रमुख शाखा आहेत त्या पुढील होत:—

( १ ) यमुनेच्या पूर्वतटावरील कालवा. हा हिमालयाच्या पायथ्याशीं यमुनेच्या तीरावर असलेल्या फैझाबाद या शहरापाशीं काढला आहे.


( २ ) आग्रा-कालवा. हा दिल्ली येथें यमुनेपासूनच काढलेला आहे.

( ३ ) गंगेचा हरिद्वारापासून काढलेला कालवा.

( ४ ) नरोरापाशीं गंगेपासून काढलेला कालवा.

( ५ ) शारदा नदीचा कालवा. हिमालयाच्या पायथ्याशीं असलेल्या बर्मदेव ठिकाणीं एक प्रचंड धरण बांधून तेथून हा कालवा लखनौ शहरापर्यंत आणण्यांत आला आहे. हें काम १९२८ सालीं म्हणजे सारें पांच वर्षांपूर्वींच पूर्ण झालें. १, ३, आणि ४ या कालव्यांमुळें गंगा-यमुना यांमधील दुआबास भरपूर पाणी मिळतें. २ ऱ्या कालव्यामुळें यमुनेच्या दक्षिणतीरावरील प्रदेशास पाण्याची सोय झाली आहे आणि ५ व्या कालव्यापासून गंगा आणि शारदा यांमधील प्रदेशास पाणी मिळूं लागलें आहे. हे कालवे म्हणजे मनुष्यांनीं निर्माण केलेल्या नद्याच होत. हे प्रमुख कालवे झाले. यांच्या उपशाखा पुष्कळच आहेत.

मध्य-विभागांत येणाऱ्या प्रदेशांत ४० ते ६० इंच पाऊस पडत असल्यामुळें या भागांतील हवा त्या मानानें दमट आहे. आणि अलाहाबादेहून जों जों पूर्वेकडे जावें तों तों ती जास्त जास्त दमट होत जाते. या भागांतील हवा पहिल्या विभागांतील हवेइतकी विषम नाहीं. समुद्राला हा भाग जवळ येत असल्यामुळें येथें उन्हाळ्यांतील उष्णता त्या मानानें कमी असते आणि थंडीच्या दिवसांत थंडीहि विशेष कडक नसते. या भागांत पावसाची तितकी कमतरता नसल्यामुळें कालव्याची जरूरी भासत नाहीं. उन्हाळ्या दिवसांत तलाव व विहिरी यांपासून मोटांनीं शेतांना, बागांना, आणि मळ्यांना भरपूर पाणी देतां येतें. या भागांत उत्तरेकडील हिमालयाच्या रांगांतून असंख्य नद्या आणि नाले वाहात येतात; यांचाहि पावसाळ्यांत व उन्हाळ्यांत शेतांना उपयोग होतो. गंगेच्या दक्षिणेकडील भागांत शोण आणि इतर नद्यांपासून कालवे काढण्यांत आले आहेत. त्यामुळें त्या बाजूच्या ९,९७,०७० एकर जमिनीस पाणी पुरविण्यांत येतें.



यमुनेच्या तीरावरील एक रम्य स्थान




मथुरेचा पवित्र घाट

तिसरा विभाग म्हणजे गंगा आणि ब्रह्मपुत्रा या नद्यांच्या अनेक मुखांचा प्रदेश. या दोन्हीं नद्यांच्या स्वाभाविकच शाखा आणि उपशाखा झालेल्या असल्यामुळें आणि इतर अनेक लहान लहान नद्या त्यांना मिळत असल्यामुळें कालव्यांचें काम आपोआपच झालें आहे. शिवाय या भागांत ६० ते १०० इंच पाऊस पडतो त्यामुळें पाण्याची कम-तरता केव्हांच भासत नाहीं. यामुळें येथील प्रदेश नेहमींच हिरवा गार असतो. गंगा आणि ब्रह्मपुत्रा यांच्या अनेक मुखांतून जो लोण्याहून मऊ असा गाळ आज हजारों वर्षें वाहात आला आहे त्या गाळाचा प्रदेश उपसागर आणि मुखें यांच्या मध्यभागीं बनलेला आहे. त्यास सुंदरबन म्हणतात. हा भाग दाट जंगलानें व्यापलेला आहे. सुंदरबनाच्या प्रदेशा-मुळें गंगेच्या अनेक मुखांच्या मधला प्रदेश दलदलीचा होतो; पण त्यांतील पाणी उपसून टाकून तेथें भाताचीं शेतें निर्माण करण्यांत येतात. या भागांतूनच कर्कवृत्त जात असल्यामुळें तांदळाच्या पिकाला लागणारी उष्णता येथें जून, जुलै, ऑगष्ट, सप्टेंबर या चार महिन्यांत भरपूर मिळते. समुद्रसान्निध्यामुळें या भागाची हवा सम आणि दमट अशी झाली आहे. पावसाळ्या दिवसांत गंगा आणि ब्रह्मपुत्रा या नद्यांच्या मुखांमधील भागांत जिकडे तिकडे इतकें पाणीच पाणी होतें कीं एका गांवाहून दुसऱ्या गांवीं, नव्हे एका झोपडींतून दुसऱ्या झोपडींत जावयाचें म्हणजे सुद्धां नावांतून जावें लागतें. गंगा आणि ब्रह्मपुत्रा यांच्या मधील उत्तरेकडील हिमालयाच्या पायथ्यापर्यंतच्या भूप्रदेशास बारिंद असें म्हणतात. या भागांत मात्र कांहीं लहान लहान टेकड्या आहेत. त्या नेहमीं हिरव्या गार वृक्षांनीं आच्छादलेल्या असतात.

पावसाच्या कमी जास्त प्रमाणामुळें आणि हवेंतील कमी अधिक उष्णता, दमटपणा अगर कोरडेपणा या गुणधर्मामुळें गंगेच्या खोऱ्यांतील

तीन विभागांत कोणकोणतीं पिकें कोणत्या प्रमाणांत होतात हें पुढील कोष्टकांत दिलें आहे. त्यांवरून तुलना करतां येण्यासारखी आहे. प्रत्येक विभागांत एकाच शेतांतून वर्षाकाठीं दोन तीन वेळां पिकें काढण्यांत येतात, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.



वरील कोष्टकांवरून असें दिसून येईल कीं, गंगेच्या पूर्व-विभागांत पाऊस ४० इंचांच्या आंत पडतो, म्हणून तांदूळ फार थोडा पिकतो. तांदळाची जागा, गहूं, सातू, ज्वारी, बाजरी, मका, हरभरा या धान्यांनीं घेतली आहे. ऊंस बेताचाच पिकतो. कापसाचेंहि तसेंच आहे. कडधान्यें बऱ्याच प्रमाणांत होतात. मात्र गुरांकरितां चारा मुद्दाम पिकवावा लागतो. कारण या भागांत पाऊस बेतांत पडत असल्यामुळें वर्षभर पुरतील अशीं कुरणें या भागांत राखणें शक्य नाहीं. आणि शेतीकरितां आणि दूध-दुभत्याकरितां गुरेंढोरें पोसणें तर अवश्य आहे. म्हणून त्यांच्या अन्नाची तरतूद करून ठेवणें प्राप्त आहे. या भागांत जो तांदूळ पिकतो तो या भागाच्या पूर्वार्धांत; आणि जों जों जास्त पूर्वेला जावें तों तों तांदळाचें प्रमाण वाढत जातें. पश्चिमार्धांत गव्हाचें पीक मुख्य असतें. इतर पिकांमध्यें गळिताचीं धान्यें, खसखस, तंबाखू व चहा हे पदार्थ येतात.

मध्य-विभागांत पावसाचें प्रमाण ६० इंचांपर्यंत वाढतें म्हणून हवाहि जास्त दमट आणि सम असते. तांदळाचें पीक एकंदर पिकांच्या $\frac{1}{3}$ पेक्षां जास्त होतें. गहूं, सातू, ज्वारी, बाजरी, मका, हरभरा यांचें पीक त्या मानानें कमी होत असून गळिताचीं धान्यें, कडधान्यें यांचें पीक वाढत्या प्रमाणांत आहे. गळिताचीं धान्यें या पिकाचा तर स्पष्ट उल्लेख करावा लागत आहे. या भागांत कापूस पिकणें अशक्य आहे, कारण कापसास दमट हवा मानवत नाहीं. मक्याचें पीक मात्र त्याच प्रमाणांत आहे. ऊंस किंचित् कमी प्रमाणांत पिकतो. इतर पिकांमध्यें नीळ, खसखस, ज्यूट, तंबाखू आणि चहा यांचा अंतर्भाव होतो. या भागांतील लोक हस्तनक्षत्राच्या पावसाला फार महत्त्व देतात.

मुखांच्या प्रदेशांत म्हणजे तिसऱ्या विभागांत पावसाचें मान ६० इंचांवरून १५० इंचांपर्यंत वाढतें, निदान १०० इंचांपर्यंत सरासरी धरण्यास मुळींच हरकत नाहीं. पावसाच्या वाढीबरोबर तांदळाचें पीक

सपाटून वाढतें. एकंदर पिकांच्या ३/४ हून जास्त तांदूळ पिकतो. इतर धान्यें आणि कडधान्यें बहुतेक गळाल्यासारखीं झालीं आहेत. ऊंसहि पहिल्या विभागांत जितका पिकतो त्याच्या निम्यावर आला आहे. कापसाऐवजीं ज्यूटानें (सणानें) त्याच्या दुपटीहून जास्त जागा घेतली आहे. सर्व जगांत हें पीक इतरत्र दुसरीकडे कोठें काढीत नाहींत आणि दुसरीकडे तें फारसें होतहि नाहीं. याच्या तंतूपासूनच गोणपाट, ताडपत्र्या आणि पोतीं यांना लागणारें कापड तयार होतें. गळिताचीं धान्यें मध्य-विभागांत ज्या प्रमाणांत पिकतात त्याच प्रमाणांत येथेंहि पिकतात. इतर पिकांत चहा, तंबाखू, कडधान्यें यांचा समावेश होतो.

या तिन्ही विभागांमध्यें भाजीपाला आणि फळफळावळ यांचें पीक केवळ अलोट येतें, येवढेंच नव्हे तर प्रत्येक प्रकारची पालेभाजी हिरवी-गार, रसभरित, कोंवळी अशी असते. फळभाजी भरपूर लांब-रुंद किंवा वाटोळी व लुसलुशीत असून प्रत्येक प्रकारचें फळ दळदार, चवदार आणि रसाळ असें असतें. काशीचीं बोरें सुद्धां लहानशा सफरचंदायेवढीं असतात. आंबे, पेरू, सिताफळ, रामफळ, अननस, पपनसें, अंजीर, संत्रीं, मोसंबीं, लिंबें, केळीं; शिवाय सर्व प्रकारच्या विलायती पाले-भाज्या, फळ-भाज्या, आणि कंदभाज्या यांचीहि लागवड चांगली होत असते. गंगेच्या खोऱ्यांत ज्याप्रमाणें धान्यधुन्य, भाजीपाला, फळफळावळ यांचें विपुल पीक येतं त्याचप्रमाणें अनेक प्रकारच्या फुलझाडांच्या मोठमोठ्या बागा सर्वत्र आहेत. कमल, गुलाब, मोगरा, जाई, जुई, चमेली, चाफा, शेवंती, अनंत, मेंदी इत्यादि देशी सुवासिक फुलें आणि पॅशनफ्लॉवर, पिंक, फ्लॉक्स, व्हर्बीना, डेलिया इत्यादि सर्व प्रकारचीं शोभिवंत विला-यती फुलें यांची लयलूट असते. कनोजच्या मधुर अत्तरांचा सुवास केवळ हिंदवासियांना नव्हे तर पांचहि खंडांतील लोकांना दिलखुश करतो. एक एक तोळा अत्तराची किंमत १०० रुपये असते.

गंगेच्या खोऱ्याचे स्वाभाविक चार भाग पडतात; एक पर्वतप्रदेशाचा आणि तीन सखल प्रदेशाचे. सखल भागांतील एकंदर भौगोलिक परिस्थिति आपण आतांपर्यंत पाहिली. पर्वतप्रदेशाची भौगोलिक परिस्थिति काश्मीर, नेपाळ, भूतान यांच्यासारखीच रम्य आहे. पण आर्य लोकांना वेदकालापासून या पर्वतप्रदेशाबद्दल एक विशेष प्रेम वाटतें, यांत शंका नाहीं. प्राचीन मुनिवर्यांच्या मनाला मोहिनी घालण्याइतकें येथील सृष्टि-सौंदर्य असल्यामुळें जगाला कंटाळलेले सामान्य गृहस्थ, राजेमहाराजे, पंडित, आचार्य इत्यादि नामांकित पुरुष तपश्चर्येकरितां अगर यात्रेकरितां या प्रदेशांतील हरिद्वार, गंगोत्री, जम्नोत्री, केदारनाथ, बद्रिनाथ, नंदादेवी, गुर्लमांधाता, कैलासपति आणि त्याच्या पलीकडे असलेलें हंसयुक्त मानस-सरोवर येथपर्यंत जाऊन आपल्या मनाला शांति देण्याकरितां परमेश्वराच्या ध्यानांत रमत. पुराणांत सांगितलेल्या या गोष्टी आहेत. त्यांत अतिशयोक्ति असेल, नाहीं असें नाहीं. पण आजहि या प्रदेशांत सृष्टिसौंदर्य पाहण्याकरितां जाणारे प्रवासी तेथील अनुपमेय सौंदर्य पाहून थक्क होतात. आणि "आपल्या मनाला एक प्रकारचें पूर्ण समाधान वाटलें.!" अशी आपण होऊन आपल्या प्रवासवृत्ताच्या द्वारें ते पूर्ण कबूली देतात. या भागांत गढवाल नांवाचें एक डोंगरी संस्थान असून कुमाऊन नांवाचा एक डोंगरी प्रांत आहे. या ठिकाणीं चहाची लागवड बऱ्यापैकीं होते. येथील गढवाली व कुमाऊन लोक लढवय्ये म्हणून गुरख्यांसारखेच प्रसिद्ध आहेत. गढवाली हे गुरख्यांप्रमाणें रजपूत आहेत. ब्रिटिशांच्या ताब्यांत हा प्रांत आल्यापासून या भागांत नैनिताल, मसुरी, चक्राट, लांडूर, आल्मोडा व राणीखेत हीं थंड हवेचीं व आजारी सैनिकांना हवा पालटण्याचीं स्थळें म्हणून निर्माण करण्यांत आलीं आहेत. डेराडून येथें एक जंगलखात्याचें शिक्षण देणारी सरकारी पाठशाळा आहे.

गंगेच्या उगमापासून गंगेच्या मुखापर्यंत जो हा एकंदर भूभाग

पसरलेला आहे याचे राजकीय असे तीन प्रांत पाडण्यांत आले आहेत. हे तीन प्रांत आणि हरिद्वारापासून गंगेच्या सखल खोऱ्याचे पडणारे तीन स्वाभाविक विभाग जवळजवळ सारखेच होतात. (१) संयुक्तप्रांत, (२) बिहार, आणि (३) बंगाल हे ते तीन राजकीय विभाग होत.

## संयुक्तप्रांत

संयुक्तप्रांताचें एकंदर क्षेत्रफळ १,१२,१९१ चौरस मैल आहे. यांत गढवाल, रामपूर आणि काशी या संस्थानांचाहि समावेश होतो. या प्रांताची लोकसंख्या ४,९६,१४,८३३ असून प्रान्ताच्या पूर्वभागांत लोकवस्तीचें प्रमाण दर चौरस मैलास ७५० लोक असें पडतें. यांत शेंकडा ८५ लोक हिंदु आहेत. त्यांत आर्यसमाजाचे अनुयायी पुष्कळ. लोकांची भाषा प्राची-हिंदी, प्रतीची-हिंदी आणि बिहारी अशा आहेत. हिंदुस्थानी ही सर्व लोकांची म्हणजे सगळ्यांना कळणारी भाषा होय. या भाषेंत फारशी आणि उर्दु या शब्दांचा भरणा झालेला आहे.

शेती हा लोकांचा मुख्य धंदा. शेंकडा ७५ लोक शेती करतात. या प्रांतांत खनिज संपत्ती फारच बेताची आहे. दगडी कोळसा, तांबें, सोनें, यांच्या खाणी अवाढव्य खर्च करूनहि फायद्याच्या होतील असें वाटत नाहीं. चुनखडीचे व इमारतीचे दगड यांच्या खाणी हिमालय पर्वतांत व इटावा जिल्हा या भागांत चालू आहेत. शेतीबरोबर कापूस पिंजणें, सूत काढणें आणि हातमागावर कापड विणणें हा जोड धंदा बहुतेक खेड्यापाड्यांतून चालतो. काशीचे रेशमी वाण, किनखापी कापड आणि मखमालीवरील जरतारी झिगाचें काम; लखनौ येथील कागद आणि मलमल व रेशमी कापडावरी कशिदा, तसेंच भरतकाम; आग्र्याचे गालीचे, आणि चिटाचें कापड; कानपुरी साखर व कानपुरी लोंकरी कापड, बूट आणि इतर कातडी सामान; मीरत, बरेली, मिरझापूर, अलीगड, आग्रा इत्यादि शहरीं असलेल्या गिरण्यांचें कापड वगैरे वगैरे

पदार्थ देशभर प्रसिद्ध आहेत. कानपूर, अलाहाबाद, मिरझापूर, काशी, लखनौ, मीरत, अलीगड, मथुरा, आग्रा, फरुकाबाद, मुरादाबाद, चंदौशी, बरेली, शहरनपूर, मुझफरनगर, गाझिआबाद, गोरखपूर, हारदोई, गाझीपूर आणि शहाजानपूर या मुख्य मुख्य व्यापारी पेठा लोहमार्गानें अगर जलमार्गानें एकमेकांस जोडलेल्या आहेत. पण खेड्यापाड्यांतून राहणारे लोकच पुष्कळ. शेंकडा ८८ लोक खेड्यांतून राहतात. त्यांच्या झोपड्या चिखल, बांबू, तट्टये किंवा कच्च्या विटा यांच्या असतात.

## बिहार

बिहार आणि ओरिसा असा जरी एक राजकीय प्रांत बनविलेला असला तरी ओरिसा हा महानदी कांठचा प्रदेश होय. केवळ बिहार प्रांताचें क्षेत्रफळ ६९,१६४ चौरस मैल असून लोकसंख्या सुमारें २,५७,२७,५०० आहे. तथापि शहरें अशीं काय तीं चार पांचच आहेत. पाटणा ( पाटलिपुत्र ) ही राजधानी असून तिची लोकसंख्या दरवर्षी सारखी वाढत आहे. दुसरीं शहरें म्हणजे गया, भागलपूर, दरभंगा, मुजफरपूर आणि मोंगीर एवढींच होत.


याहि भागांत शेती हाच मुख्य धंदा आहे. कृत्रिम निळा रंग होऊं लागल्यामुळें मात्र येथील निळीचा धंदा अगदींच कमी होत आला आहे. मोंगीर येथें सिगारेट्स् तयार करण्याचा भला मोठा कारखाना नुकताच काढण्यांत आला आहे. पण पाटणा येथील अफूचा सरकारी कारखाना बंद करावा लागला; कारण चीनमध्यें पूर्वींप्रमाणें अफू विकली जात नाहीं. तथापि पाटणा, गया, शहाबाद, आणि चंपारण्य या भागांतील कालवे वाढवून तेथें उसाची लागवड बऱ्याच मोठ्या प्रमाणांत करण्यांत येत आहे. आणि म्हणूनच साखरेचे कारखानेहि नवे नवे निघूं लागले आहेत. हजारीबाग येथें दगडी कोळसा आणि अभ्रक यांच्याहि मोठमोठ्या खाणी सांपडल्या आहेत. पारसनाथाच्या डोंगरावर

जें जंगल आहे त्या जंगलांतून वर्षाकाठीं दहा कोटि रुपयांच्या किंमतीची लाख परदेशीं जाते. बिहारचा दक्षिण भाग म्हणजे निरनिराळ्या 'कारखान्यांचें आगर' होत आहे. आणि बिहाराच्या उत्तर भागाला 'भरतखंडाचें उद्यान' म्हणतात. कारण त्या भागांत असंख्य फळबागा व फुलबागा आहेत.

बिहारी लोक बिहारी भाषा बोलतात. हे लोक कष्टाळु आहेत म्हणून कामधंद्याला ते कधींहि कंटाळत नाहींत. अंगापिंडानेंहि ते भरीव असतात. तसेंच ते सदा निरोगीहि असतात. हे लोक आपापल्या शेतांतून एक दोन एक दोन झोंपड्या बांधून राहतात, त्यामुळें यांच्या झोंपड्या एके ठिकाणीं नसून त्या देशभर विखुरलेल्या आहेत. या भागांत लोकवस्ती इतकी वाढली आहे कीं देश इतका संपन्न असूनहि यांना पोटासाठीं जोड धंदा मिळविण्याकरितां आसामांतील चहाच्या मळ्यांकडे, कलकत्त्याच्या गोद्या किंवा गिरण्यांकडे, आपल्या शेतावर काम नसतें तेव्हां वर्षाकांठीं चारपांच महिने तरी धांव घ्यावी लागते. कांहीं लोक तर कायमचेच आसामांत जाऊन राहिले आहेत.

## बंगाल

बंगाल-प्रांताची राज्यकारभाराकरितां १९०५ सालीं फाळणी करण्यांत आली होती. पण त्यामुळें बंगाली लोकांत फार असंतोष माजला आणि हिंदुस्थानांतहि सार्वत्रिक अशी फार जोरांत चळवळ झाल्यामुळें १९१२ सालीं एप्रिलच्या १९ व्या तारखेस ती रद्द करण्यांत आली. या प्रांताचें क्षेत्रफळ ८२,२७७ चौरस मैल असून लोकसंख्या ४,७५,९२,४६० आहे. बंगालमध्यें शेंकडा ५४ मुसलमान आहेत. बंगाल प्रांतावर मुसलमानी राज्य सतत पांचशें वर्षें कायम राहिल्यामुळें बऱ्याच स्थानिक लोकांनीं हा धर्म पत्करिला. लोकांची मुख्य भाषा बंगाली असून या भाषेंत पुष्कळच पहिल्या प्रतीचें वाङ्मय निर्माण



सुंदरवनांतील शेतवाडी



बंगाली बाबू



बंगाली–शेतकरी

झालें आहे. येथील लोकांचेहि मुख्य धंदे मजूरी आणि शेती हेच होत. बंगाल म्हणजे तांदूळ आणि ताग (ज्यूट) यांचा प्रांत. हावरा आणि हुगळी या भागांत तागाच्या गिरण्या पुष्कळ आहेत. कांहीं ठिकाणीं टस्सर नांवाचें रेशीमहि तयार होतें. ऊंस आणि खारकांचीं झाडें या दोहोंपासून साखर तयार करतात. दार्जिलिंगच्या भागांत म्हणजे भूतानच्या दक्षिणेस हिमालयाच्या उतारावर चहाचे पुष्कळच मळे आहेत. दगडी कोळसा, लोखंड, मँगनीज आणि अभ्रक यांच्या खाणी पश्चिमभागीं फार आहेत. लाख आणि टस्सर या वस्तूंचा व्यापारहि मोठ्या प्रमाणावर चालतो. सुंदरबनमधील जंगलांतून इमारतींकरितां मुबलक लांकूड मिळतें.

शेंकडा ९३ लोक शेतांतून राहतात. बंगाल्यांत शहरें कमीच, पण खेडींहि कमीच. प्रत्येक शेतकरी आपापल्या शेतावर टुमदार झोंपडी बांधून राहतो. मातीची कृत्रिम टेकडी करून तीवर त्याला आपली झोंपडी बांधावी लागते. एकंदर सहा सातच शहरें, शहरें या नांवाला शोभण्यासारखीं आहेत. कलकत्ता शहराचें राजकीय वैभव जरी दिल्लीनें हिरावून नेलें असलें तरी त्याचें व्यापारी महत्त्व पुष्कळच आहे. गंगेच्या संपन्न अशा सर्व खोऱ्याचा व्यापार कलकत्ता शहरांतूनच परदेशांशीं चालतो. कलकत्ता हें अखिल हिंदुस्थानांत पहिलें शहर आहे. पण ही सर्व वाढ गेल्या शंभर वर्षांतील होय. हावरा हें सुंदर उपनगर नदीपलीकडे आहे. चित्तगांग हें पूर्वबंगालचें बंदर आहे. पण कलकत्त्यापुढें तें फारच फिकें पडतें. टिटाघर येथें कागद तयार होतो. राणीगंज येथें कोळशाच्या खाणी आहेत. दुसरीं मोठीं शहरें म्हणजे डाक्का, मुरशिदाबाद, चिनसुरा, मिदनापूर आणि नारायणगंज हीं होत. कुचबिहार संस्थानाचा बंगाल प्रान्तांतच समावेश होतो. दिल्लीपासून कलकत्त्यापर्यंत दळणवळणाची भरपूर सोय आहे. गंगेच्या प्रवाहांतून बोटी, नांवा, जहाजें यांच्या सहाय्यानें दिल्लीपर्यंत व्यापार चालतो. शिवाय नद्यांना समांतर असे आडवे उभे पुष्कळच

लोहमार्ग सर्वत्र नेण्यांत आले आहेत. 'दि ईस्ट इंडियन रेल्वे,' 'दि ईस्टर्न बंगाल रेल्वे,' 'दि बेंगाल नागपूर रेल्वे' या मुख्य कंपन्या होत. किरकोळ लोहमार्ग पुष्कळच आहेत. मात्र या भागांतील नद्यांचीं पात्रें अतिशयच रुंद असल्यामुळें त्यांवरून प्रचंड पूल बांधावे लागले आहेत. या लोहमार्गांनीं कलकत्त्याहून नागपूर ते मुंबई, जबलपूर ते मुंबई, आणि वॉल्टेअर ते मद्रास असें दळणवळण सुरू असतें. शिवाय कलकत्त्याची पुष्कळच व्यापारी देवघेव परदेशांशीं अहोरात्र सुरू असते. कलकत्ता हें समुद्रकिनाऱ्यापासून ८० मैल आंत असलेलें गंगानदीच्या हुगळी या फाट्यावरील बंदर होय. या ठिकाणीं नदीचें पात्र पुष्कळ रुंद व खोल असल्यामुळें बोटींना येण्याजाण्याला बिलकूल त्रास होत नाहीं. बोटींना जातां यावें म्हणून नदीवरील अजस्र पूल केव्हांहि काढतां घालतां येतो.

बंगाली लोक दिसावयास फारसे सुरेख नसतात. वर्णानें बहुतेक लोक काळसरच असतात. पायघोळ धोतर, अंगांत पातळ सदरा आणि खांद्यावर उपरणें. येवढाच यांचा पोषाख असतो. डोक्याला टोपी घालण्याची यांच्यांत पद्धत नाहीं. डोक्यावर केस राखलेले असून ते तेलानें माखलेले असतात. यानें उन्हाचा त्रास होत नाहीं असा त्यांचा अनुभव आहे. बंगाली बाया एकच लुगडें अंगाभोवतीं गुंडाळतात. चोळी नसतेच. शहरांतले पुरुष व स्त्रिया मात्र जास्त नीटनेटका पोषाख करतात. या लोकांचें मुख्य खाणें म्हणजे भात व मासळी. मासळीशिवाय बंगाली मनुष्याचें सहसा जेवणच होत नाहीं.

## गंगेच्या खोऱ्याचें वैभव

मनसोक्त चरावयाला कुरणें, रानें आणि वनें असल्यामुळें गंगेच्या खोऱ्यामध्यें जिकडे तिकडे गाई, म्हशी, बैल आणि रेडे यांचीं खिल्लारें खुशाल हिंडत असतात. चारा, सरकी, पेंड इत्यादि पदार्थांची वाण नसल्यामुळें प्रत्येकाच्या घरींदारीं दुभतीं जनावरें असावयाचींच. दुष्काळ हा

येथील गुरांनासुद्धां माहीत नसतो. गुरें वळविण्याचें किंवा त्यांना पाण्या-वर न्यावयाचें काम बालगोपाल द्वापारयुगीं श्रीकृष्णानें घालून दिलेल्या धड्याप्रमाणें आतांहि करीत आहेत. गोकुळ-वृंदावन, मथुरा, यमुनेचा डोह इत्यादि स्थळें कृष्णलीलेची आठवण करून देतातच. हत्तीसारख्या दुभत्या गाई-म्हशींना कमतरता नसल्यामुळें दूध, दही, लोणी, तूप या पदार्थांची सगळ्यांच्याचकडे रेलचेल असते. दूध-हलवा, दूध-पाक, आटीव दूध, बासुंदी, खवा, पेढे, बर्फी आणि सर्व प्रकारची मिठाई इतकी अस्सल, इतकी रुचकर आणि इतकी स्वस्त इतरत्र कोठेंहि मिळावयाची नाहीं. प्रत्येक पदार्थ नामी असतो. शहरामध्येंसुद्धां जो तो सांज-सकाळ पुरभय्याच्या दुकानीं जाऊन आटीव, मसालेदार दूध-लोटा पीत असतो.

गोपालकृष्णाचे उत्सव आणि गोपालकाल्याचा समारंभ येथील लोक मोठ्या भक्तिभावानें आणि प्रेमानें लहानापासून थोरापर्यंत अद्याप करतात. गायीबैलांच्या अंगावर जरतारी झूल टाकून आणि त्यांना रंगांनीं नटवून फुलांनीं शृंगारून शहरभर गाजत वाजत त्यांच्या मिरवणुकी काढतात आणि हें सर्व मोठ्या हौसेनें. श्रीरामाचेहि भक्त पुष्कळच आहेत. रामकृष्णांची ही जन्मभूमी म्हणून सर्वत्र गोकुळाष्टमी, रामलीला, रामनवमी इत्यादि उत्सव, तसेंच बंगाल्यांत दुर्गादेवीचें नवरात्र आणि कालिमातेचा उत्सव हीं मोठ्या थाटानें साजरीं केलीं जातात. एकंदरींत हे लोक जास्त उत्सवप्रिय आहेत. येथील लोकांचा दुसरा शोक म्हणजे फुलांच्या माळांचा. हातांत, गळ्यांत आणि कानांवरूनसुद्धां माळा घालून हिंडण्याची यांना फार आवड असते. बायका फुलवेण्यांनीं नेहमींच शृंगारलेल्या असतात. आपल्याकडे लग्नमुंजींतून जितका फुलांचा उपयोग आपण करतों तितका येथें रोज करणारे कांहीं कांहीं हौशी लोक आहेत!

गंगेचें खोरें म्हणजे पवित्र स्थलांचे तें एक माहेरघरच आहे. पुरातन कालापासून हीं क्षेत्रें प्रसिद्ध आहेत. काशी, गया, प्रयाग,

*त्रिवेणीसंगम*, मथुरा, वृंदावन, अयोध्या, हरिद्वार, गंगोत्री, जम्नोत्री, केदारेश्वर, बदरीनारायण, कैलासपति इत्यादि कितीतरी क्षेत्रांच्या ठिकाणीं हिंदुस्थानांतील अनेक प्रांतांतील भाविक लोक मरणापूर्वी एकदां तरी जाऊन येतात. हिमालयांतील कैलासपतीपर्यंत जातां आलें नाहीं तर नाहीं; निदान काशीविश्वेश्वराचें दर्शन तरी झाल्याशिवाय मरण येऊं नये, नाहीं तर जन्माचें सार्थकच झालें नाहीं असें त्यांना वाटतें.

ज्या बौद्धधर्माचा प्रसार उत्तरेकडे तिबेट, चीन, जपान आणि दक्षिणेकडे सिलोन, जावा, सुमात्रा आणि पूर्वेकडे ब्रह्मदेश, सयाम, इंडोचायना येथपर्यंत होऊं शकला त्या बौद्धधर्माचे आद्य संस्थापक गौतमबुद्ध मगध देशांतच उदयास आले. बौद्धधर्माचा प्रसार मगध देशांत एका काळीं इतका झाला होता कीं, त्या वेळीं देशभर जिकडे तिकडे मठांची म्हणजे विहारांची अगदीं गर्दी उडाली होती. म्हणूनच मगध-देशाला विहार हें सार्थ नांव प्राप्त झालें. बुद्धगया हें पवित्र स्थल मगध देशांतच आहे. तेथीलें वटवृक्ष ( ज्ञानवृक्ष ) अद्याप पूज्य मानतात. पाटलिपुत्र ( पाटणा ) ही त्या वेळीं हल्लींप्रमाणेंच राजधानी होती.

गंगेच्या सुवर्णमय खोऱ्यांत प्राचीन काळापासून अनेक मोठमोठालीं साम्राज्यें होऊन गेलीं. अयोध्येच्या इक्ष्वाकु–(रघु–) कुलांतील श्रीरामचंद्र यांची कीर्ति अद्याप साऱ्या भरतखंडांत दुमदुमत आहे. हस्तिनापुरचे कौरव-पांडव, मगधदेशाचे सम्राट् अशोक, सम्राट् चंद्रगुप्त, कनोजचा पृथ्वीराज चव्हाण, दिल्लीचा सम्राट् अकबर आणि बादशहा अवरंगजेब यांचीं साम्राज्यें आज मात्र स्मृतिशेषच आहेत. सध्यां ब्रिटिशांचें साम्राज्य गंगेच्या खोऱ्यावर आज जवळ जवळ १०० वर्षें चालू आहे.

साम्राज्यें जरी नष्ट झालीं तरी त्यांचे अवशेष या नाहीं त्या स्वरूपांत अद्याप आहेत. श्रीराम, श्रीकृष्ण, श्रीगौतमबुद्ध अशा थोर विभूतींची ही जन्मभूमि असल्यामुळें अद्याप सर्व भरतखंडांतील हिंदु लोक त्यांना

पूज्य मानतात. पूर्व काळांतील उंच, भव्य आणि सुंदर इमारती, देवालयें, घांट, मनोरे, जयस्तंभ आणि शिलालेख सर्वत्र आढळून येतात, व तीं पाहून मनाला अचंबा वाटतो. मथुरा, वृंदावन, काशी, प्रयाग येथील देवालयें, बुद्धगया येथील वटवृक्ष, पारसनाथावरील जैन मंदिरें, जगाचा अलंकार असा आग्र्याचा ताजमहाल, फत्तेपूर सिक्री येथील अकबर बादशहानें बांधलेल्या प्रेक्षणीय इमारती, दिल्ली येथील प्राचीन हिंदु राजांनीं उभारलेला आणि ' मी उभा आहें तोंपर्यंत हिंदुधर्म चिरकाल राहील ' अशी जगाला ग्वाही देणारा लोहस्तंभ, अशोक सम्राटानें उभारलेला अखंड दगडाचा, पण बौद्ध धर्माला अनुसरून प्रजेला समान हक्क देणारा अज्ञा-स्तंभ आणि या दोन्ही धर्मांना आपल्या उंचीनें जणूं कमीपणा आणणारा कुतुबमिनार हीं सर्व एकाच ठिकाणीं पाहून मनाला मौज वाटते ! प्राचीन काळापासून काशी ही पंडितांची नगरी म्हणून प्रख्यात होती. अर्वाचीन काळींहि काशीची तीच कीर्ति अर्वाचीन पद्धतीनें कायम राखण्यांत आली आहे. पंडित मदनमोहन मालवीय यांनीं स्थापिलेलें हिंदु विद्यापीठ आज सर्व राष्ट्राला पूज्य वाटत आहे. मगध देशांत नलंद नांवाचें एक प्रचंड विद्यापीठ फार पुरातन काळीं प्रसिद्ध होतें. या विद्यापीठांत अभ्यास करण्याकरितां चीन, जपान, सयाम, ब्रह्मदेश, सीलोन इत्यादि पर-देशांतूनहि विद्यार्थी येत. हल्लीं गंगा-यमुना यांच्या खोऱ्यांत दिल्ली, आग्रा, अलीगड, अलाहाबाद, काशी, लखनौ, पाटणा, कलकत्ता, डाक्का अशीं नऊ ठिकाणचीं विद्यापीठें विद्यादानाचें काम करीत आहेत ! आणि आजहि डॉ. टागोर, सर प्रफुल्लचंद्र रॉय, आणि सर जगदीश चंद्र बोस यांची कीर्ति दिगंत पसरली आहेच.

# ११

## विंध्योत्तर पठारें अथवा मध्य हिंदुस्थान

हिंदुकुश, कारांकोरम आणि हिमालय या उत्तरेकडील पर्वतांच्या उत्तुंग रांगा; सुलेमान, किरथर अथवा हाला या पश्चिमेकडील पर्वतांच्या रांगा; आणि पटकोई, नाग, लुशै इत्यादि पूर्वेकडील रांगा; तसेंच या रांगांनीं वेष्टिलेलीं पंचनद, सिंधु आणि गंगा-यमुना या नद्यांचीं खोरीं आणि राजपुतान्यांतील वालुकामय सखल प्रदेश व अरवलीचा पहाडी प्रदेश इत्यादि उत्तर-भरतखंडांत येणाऱ्या भूप्रदेशासंबंधीं बरीच माहिती आतांपर्यंत देण्यांत आली. या एवढ्या भूप्रदेशास मुख्य भूखंडास म्हणजे आशियाखंडास जोडलेला प्रदेश म्हणतात. या भागापैकीं सिंधु आणि गंगा यांचीं खोरीं व राजपुतान्याचा वालुकामय प्रदेश हे भूभाग इतके सपाट आणि सखल आहेत कीं, जर समुद्राचें पाणी आहे त्याहून १००० फूट उंच वाढलें तर हा सर्व भाग समुद्राच्या तळाशीं जाईल आणि सर्व पर्वतांच्या रांगांना समुद्रस्नान घडेल. एके काळीं अशी स्थिति होती असें भूगर्भशास्त्रज्ञ सांगतातहि. एवढेंच नव्हे तर हिमालय, काराकोरम इत्यादि सर्वांत उत्तुंग म्हणून आज जगांत प्रौढी मिरविणारे नगाधिराज हे समुद्राच्या तळाशींच लोळत होते असेंहि हे शास्त्रज्ञ ठासून सांगतात, आणि याचा पुरावा म्हणून हिमालयाच्या उत्तुंग रांगांवर समुद्राच्या तळाशीं आढळणाऱ्या शिंपा, माशांचे सांगाडे, वाळूचे दगड इत्यादि ज्या वस्तु आढळतात, त्या वस्तु पुढें आणतात. त्यामुळें त्यांचें म्हणणें एका अर्थी


मान्य करावें लागतें. मात्र हा पुरावा सर्वस्वीं खराच आहे असें मान्य करण्याचें कारण नाहीं. कारण आज पृथ्वी जितकी थंड आहे, तितकी फार फार प्राचीन काळीं नव्हती. म्हणून त्या वेळीं ध्रुवाशेजारीं सुद्धां आपले पूर्वज सुखानें राहात होते. म्हणजे आज ध्रुवप्रदेश जसा हिमाच्छादित आहे तसा तो त्या वेळीं नव्हता. जी ध्रुवप्रदेशाची स्थिति तीच १६,००० फुटांहून उंच असलेल्या उष्ण कटिबंधांतील भूप्रदेशाची स्थिति असते; म्हणून आज हिमालय जसा हिमाच्छादित आहे तसा त्या वेळीं तो होता असें मानतां येत नाहीं. याच हिमालयावरील दोन रांगांमधील सखल भागांत बरींच सरोवरें असावींत. पुढें हीं सरोवरें आटून गेल्या कारणानें त्यांत वावरणारे मासे मृत्युमुखीं पडून त्यांचे सांगाडे आज उपलब्ध होत असावेत. तसेंच सरोवरें आटत गेल्याकारणानें तेथें वालुकामय प्रदेश निर्माण झाले असावेत. भूकंपामुळें हिमालयाच्या उंचीमध्यें आणि जी एकंदर मूळची घडण तिच्यामध्यें पुष्कळच फरक पडणें शक्य आहे, नाहीं असें नाहीं. पण आजचा सर्वच हिमालय समुद्राच्या तळाशींच होता असें ठाम सांगणें धाष्ट्र्याचें आहे. दोन्ही गोष्टींचा संभव आहे एवढेंच म्हणावें हें बरें. असो.

अगदीं आरंभीं जे भूप्रदेश सांगितले आहेत, त्यांचा समावेश मुख्य भूखंडांत होत असून या प्रदेशांच्या दक्षिणेस असलेल्या भूप्रदेशांना खरें 'भारतीय द्वीपकल्प' असें संबोधण्याची पद्धत आहे. तथापि उत्तर-भरतखंड म्हणून जेवढ्या भूभागाला म्हणतात, तेवढ्या भूभागांत विंध्य-पर्वताच्या उत्तरेस असलेल्या सर्व पठारांचा समावेश करतात. या पठारांत माळवा, बुंदेलखंड, बाघेलखंड आणि छोटा-नागपूर हीं पठारें मुख्य होत. या प्रकरणांत यांच्याच संबंधीं भौगोलिक माहिती देण्यांत येईल.

विंध्यपर्वताची मुख्य रांग आणि त्याच्या कैमूर-डोंगर, मैकल-पहाड, अमरकंटक-पर्वत आणि पारसनाथाच्या टेकड्या अशा उपरांगा पश्चिमेकडून

पूर्वेकडे उत्तर अक्षवृत्त २३° आणि उत्तर अक्षवृत्त २३॥° म्हणजे कर्कवृत्त यांमध्यें पसरलेल्या आहेत. विंध्यपर्वतासंबंधीं एक पौराणिक गोष्ट आहे ती अशी:—मुख्य विंध्यपर्वताची उंची कोठेंहि २००० फुटां-हून जास्त नाहीं, त्यामुळें त्याला उत्तरेकडील हिमालय, मेरु इत्यादि पर्वतांचा अतिशय हेवा वाटूं लागला आणि त्यांना उंचींत मागें टाकण्या-करितां म्हणूनच तो उंच उंच होऊं लागला. यामुळें स्वर्गांतील देवांची गाळण उडाली. ते थेट विंध्यपर्वताचा गुरु अगस्तिमुनि यांकडे गेले. आणि " विंध्य जर असाच उंच उंच होऊं लागला तर स्वर्गच्छेद होण्यास अवधि लागणार नाहीं. तरी हें अरिष्ट आपण कांहींहि करून टाळावें. " अशी त्यांनीं नम्रपणें अगस्तीची प्रार्थना केली. तेव्हां देवांना अभय देऊन हे मुनिवर्य विंध्यापुढें जाऊन उभे राहिले. आपल्या गुरूंना आपल्यापुढें उभे पाहून विंध्य एकदम विनम्र झाला व " गुरूंची आज्ञा काय आहे ? " असा त्यानें वांकूनच प्रश्न विचारला. अगस्तिमुनि म्हणाले, " मला दक्षिणापथाकडे जावयाचें आहे. तरी मी परत येईपर्यंत तूं असाच नम्र राहा. " पुढें अगस्तिमुनि दक्षिणेकडे जे गेले ते परत आलेच नाहींत. ते तिकडेच दिवंगत होऊन दक्षिणेकडील गगनमंडळांत मृग-राशींतील व्याधताऱ्याच्या थेट दक्षिणेस विराजमान होऊन आपलें तेज अखंड ढाळीत आहेत. या कथेंत उत्तरेकडील आर्य लोकांनीं दक्षिणा-पथांत म्हणजे दक्षिण भरतखंडांत केलेल्या प्रथम प्रवेशाबद्दलची माहिती मोठ्या मनोरंजक तऱ्हेनें आणि मार्मिकपणानें सांगितली आहे. विंध्य-पर्वतावर त्या वेळीं पुष्कळ जंगल होतें म्हणून तो पुष्कळ दिवस दुर्गम वाटत असे. आणि त्याच्या दक्षिणेस द्राविडी लोकांचीं राज्यें असल्यामुळें तेहि आर्यलोकांना तिकडे प्रवेश करूं देत नसत. पण पुढें अगस्तिमुनींनीं या भागांत साहस करून प्रवेश मिळविला आणि आर्यलोकांच्या वसाहती स्थापिल्या, हें या कथेंतील ऐतिहासिक आणि भौगोलिक सत्य होय.

## विंध्योत्तर पठारांतील वन्य लोक.



गोंड



भिल्ल

कोळशाच्या खाणींतील बिहारी



कामकरी



ओझेवाली



टाटानगर–पोलादी कारखाना, देखावा नं. १



टाटानगर–पोलादी कारखाना, देखावा नं. २

या सर्व पठारांची जास्तींत जास्त उंची २००० फूट आहे. पारस-नाथाचीं कांहीं शिखरें मात्र सुमारें ५००० फूट उंचीचीं आहेत. माळ-व्याचें पठार पश्चिमेकडे बनास नदीपर्यंत आणि उत्तरेकडे यमुनेच्या खोऱ्यापर्यंत उतरत जातें. बुंदेलखंड आणि बाघेलखंड हीं पठारें उत्तरे-कडेच गंगा-यमुना नद्यांच्या खोऱ्यांपर्यंत उतरत जातात. बाघेलखंडाचें पठार मात्र कैमूर डोंगरांच्या ओळींमुळें दुभंगलें आहे. छोटा-नागपूरच्या पठाराचींहि तीन प्रमुख उप-पठारें आणि बरींच लहान लहान उप-पठारें झालेलीं आहेत. कारण अमरकंटकाच्या बऱ्याच तुटक तुटक रांगा पूर्वेकडे राजमहालपर्यंत गेलेल्या आहेत. छोटा-नागपूरचें पठार उत्तर, दक्षिण आणि पूर्व अशा तीन्ही दिशांनां उतरत गेलेलें असून पूर्वेचा उतार बंगाल प्रांतांतून वाहणाऱ्या गंगानदीच्या खोऱ्यापर्यंत पसरलेला आहे. एकंदरींत विंध्यपर्वताची मुख्य रांग आणि तिच्याच ज्या उप-रांगा आहेत त्या सर्वच उत्तरेकडे गंगा-यमुना यांच्या कांठच्या सपाट प्रदेशापर्यंत क्रमवार उतरत जातात आणि त्या उतारावरीलच हीं पठारें होत. या पठारांतून वाहणाऱ्या सर्व नद्या विंध्यपर्वतांत अगर त्याच्या उप-रांगांत उगम पावतात. पैकीं चंबळा, क्षिप्रा, कालीसिंधू, परवणा आणि पार्वती या नद्या माळव्याच्या पठारांतून प्रथम वायव्य दिशेनें वाहात जाऊन मग माळव्याचें पठार व अरवलीचें पठार यांमधील खोऱ्यांत चंबळेस मिळतात. पुढें चंबळा इशान्येकडे वाहात जाऊन यमुनेस मिळते. सिंध नदी प्रथमपासूनच ईशान्य दिशेनें ग्वाल्हेरच्या सपाट प्रदेशांतून वाहात जाऊन यमुनेसच स्वतंत्रपणें पण चंबळेच्या शेजारींच थोडीशी पूर्वेला मिळते. बटवा आणि केण याहि बुंदेलखंडांतून ईशान्येकडे वाहात जाऊन यमुनेस मिळतात. कैमूर पर्वताच्या एका अंगानें तान्सा आणि एका अंगानें शोणभद्र अशा दोन नद्या बाघेल-खंडांतून ईशान्य दिशेनेंच वाहात जाऊन गंगेला मिळतात. अमरकंटकांत उगम पावलेल्या आणि छोटा-नागपुराच्या पठारांतून वाहात जाणाऱ्या

अनेक लहान लहान नद्या शोणभद्रास मिळतात; आणि पारसनाथाच्या डोंगराळ भागांत उगम पावलेल्या व छोटा-नागपूरच्या पूर्वपठारांतून वाहात जाणाऱ्या बरखड, दामोदर, रूपनारायण आणि कुसई या नद्या पूर्वेकडे वाहात जाऊन गंगेस मिळतात. या सर्व नद्यांचीं खोरीं, तसेंच डोंगर व अनेक टेकड्या यांमधील सखल प्रदेश सुपीक आहेत. या सर्व पठारांवर पाऊसहि बरा पडतो. मात्र दक्षिणेकडून उत्तरेकडे अगर पश्चिमेकडून पूर्वेकडे जों जों जावें तों तों पावसाचें मान वाढत जातें. नैऋत्येकडून जे पावसाळी वारे येतात, त्यांचा पाऊस सह्य, सातपुडा आणि विंध्य व त्यांच्या अनेक रांगा यांच्या वाऱ्याच्या तोंडाकडील उतारांवरच पडून जात असल्यामुळें उलट्या बाजूच्या उतारावर पावसाचें मान कमी होतें. म्हणून या पठारांच्या दक्षिणेकडील प्रथमार्धावर ३० ते ४० इंचांपर्यंतच पाऊस पडतो. पुढें पुढें या वाऱ्यांपासून पडणारा पाऊस कमी कमी व्हावयास पाहिजे आणि तो तसा होतोहि. पण आग्नेयेकडून गंगेच्या मुखांवरून येणारे जे वारे गंगेच्या उगमाकडे लोटले जातात त्यांचा पाऊस या पठारांच्या उत्तरेकडील उत्तरार्धावर पडत असल्यामुळें पावसाचें मान विंध्यपर्वताच्या माथ्यापासून गंगा-यमुना यांच्या खोऱ्याकडे वाढत जातें. म्हणजे उत्तरार्धावर ५० ते ५५ इंचांपर्यंत दरवर्षी पाऊस पडतो. त्यांतल्यात्यांत उत्तरार्धाच्या पूर्वभागांत म्हणजे पारसनाथ ते राजमहाल या भागांत सर्वांत जास्त पाऊस पडतो. येथील वार्षिक पावसाचें प्रमाण ६० इंचांवर आहे. या पठारांच्या दक्षिणेकडील उंच प्रदेशांवर जरी पाऊस कमी पडत असला तरी तेथील हवा सम आहे. उत्तरेकडील उतरत्या प्रदेशांची हवा उन्हाळ्यांत उष्ण व दमट आणि हिंवाळ्यांत थंड व कोरडी अशी विषम असते. सर्व डोंगराळ भागांत जंगल वाढलेलें आहे. कांहीं कांहीं उतारावर उंच गवत व कांटेरी झाडेंझुडपें माजलेलीं असतात. जंगलांत साग, शिसव, तेंडू, ऐन, चंदन, मोह इत्यादि इमारतींच्या

उपयोगीं पडणारीं झाडें वाढतात; आणि माळरानांत खैर, बाभूळ, पळस, धामण, बोर इत्यादि झाडें आढळतात. इमारतीचें लांकूड, जळाऊ लांकूड, लाख, मोहाचीं फुलें आणि गवत यांपासून पुष्कळ उत्पन्न मिळतें. जंगलांत राहणाऱ्या भिल्ल, संताळ, गोंड इत्यादि मूळ वन्य-जातीय लोकांचा उदरनिर्वाह यांवरच होतो. हे लोक वनांत भटकणाऱ्या किंवा खोल खोल दऱ्यांत वस्ती करून राहणाऱ्या वाघ, चित्ते, काळवीट, हरिण इत्यादि धांवत्या प्राण्यांची व सर्व उडत्या पक्षांची आपल्या तिर-कमठ्यांनीं अचूक शिकार करण्यांत अत्यंत निष्णात आहेत.

सुपीक खोऱ्यांतील जमीन उत्तम प्रकारची आहे. ती कांहीं ठिकाणीं तांबडी आहे तर कांहीं ठिकाणीं एकजात काळीभोर आहे. बाघेलखंडां-तील प्रदेश कैमूर-पर्वतामुळें आणि छोटा-नागपुरांतील प्रदेश पारसनाथामुळें फारच रम्य झाले आहेत. पावसाच्या प्रमाणाप्रमाणें या जमिनींतून ज्वारी, बाजरी, मका, गहूं, सातू, तांदूळ हीं धान्यें, हरभरा, तूर, मूग, मटकी वगैरे कडधान्यें, सर्व प्रकारचीं गळिताचीं धान्यें आणि नीळ, कापूस, खसखस ( अफू ), ताग इत्यादि दुसरीं पिकें येथील शेतकरी काढूं शकतात. कांहीं कांहीं भागांतून ऊंस, तंबाखू, भुइमूग हींहि पिकें होतात. माळव्यांत कापूस, गहूं व बुंदेलखंड व बाघेलखंड यांतील सखल प्रदेशांत गहूं, ताग व नीळ; आणि छोटा-नागपूरच्या सखल प्रदेशांत तांदूळ, ताग व ऊंस हीं पिकें मुख्य होत. सर्वच पठारांतून फळबागा आहेत. रामफळ, सिताफळ, हनुमानफळ, नारिंग, अंजीर, डाळिंब, केळें, पेरू, चिकू इत्यादि फळांचीं झाडें चांगलीं होतातच. शिवाय, कवठ, आवळी, जांभूळ, चिंच हीं झाडेंहि बांधांवरून असतात. आंबरायाहि पुष्कळ ठिकाणीं आहेत. कांहीं भागांत मोठमोठीं कुरणें असून गुरांना मुबलक चारा मिळतो व गुरांची पैदास चांगली होते. माळवी, गोंडी, नेमाडी वगैरे खिल्लारी बैलांच्या जाती उत्तम आहेत. गुरांचे बाजारहि पुष्कळ ठिकाणीं भरतात.

डोंगराळ भागांत आणि पर्वतांच्या उतारावर खनिज संपत्तिहि बरीच सांपडते. माळवा व ग्वाल्हेर यांतील कांहीं प्रदेशांत अभ्रक, जस्त, लोखंड, अल्युमिनम, सिमेंटचे इमारतीचे दगड हे पदार्थ सांपडतात. पण यांच्या खाणी चालू करणें खर्चाचें काम असल्यामुळें अद्याप फारसें यश आलेलें नाहीं. मात्र ग्वाल्हेर संस्थानांत बनमोर येथें एक सिमेंटचा कारखाना मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. बाघेलखंड व छोटा-नागपूर यांमधील डोंगराळ भागांतून मात्र दगडी कोळसा तसेंच अल्युमिनम शिवाय वरील सर्व खनिज पदार्थ मुबलक सांपडतात. रांची येथील कोळशाची खाण प्रसिद्ध आहेच. शिवाय जमशेटपूर ऊर्फ टाटानगर येथील टाटा कंपनीचे लोखंडी आणि पोलादी साहित्य तयार करण्याचे प्रचंड कारखाने हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचे आहेत. कारखान्यांमुळेंच येथें प्रथम वस्ती होऊं लागली आणि वाढतां वाढतां पंधरा वीस वर्षांतच ती एक लाखावर वाढली आहे; यावरून येथील कारखान्यांची भरभराट लक्षांत येईल.

माळव्याच्या पठारांत खाणींची भरभराट होत नसली तरी कापसाचे कारखाने पुष्कळ आहेत. एका इंदुरासच किती तरी गिरण्या आहेत. प्रसिद्ध शेट हुकूमचंद या धनाढ्य सावकाराची कापडाची गिरणी नांवाजलेली असून इतरत्रहि सरकी काढण्याच्या, गठ्ठे बांधण्याच्या व सूत कांतून कापड विणण्याच्या गिरण्या पुष्कळ आहेत. चंदोरी येथील तलम कापड, विशेषत: पागोटीं, महेश्वरी लुगडीं व धोतरजोडे, मंदसोर येथील चीट, सिहोर, अष्टा व भोपाळ येथील चादरी या वस्तु प्राचीन काळापासून अद्यापिहि चांगल्या निघतात. जाडें भरडें कापड तर सगळीकडेच होतें. ग्वाल्हेर संस्थानांत २०० निरनिराळे कारखाने असून त्यांतल्या त्यांत चिनीमातीच्या वस्तु करण्याच्या कारखान्याची विशेषच भरभराट होत आहे.

माळव्याचें पठार मालव-देश म्हणून प्राचीन काळीं प्रख्यात होतें. धार आणि उज्जयनी या राजधान्या नांवाजलेल्या होत्या. धारचा राजा भोज, आणि उज्जयनीचा राजा विक्रमादित्य हे दोघेहि आदर्शभूत राजे होऊन गेले. दोघेहि विद्वानांचे चहाते व पोशिंदे होते. विक्रमाच्या राजसभेंत नऊ नामांकित विद्वन्मुकुटमणि होते. त्यांस नऊ रत्नें म्हणत. प्राचीन पवित्र सप्तपुरांपैकींच उज्जयनी एक प्रसिद्ध क्षेत्र आहे. महांकालेश्वर हें येथील देवस्थान. उज्जयनीची वेधशाळा ही एके काळीं भरतखंडांत फार प्रसिद्ध होती; आणि भारतीय ज्योतिःशास्त्रज्ञांनीं या नगरीवरून जाणारें रेखावृत्तच मूलरेखावृत्त गणलें होतें. हल्लीं ग्रीनिच येथील वेधशाळेवरून जाणाऱ्या रेखावृत्तास मूलरेखावृत्त मानतात. धारचा किल्ला इतिहासप्रसिद्ध आहे. धारनगरीभोंवतीं पुष्कळ सागर आहेत. त्यांतल्या त्यांत मंजुसागर प्रख्यात आहे. हल्लीं धार व देवास येथें परमार-कुलोत्पन्न पवार राजे राज्य करीत आहेत. धारचे उदाजी पवार, ग्वाल्हेरचे राणोजी शिंदे आणि इंदूरचे मल्हारराव होळकर हे रणशूर योद्धे रणधुरंधर पहिले बाजीराव पेशवे यांच्या वेळीं पुढें सरसावलेले सरदार होत. मराठशाहींत यांचा दरारा दिल्लीच्या बादशहावर तर होताच, शिवाय रजपूत, जाट, रोहिले या सर्वांवरच यांचा वचक होता. पण हल्लीं हे सर्व संस्थानिक सार्वभौम पंचम जॉर्ज नृपतीचे मांडलीक आहेत.

बुंदेलखंडांत ठाकूर लोक राहात होते. विंध्यवासिनी देवीला प्रसन्न करून तिच्या आशीर्वादानें पुत्र मिळण्याकरितां एका गहिरवाड कुलांतील क्षत्रिय राजानें आत्मयज्ञ केला आणि वेदीवर पडलेल्या त्याच्या रक्ताच्या बिंदूपासून त्याला मुलगा मिळाला म्हणून या प्रदेशास बुंदेलखंड हें नांव मिळालें अशी आख्यायिका आहे. ( बुंद म्हणजे थेंब. ) बुंदेलखंड कधीं बुंदेल घराण्याच्या ताब्यांत तर कधीं चंदेल घराण्याच्या ताब्यांत जाई; कधीं कधीं दिल्लीच्या बादशहाची त्यावर सत्ता असे.

पण पुढें छत्रसाल राजानें नरवीर बाजीराव पेशव्यांच्या मदतीनें आपलें स्वातंत्र्य मिळविलें. मराठ्यांना या वेळीं बुंदेलखंडाचा कांहीं मुलूख मिळाला. याच प्रांतांत झांशीचा किल्ला आहे; आणि १८५७ सालच्या प्रसिद्ध बंडांत झांशीची वीरस्नुषा राणी लक्ष्मीबाई हिनें जें रणांगणावर अलौकिक शौर्य दाखविलें, त्यानें विस्मित होऊन इंग्लिश लढवय्यांनींहि तोंडांत बोटें घातलीं. पुढें हा सर्वच मुलूख ब्रिटिशांच्या ताब्यांत गेला. विंध्योत्तर पठारामध्यें हल्लीं मुख्य १० संस्थानें असून लहान संस्थानें आणि जहागिरी मिळून त्यांची संख्या ५६ तरी भरेल. सर्वच संस्थानें ब्रिटिश सत्तेखालीं असून या सर्वांवर देखरेख ठेवण्याकरितां इंदोर येथें एक ब्रिटिश प्रतिनिधि असतो. छोटा-नागपूरच्या पठारांत खडसवान, सिरैकेल हीं दोनच संस्थानें प्रमुख आहेत. पश्चिमेकडे रेवा संस्थान आणि पूर्वेकडे छोटा-नागपुरांतील रांची, हजारीबाग वगैरे बहार प्रांतांत समाविष्ट केलेले जिल्हे यांमधील बराचसा डोंगराळ मुलूख लहान लहान संस्थानिकांच्या व जहागीरदारांच्या ताब्यांत आहे. या भागांतील संताळ, गोंड वगैरे लोक अद्याप रानटी अवस्थेंतच आहेत. त्यामुळें येथें कोणत्याच उद्योगधंद्याची अगर संस्कृतीची वाढ झालेली नाहीं.

विंध्योत्तर पठारांमधील माळवा, बुंदेलखंड, बाघेलखंड व जबलपूर प्रांत या भागांतच मोठमोठीं शहरें आहेत. यांपैकीं भोपाळ, भिलसा, शिहूर, दीप, दिवाणगंज, इंदूर, धार, महतपूर, तरणा, देवाळपूर, महेश्वर, लष्कर, उज्जयनी, मंदसोर आणि निमच या मोठमोठ्या व्यापारी पेठा आहेत. इतर प्रसिद्ध व प्रेक्षणीय स्थळेंहि पुष्कळ आहेत. रांची येथील पुरातन प्रचंड स्तूप, उज्जयनीजवळ क्षिप्रा नदीच्या पात्रांत बांधलेला राजवाडा, उज्जयिनी, भिलसा, उदयगिरी, चंदेरी, ग्वाल्हेर, महीलपूर, मंदसोर व जामगड येथील देवळें, भोजपूर येथील प्रचंड बंधारा, आणि भोपाळ, महेश्वर, देवाळपूर, हंसळपूर, यशवंतपूर, धार येथील तळीं रमणीय व

प्रेक्षणीय आहेत. भोपाळच्या तळ्यासंबंधीं तर 'तालमे ताल भोपाल ताल,' अशी ख्याती आहे. ग्वाल्हेर, मंडेश्वर, हिंगळजगड, ब्रिजागड, मांडूगड, नरसिंहगड, राजगड, रायसेन, गिनुरगड, चौकीगड, भोपाळ आणि धार येथील किल्ले प्रेक्षणीय असून त्यांचा पूर्वींच्या राजांना फार उपयोग झाला. हल्लीं महू व निमच येथें ब्रिटिश सरकारच्या लष्करी छावण्या आहेत.

विंध्योत्तर पठारांतील महू, इंदोर, उज्जयनी, रतलाम, भोपाळ, भिलसा, ललितपूर, झांशी, दात्या, ग्वाल्हेर हीं शहरें जी. आय्. पी. रेल्वेच्या मुंबई ते दिल्ली या मुख्य लोहमार्गावर आहेत. जबलपूर हें जबलपूर ते अलाहाबाद, व पुढें कलकत्ता आणि जबलपूर ते मुंबई या लोहमार्गांचें केंद्र आहे. यामुळें जबलपुरास व्यापारी महत्त्व बरेंच आलें आहे.

## माळवा, बुंदेलखंड आणि बाघेलखंड यांतील प्रमुख संस्थानें:—


| नांव व घराणें | राजधानी | क्षेत्रफळ | लोकसंख्या | उत्पन्न सुमारें |
|---|---|---|---|---|
| इंदोर, होळकर | इंदोर | ९,५२० | १६१,८,२३७ | १,३८,००,००० |
| भोपाळ, अफगाण | भोपाळ | ६,९०२ | ७,२९,९४५ | ६२,००,००० |
| धार, पवार | धार | १,७७७ | २,४३,५२१ | १७,००,००० |
| ग्वाल्हेर, शिंदे | ग्वाल्हेर | २५,०४० | ३६,२१,९०० | २,००,००,००० |
| रतलाम, रजपूत | रतलाम | ८७१ | | |
| देवास,थो.पा.पवार | देवास | ३१९ | ८३,३२१ | ९,००,००० |
| देवास, धा. पा. ,, | ,, | ४४९ | ७०,५१३ | ६,००,००० |
| जावडा, अफगाण | जावडा | ६०१ | १,००,१६० | १२,००,००० |
| ऊर्च्छा, रजपूत | टिकमगड | २०८० | ३,१५,००० | ११,००,००० |
| दात्या, रजपूत | दात्या | ९११ | १,५८,८५० | १७,००,००० |
| रेवा–रजपूत | रेवा | १३,००० | १५,८७,४५० | ६०,००,००० |

जबलपूरचा समावेश मध्यप्रांत या राजकीय विभागांत करण्यांत आलेला आहे, पण प्रादेशिक दृष्ट्या त्याचा समावेश या पठारांतच होतो. शिवाय एकंदर भौगोलिक स्थिति पठारांसारखीच आहे. या भागांत जबलपूर, सागर, ललितपूर, दमोह आणि कटणी हीं मुख्य शहरें आहेत. जबलपूर शहराची मांडणी फारच रेखीव आहे. जवळच १०।११ मैलांवर नर्मदा नदी उंच उंच संगमरवरी खडकांतून वाहात जाते. तेथील अप्रतिम देखावा विलक्षणच मोहक आहे, इतका कीं, चांदण्यारात्रीं तर तेथील अलौकिक देखावा पाहून आपण एखाद्या यक्षनगरींतच आहात कीं काय असें वाटतें. जबलपूर शहरांत कारखानेहि पुष्कळच आहेत. संगमरवरी दगडाच्या सुंदर मूर्ति बनविणें हा येथील एक प्रमुख धंदा होय.

## उपसंहार

पर्वत-प्रदेशांची पाहणी एका स्वतंत्र प्रकरणांत केली आहे. तशी सखल प्रदेशांची व पठारांची न करतां त्यांची ठिकठिकाणीं तुलना केली आहे. गंगेच्या खोऱ्याचे तीन विभाग, पंजाब म्हणजे पांच नद्यांचा प्रदेश, सिंधुनदानें पोसलेला सिंध प्रांत आणि केवळ रणमय राजस्थान, इत्यादि सखल प्रदेशांत क्रमाक्रमानें पावसाचें मान कसें कसें कमी कमी होत जातें आणि त्यांच्या पिकांत कसा फरक पडत जातो हें सहज कळण्यासारखें आहे. त्यामुळेंच बंगाल्यांत केवळ भात खाणारे तर पंजाबांत केवळ गहूं खाणारे लोक आहेत. सिंधमध्यें गहूं, भात आणि भाकरीहि खातात. राजस्थानांत भाकरीचें प्रमाण जास्त. अरवली पर्वतापासन ते पारसनाथापर्यंत पठारांचा प्रदेश लागतो. यांत पुन्हा पावसाचें मान पश्चिमेकडून पूर्वेकडे व दक्षिणेकडून उत्तरेकडे वाढत जातें म्हणून पुन्हा भाकरीचें प्रमाण कमी कमी होतें व पोळीचें प्रमाण वाढतें आणि पुढें पारसनाथाकडे पुन्हा भात हेंच लोकांचें मुख्य अन्न होतें. भौगोलिक दृष्ट्या हें थोडक्यांत या प्रदेशांचें सिंहावलोकन होय.

स्थळ प्र
दा.



संगमरवरी कड्यावरून कोसळणारी नर्मदा

५०२



जाहिराती ) बुंदी येथील सिमेंटचा कारखाना ( वरून

REFBK-0005022

REFBK-0005022